




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार ८ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १०


## पंढरपूरवरून येताना एसटीचा भीषण अपघात

# 50 प्रवाशी बचावले

**बुलडाणा/ प्रतिनिधी-** आषाढी एकादशीच्या वारीहून परतणा-या ५० भाविकांच्या एसटी बसला बुलडाणा जिल्ह्यातील चिखली येथे अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस दुभाजकाला धडकून उलटली, ज्यात १५ प्रवासी किरकोळ जखमी झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, पांडुरंगच्या कृपेने मोठा अनर्थ टळला, अशी भावना वारक-यांनी व्यक्त केली.



दरम्यान, आषाढी एकादशी समारोप झाल्यानंतर विठुरायाच्या दर्शनानंतर वारकरी भाविकांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. अशातच बुलडाणा जिल्ह्यातील चिखली येथे एसटी महामंडळाच्या खामगाव कडे येत असलेल्या पंढरपूर निघालेल्या बसला अपघात झाला. मात्र पांडुरंगाचीच कृपा आणि आम्ही बचावलो अशा प्रतिक्रिया अशा बोलक्या भावना वारक-यांच्या आहे. मात्र या अपघातामुळे भाविकांनी आपला जीव मुठीत ठेवला आषाढी वारीहून भाविकांना घेउन परतणा-या एसटी बसला आज सोमवार ७ जुलै पहाटे बुलडाणा जिल्ह्यातील चिखली शहराजवळ अपघात झाला.

चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्ता दुभाजकाला धडकून उलटली, ज्यामुळे खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र १५ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. खामगाव आगाराची एसटी बस क्र. टा ४० ५८३० (पान २ वर)

# महाराष्ट्र आमच्या पैशांवर जगतोय, तुम्हाला आपटून आपटून मारू ?

## भाजप खासदार निशिकांत दुबेची जीभ घसरली



**मुंबई/प्रतिनिधीः** भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी राज ठाकरे, उद्धव ठाकरेंविरोधात दंड थोपटताना महाराष्ट्र कोणाच्या भाकरी खातो, असा विधान केले.आपल्या घरात कुत्राही वाघ असतो. महाराष्ट्राबाहेर चला. तुम्ही जर बॉस आहात, तर बिहारला चला. उत्तर प्रदेशला चला, तामिळनाडूला चला. तुम्हाला आपटून आपटून मारू , असे खासदार निशिकांत दुबे म्हणाले.

एएनआय वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये निशिकांत दुबे यांनी हिंदी भाषिकांना होत असलेल्या मारहाणीवर भाष्य केले. त्यांनी राज ठाकरे, उद्धव ठाकरेंना माहीममध्ये जाउन उर्दू भाषिकांना मारून दाखवा, असे आव्हानही दिले. तुम्ही काय म्हणत आहात की, मराठी बोलावं लागले? तुम्ही कोणाची भाकरी खात आहात? तिथे टाटा आहे, बिर्ला आहे, रिलायन्स आहे. कोणाचेही महाराष्ट्रात प्रकल्प नाहीये. टाटाने तर पहिला कारखाना (पान २ वर)

### तर म्हणू की खरंच बाळासाहेबांचे वारसदार आहे

*आज मुंबई महापालिकेची निवडणूक होणार आहे आणि हे उद्धव ठाकरे व राज ठाकरे जे करत आहेत, त्यापेक्षा नीच काम काहीही असू शकत नाही. आम्ही याचा विरोध करतो. जर त्यांच्या हिंमत असेल, तर त्यांनी बाजूलाच असलेल्या माहीम भागात जावे, माहीम दर्ग्याबाहेर कोणत्याही हिंदी भाषिक, उर्दू भाषिकाला मारून दाखवावं. मग मी म्हणेल की, ते खरंच बाळासाहेब ठाकरेंचे वारसदार आहेत आणि बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांवर चालत आहेत , अशा शब्दात निशिकांत दुबेंनी ठाकरे बंधूंवर हल्ला चढवला.*

# हॉटेल व्हिट्स प्रकरणाची होणार उच्चस्तरीय चौकशी

**मुंबई/प्रतिनिधीः** राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या चिरंजीवाच्या नावे असलेल्या कंपनीने हॉटेल व्हिट्स खरेदी निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला होता. रजिस्टर नसलेली, तीन वर्षांचे रिटर्न दाखल न केलेल्या कंपनीला निविदा प्रक्रियेत सहभाग कसा घेउ दिला? निविदा प्रक्रिया रद्द करण्याऐवजी इतर चार कंपन्यापैकी कुणाला हॉटेल का दिले नाही? असा प्रश्न विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थितीत केला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देतांना निविदा प्रक्रिया रद्द झाली आहे, परंतु निविदा प्रक्रियेत जी अनियमितता झाली आहे, त्याची उच्चस्तारीय चौकशी केली जाईल, असे सांगितले.



या संपूर्ण प्रकरणावर सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या नावाचा उल्लेख झाल्यानंतर त्यांना सभागृहात बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. यावेळी हे नियमानूसार नसल्याचे सांगत विरोधकांनी घोषणाबाजी केली. संजय शिरसाट राजीनामा द्या, सभापती न्याय द्या म्हणत शिरसाट यांच्या बोलण्याला विरोध दर्शवला. गोंधळ आणि घोषणाबाजीत शिरसाट यांनी आपले म्हणणे मांडले. छत्रपती संभाजीनगर शहरातील रेल्वेस्टेशन भागात असलेल्या हॉटेल व्हिट्स खरेदी प्रकरणावरून मोठा वाद निर्माण झाला होता. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचे पुत्र सिद्धांत शिरसाट यांच्या कंपनीने हॉटेल खरेदीच्या लिलाव प्रक्रियेत सहभाग घेतला होता. मंत्री संजय शिरसाट यांच्या राजकीय दबावातून बाजार भावापेक्षा कमी दरात या हॉटलची विक्री नोंदणीच नसलेल्या सिद्धात मटेरियल कंपनीला करण्यात आली. यावरून विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांच्याकडे पत्र पाठवून या संपूर्ण लिलावाची उच्चस्तरीय चौकशीची मागणी पत्र पाठवून केली होती.

आरोप झाल्यानंतर संजय शिरसाट यांनी या निविदा प्रक्रियेतून बाहेर पडत माघार घेतली होती. त्यांनतर ही संपूर्ण निविदा प्रक्रियाच महसूल विभागाकडून नियुक्तकरण्यात (पान २ वर)

## बच्चु कडूंच्या 7/12 कोरा यात्रेला सुरूवात

# भर पावसात शेतक-यांची मोठ्या संख्येने हजेरी








*◆माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ७/१२ कोरा कोरा कोरा यात्रेला आजपासून सुरुवात झाली. या यात्रेत सहभागी झालेल्या आंदोलक शेतक-यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्यावेळी लाडकी बहीण योजना आणली त्यावेळी कोणती समिती गठीत केली काय? तर नाही मग शेतक-यांना कर्जमाफी देण्यासाठी समिती कशाला तयार करत आहेत, थेट घोषणाच केली पाहिजे, अशी मागणी शेतक-यांनी यावेळी केली.*

**अमरावती/प्रतिनिधी-** देशाचे पहिले कृषीमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ७/१२ कोरा कोरा कोरा यात्रेला आजपासून सुरुवात झाली आहे. उंब्रडा बाजार, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशी गावे करत चिलगव्हाण या स्व. साहेबराव करपे यांच्या रणभूमीमध्ये यात्रेची सांगता होणार आहे. भर पावसात सुमारे १३८ किलो मीटरच्या या यात्रेला शेतकरी, पक्षातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सरकारने ७/१२ कोरा केलाच पाहिजे अशी मागणी करीत शेतकरी मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी होत आहेत.

आज सोमवारी सकाळी १० वाजल्यापासून पापळ येथून सुरु झालेल्या ७/१२ कोरा कोरा यात्रेत शेतकरी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. १४ जुलै रोजी चिलगव्हाण येथे या यात्रेची जाहीर सांगता सभा होणार आहे. ८ दिवसांच्या कालावधीत एकूण १३८ किमी पदयात्रा चालणार आहे. प्रहार नेते बच्चू कडू ७/१२ कोरा यात्रेच्या माध्यमातून गावागावात शेतक-यांना, कष्टकरी समाजाला भेटून त्यांच्या समस्या समजून घेणार आहेत.

◆ **सरकारने फसवले-** बच्चू कडू यांनी ज्यावेळी अन्नत्याग आंदोलन केले. त्यावेळी या सरकारने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीबाबत आश्वासन दिले होते. मात्र, त्यांनी ते पूर्ण केलेले नाही. काल आषाढी एकादशी निमित्त मुख्यमंत्री फडणवीस पंढरपूरला विठूरायाच्या शासकीय पूजेला गेले होते. त्यावेळी लाखो शेतकरी, भाविक उपस्थित होते. त्यांच्या समोर देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफी, सातबारा कोरा करण्याची घोषणा करायला हवी होती, मात्र, ती त्यांनी केली नसल्याचे आंदोलक शेतक-यांनी म्हटले.

## महात्मा गांधींच्या पुतळ्याची विटंबणा

**पुणे :** पुणे रेल्वे स्थानकासमोर असणा-या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. हातात कोयता घेउन एका व्यक्तीने महात्मा गांधींच्या पुतळ्यावर हल्ला केला. या घटनेमुळे पुणे स्थानक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.रविवारी (६ जुलै) रात्री केशरी रंगाचा कुर्ता घातलेला आणि हातात धारदार कोयता घेतलेला तरूण पुणे रेल्वे स्थानकाजवळ आला. त्याने थेट महात्मा गांधी यांच्या पुतळ्याच्या चौथ-यावर चढून छातीवर आणि पायावर वार केले. ही घटना पाहून उपस्थित नागरिकांनी तातडीने रेल्वे पोलिसांना याची माहिती दिली.पोलिसांनी लागलीच कारवाई करत सूरज शुक्ला नावाच्या तरूणाला चौथ-यावरून खाली उतरवून ताब्यात घेतले. वेळेवर हस्तक्षेप झाल्याने पुतळ्याचे अधिक नुकसान झाले नाही.मिळालेल्या माहितीनुसार, सूरज शुक्ला हा मूळचा उत्तर प्रदेशातील रहिवाशी आहे. तो काही दिवसांपासून पुण्यात नोकरीच्या शोधात आहे. त्याने हे कृत्य कोणत्या उद्देशाने केले, याचा शोध घेतला जात आहे. त्यासह त्याचा कोणती संघटना आणि पक्षाशी संबंध आहे का? हे देखील तपासले जात आहे.



## आयसीसीच्या सीईओपदी संजोग गुप्ता यांची निवड

**लंडन :** जागतिक स्तरावर भारतीय क्रिकेटचे नाव हळूहळू मोठे होत आहे. सध्या आयसीसीच्या चेअरमन पदावर भारतीय व्यक्ती विराजमान आहे. बीसीसीआयचे माजी सचिव जय शाह यांना तो बहुमान मिळाला आहे. तशातच आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने(आयसीसी) संजोग गुप्ता यांना त्यांचे नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी(सीईओ) म्हणून नियुक्त केले आहे. संजोग गुप्ता यांनी सोमवार दि. ७ जुलैपासून ही जबाबदारी स्वीकारली आहे. संजोग यांनी ऑस्ट्रेलियाचे जेफ ?लार्डिस यांची जागा घेतली. ते २०२१ पासून या पदावर होते. संजोग हे आयसीसीचे सातवे सीईओ आहेत आणि मनु साहनी यांच्यानंतर ही जबाबदारी स्वीकारणारे ते दुसरे भारतीय ठरले.संजोग गुप्ता सध्या जिओस्टारमध्ये सीईओ (क्रीडा आणि थेट प्रक्षेपण विशेष अनुभव) म्हणून काम करत आहेत. भारतातील खेळांच्या डिजिटल आणि टीव्ही प्रसारणाला नवीन दिशा देण्यात संजोग यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल), आयसीसीच्या स्पर्धा, प्रो कबड्डी लीग आणि इंडियन सुपर लीग सारख्या मोठ्या क्रीडा स्पर्धा लोकप्रिय करण्यात संजोग गुप्ता यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.



## पावसाची संततधार

### घाटंजी तालुक्यात दोघांचा पूरबळी

**यवतमाळ/प्रतिनिधीः** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून, अनेक तालुक्यात पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान घाटंजी तालुक्यात दोन वेगवेगळ्या घटनेत दोघांचा पुरात वाहून गेल्याने मृत्यू झाला. यामध्ये एक मृत अज्ञात असून दुस-या घटनेत शिरोली येथील वृद्ध मजुराचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी सायंकाळी घडली.

घाटंजी तालुक्यात संततधार सुरू असून, नदी-नाल्यांना जोरदार पूर आला आहे. कोपरी-येरंडगाव रस्त्यावर चिंचोली गावाजवळील पुलावरून गावक-यांना वाघाडी नदीच्या पुरात एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह वाहत जाताना दिसून आला. संजय तुरक पाटील आणि इतर ग्रामस्थांनी तो मृतदेह बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रवाह इतका वेगवान होता की, मृतदेह तरोडा गावाच्या दिशेने पुढे वाहून गेला. या व्यक्तीची ओळख पटलेली नव्हती आणि मृतदेहचाही शोध लागला नव्हता. हे शोधकार्य आजही सुरू होते. दुस-या घटनेत नाल्याला आलेल्या पुरात घाटंजी तालुक्यातीलच शिरोली येथील संभाजी भु-या आत्राम (६०) यांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, संभाजी आत्राम हे पत्नी शांता यांच्या सोबत शेतात मजुरीचे काम करत होते.सकाळी ८.३० (पान २ वर)

# राज ठाकरे यांच्यावर कोणीही बोलणार नाही

### शिंदे सेनेची भूमिका

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात न बोलण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिंदे सेनेतील प्रवक्ते व नेत्यांना दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र त्यावर शिंदे सेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी शिक्कामोर्तब केले आहे. राज ठाकरे आमच्याबद्दल काहीही बोलले नाहीत, त्यामुळे आम्ही देखील त्यांच्याबद्दल बोलणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



मुंबईत शनिवारी हिंदी सक्ती आणि त्रिभाषा सूत्र लागू करण्याचे दोन शासकीय आदेश रद्द करण्याच्या महायुती सरकारच्या निर्णयावर जल्लोष करण्यासाठी उद्धव सेना आणि मनसेच्या वतीने आयोजित केलेला विजयी मेळावा शनिवारी वरळीत पार पडला. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पक्षातील प्रवक्ते आणि नेत्यांना राज ठाकरे यांच्यावर कोणत्याही प्रकारची टिका किंवा बोलू नये असे आदेश दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यांच्या या बोलण्याचा नेमका अर्थ काय घ्यायचा असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे. परंतु म्हस्के यांनी याचे स्पष्टीकरण केले आहे.

मेळाव्यात राज ठाकरे यांनी न कोणता झेंडा फक्त मराठीचा अजेंडा अशा स्वरुपात आपले भाषण केले. मात्र उद्धव ठाकरे यांनी मात्र शिंदे सेनेवर आगपाखड केल्याचे दिसून आले. त्यामुळेच आता राज ठाकरे यांच्यावर किंवा यांच्या विरोधात बोलण्याचा विषय काय येतो असा सवाल म्हस्के यांनी उपस्थित केला आहे. ना कुठला पक्ष, ना कुठला झेंडा अशी त्यांची भूमिका होती, मात्र उद्धव ठाकरे यांनी हिंदी सक्ती, मराठी भाषा सोडून खालच्या पातळीची टीका केली, मुंबई महापालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेउन त्यांनी भाषण केले, उद्धव ठाकरे हे हारलेले दिसून आल्याची टिका म्हस्के यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केली. राज ठाकरे आमच्याबद्दल काही बोलले नाहीत म्हणून आम्ही त्यांच्याबद्दल काही बोलणार नाही, (पान २ वर)

# फुके कुटुंबियांच्या सुनेचे विधानभवनाबाहेर आंदोलन

### ● सासरकडून जाच ● फडणवीसांना न्यायासाठी साकडे

**मुंबई/प्रतिनिधीः** प्रिया फुके यांनी दिर, भाजप आमदार परिणय फुके आणि कुटुंबीयांविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून सोमवारी त्यांनी विधान भवनासमोर आंदोलन केले. मात्र, पोलिसांनी त्यांना तात्काळ ताब्यात घेतले. दरम्यान, सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या जाचामुळे आपल्या दोन लहान मुलांचे भवितव्य टांगणीला लागल्याची खंत व्यक्त त्यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालून तात्काळ न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी प्रिया फुके यांनी केली आहे. सत्ता, अधिकार, (पान २ वर)



## हिमाचलमध्ये मान्सूनचा कहर!

# ढगफुटीमुळे 78 जणांचा मृत्यू



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** हिमाचल प्रदेशमध्ये मान्सूनने कहर केला असून सततच्या पावसामुळे येथे २३ पूर, १९ ढगफुटी आणि १६ भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत, ज्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी भीषण परिस्थिती आहे. यामध्ये ७ जुलैपर्यंत, किमान ७८ लोकांचा मृत्यू झाला आहे, ३७ लोक बेपत्ता आहेत आणि ११५ हून अधिक जण जखमी झाले आहेत. मंडी जिल्हा सर्वात वाईट परिस्थिती आहे. राज्यात अंदाजे ५७० कोटी रु पयांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्तकरण्यात आला असून, रेड अलर्ट अजूनही लागू आहे, ज्यामुळे आणखी विनाश होण्याची भीती निर्माण झाली आहे. भाजप खासदार कंगना राणौत रविवारी मंडीतील कारसोग येथे आपत्तीग्रस्त भागांना भेट देउन नुकसानीचा आढावा घेतला. मंडी जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात नुकसान झालेल्या घरांजवळील कचरा आणि गाळ साचल्याचे पाहायला मिळाले.








# नवनियुक्त शिक्षणाधिकारी सतीश मुगल यांचे शालेय साहित्य देऊन स्वागत



**अमरावती/प्रतिनिधी-** मुख्य कार्यकारी अधिकारी अमरावती संजिता महापात्र यांनी दि. ३ जून २०२५ रोजी काढलेल्या आदेशाने नुकतेच पदभार स्वीकारलेले जिल्हा परिषद अमरावती चे नवनियुक्त शिक्षणाधिकारी सतीश मुगल यांचे दि.७ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना मुंबई ३२ जिल्हा -शाखा- अमरावतीच्या वतीने स्वागत करण्यात आले.

या स्वागत प्रसंगी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित आणि जिल्हा सचिव किशोर मालोकार यांनी उपस्थित राहून, शालेय साहित्य एक डझन रजिस्टर,एक डझन पेन व पेन्सिल बॉक्स देउन सतीश मुगल यांचा सन्मान केला. पारंपरिक पुष्पगुच्छ वा भेटवस्तूंऐवजी शालेय साहित्य देण्यामागे समाजहिताची जाण आणि विद्यार्थ्यांप्रतीची बांधिल की दिसून आली.स्वागत स्वीकारताना सतीश मुगल यांनी संघटनेच्या उपक्रमाचे कौतुक करत आपली भावना ही व्यक्त केली. 'विद्यार्थ्यांच्या उपयोगी येणा-या वस्तूंनी स्वागत होणे ही एक प्रेरणादायी कल्पना आहे. या मधून समाजप्रती असलेली संवेदनशीलता स्पष्ट होते,' असे ते म्हणाले.

# बाव-यावरील हल्लेखोरांना अटक करण्यास पोलिसांची टाळटाळ; आरोपी मोकाट

## कुत्र्याला गंभीर जखमी केल्याचे प्रकरण

**अचलपूर/प्रतिनिधी-** माणसांवरील वादात दोन व्यक्तींनी विरोधकाच्या कुत्र्याला लोखंडी पाईप ,कु-हाड याने निर्दयतेने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना असदपूर येथे घडली होती. याबाबत आसेगाव पोलीस स्टेशनला फिर्याद देउनही आरोपींना अटक करण्यास टाळाटाळ केली जात आहे. ते आरोपी गावातच मोकाट फिरत असल्याची चर्चा आहे. प्राप्त माहितीनुसार अचलपूर तालुक्यातील असदपुर येथील रहिवाशी असलेले गोकुळ पाठक यांचा गावातीलच धन आणि धावट ह्यांचेशी जुना वाद होता. पाठक हे शेतात काम करत असताना त्यांना फोन आला की तुमच्या बाव-या नावाच्या कुर्त्याला धन आणि धावत या दोन व्यक्तींनी कु-हाडीने वार केले व दुस-याने लोखंडी पाईपाने मारहाण करून गंभीर जखमी केले होते. त्यात कुर्त्याचे अंगावर चार ते पाच मोठ मोठ्या गंभिर जखमा झालेल्या होत्या. कुत्रा मरणासन्न अवस्थेत पडला होता.



दरम्यान पशुप्रेमी उषा पानसरे यांनी तात्काळ तेथे पशुंचे ड?क्टर बोलावून त्याच्यावर उपचार सुरू केला होता व असदपूर पोलीस स्टेशन शी संपर्क साधला. घटनेची माहिती दिली. चौकशीसाठी बिट जमदार घोडकर घटनास्थळी आले. त्यांनी पाठक यांना आसेगाव पोलीस स्टेशनला आणून फिर्याद नोंदवून घेतली.

बाव-या कुर्त्यावर हल्ला करून त्याला गंभिर जखमी करणारे आरोपी असदपुरात मोकाट फिरत असून पोलिसांनी त्यांना अद्यापही अटक न केल्याने नागरिकात संताप व्यक्त होत आहे तसेच आमचे काहीच होउ शकत नाही पोलीस आमचे काहीच बिघडवू शकत नाही अशा बढ़ायक्या ते मारत असल्याचे गावकरी सांगतात.

■ बाव-या कुत्र्यांची तब्येत आता सुधारत आहे. त्याला गोळ्या औषधे नियमित सुरू आहे परंतु पोलिसांनी त्याच्यावर हल्ला करणा-या दोन क्रुरकर्म्यांना त्वरित अटक करावी.

**-उषा पानसरे** (पशुप्रेमी ) असदपूर

■ सदर आरोपींकडून मला मारहाण करण्याच्या धमक्या देत असून पोलीसांनी आरोपींवर कठोर कारवाई करून मला पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी गोकुळ पाठक यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना केली.

■ कुत्रा हा इमानदार प्राणी आहे. तशा प्राण्यावर निष्ठूरपणे कु-हाडीने वार करून लोखंडी पाईपाने जखमी करणा-या या क्रुरकर्म्यांनी पोलीसांनी दोन दिवस उलटले तरी अजून अटक का केली नाही असा प्रश्न गावातील पशूप्रेमी लोकांना पडला आहे.

# अचलपूर, परतवाडा शहरात विजचोरीविरोधात धडक मोहीम

## ■ 30 जणांवर 10 लाखांचा दंड

**अचलपूर/प्रतिनिधी-** अचलपूर उपविभाग-२ अंतर्गत वीज चोरी व वीज गळती रोखण्यासाठी एप्रिल २०२५ मध्ये जोरदार मोहीम राबविण्यात आली. कार्यकारी अभियंता अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय कुटे यांच्या नेतृत्वात ही मोहीम शहरातील जुड्या भागात राबविण्यात आली.या मोहिमेदरम्यान ग्राहकांच्या मीटरची तपासणी करून सखोल चौकशी करण्यात आली. यावेळी मीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी करणा-या तब्बल ३० ग्राहकांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांच्यावर १० लाख रु पयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी सहाय्यक अभियंता रोहित म्हस्के, मुने, आदित्य चिखले यांच्यासह उपविभागातील सर्व तांत्रिक व कार्यालयीन कर्मचारी, नागोसे यांचे मोलाचे योगदान लाभले. अधिकारी संजय कुटे यांनी यावेळी सांगितले की, 'अचलपूर व परतवाडा शहरात वीज चोरी रोखण्यासाठी अशा मोहिमा सातत्याने व यांचे स्वरूप अधिक व्यापक करून राबवल्या जातील. तसेच सदर विजचोरांवर भारतीय विद्युत कायदा २००३ मधील तरतुदी नुसार गुन्हे देखील दाखल करण्यात येणार असल्याचे कुटे यांनी कळविले

शहरात या कारवाईमुळे खळबळ उडाली असून, विजचोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पान १ व १० वरून

## 50 प्रवाशी बचावले

पंढरपूरहून ५२ भाविकांना घेउन परतीच्या मार्गावर होती. पहाटे सुमारे पावणेदोनच्या सुमारास, चिखली शहरातील महाबीज प्रक्रिया केंद्रासमोर चालकाचे बसवरील नियंत्रण अचानक सुटले. त्यामुळे वेगात असलेली बस थेट रस्त्याच्या मधोमध असलेल्या दुभाजकाला धडकली. रात्रीची वेळ असल्याने आणि बहुतांश प्रवासी झोपेत असल्याने बसमध्ये मोठा गोंधळ उडाला.

## महाराष्ट्र आमच्या पैशांवर

बिहारमध्ये बनवला. तुम्ही आमच्या पैशांवर जगत आहात? तुम्ही कोणता कर भरत आहात? तुमच्याकडे कोणता उद्योग आहे? , अशी टीका खासदार निशिकांत दुबे यांनी केली. खाणी आमच्याकडे आहेत. झारखंडकडे आहेत. मध्य प्रदेशकडे आहेत. छत्तीसगडकडे आहेत. ओडिशाकडे आहेत. तुमच्याकडे कोणत्या खाणी आहेत? रिलायन्सनेही रिफायनरी गुजरातमध्ये सुरू केली आहे. सर्व उद्योग मग सेमी कंडक्टरचा उद्योगही गुजरातकडे येत आहेत , असे निशिकांत दुबे मराठी विरुद्ध हिंदी वादावर बोलताना म्हणाले. तुम्ही हुकुमशाही करत आहात. वर आमचे शोषण करून कर भरता. जर तुमच्यात हिंमत आहे, तुम्ही हिंदी भाषिकांना मारत आहात, तर उर्दू भाषिकांनाही मारा. तामिळी लोकांना मारा. तुम्ही जी ही नीच कृत्य करत आहात. मी म्हटले आहे की, तुम्ही जर ब?स आहात, तर चला बिहारला. चला उत्तर प्रदेशला. तामिळनाडूला चला. तुम्हाला आपटून आपटून मारू . ही अराजकता चालणार नाही , असे आव्हान भाजपचे खासदार निशिकांत दुबेंनी दिले.

**आम्हाला मराठीबद्दल आदर-** आम्ही मराठीचा सन्मान करतो. मराठी आदरणीय भाषा आहे. आम्ही छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, तात्या टोपेंपासून सर्व पेशव्यांचा सन्मान करतो. लोकमान्य टिळक असो, लजपतराय, गोपाळकृष्ण गोखले सगळ्यांनी स्वातंर्त्य लढ्यात योगदान दिले आहे. आम्ही सर्व मराठी स्वातंर्त्य सैनिकांचा सन्मान करतो , असे निशिकांत दुबे म्हणाले.

## हॉटेल व्हिट्स प्रकरणाची

आलेल्या प्राधिकरणाने रद्द केली. आज विधान परिषदेत व्हिट्स हाटेल खरेदी प्रकरणावर लक्षवेधी मांडण्यात आली. यावर उत्तर देतांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निविदा प्रक्रिया रद्द झाली असल्यामुळे आता लक्षवेधीला अर्थ उरत नाही, असे सांगितले. या उत्तराने समाधान न झाल्याने अंबादास दानवे यांनी काही मुद्दे उपस्थित केले. जी कंपनी नोंदणीकृतच नाही त्या कंपनीने निविदेत सहभाग कसा घेतला? असा मुद्दा उपस्थितीत केला. तर हाटेल खरेदीसाठी नियम, अटी शिथील केल्या असल्या तरी कोर्टाने सांगितले का? नोंदणी नसलेल्या कंपनीला टेंडर भरू द्या म्हणून, हा कोण तिसमारखाँ आला, असा संताप आमदार भाई जगताप यांनी उपस्थितीत केला. ज्याने हा निर्णय घेतला त्या प्राधिकरण अधिका-याला निलंबित करून, गुन्हा दाखल करा, अशी मागणी आमदार शशीकांत शिंदे यांनी सभागृहात केली. तर संपूर्ण निविदा प्रक्रियाच रद्द का केली? इतर सहभागी कंपन्यांचा विचार का केला गेला नाही? असा प्रश्न अनिल परब यांनी संबंधित मंर्त्यांना केला?

## पावसाची संततधार

वाजता ते शेतात गेले होते. काम संपल्यावर पत्नी घरी परतली, मात्र संभाजी आत्राम यांनी मी नंतर येतो असे सांगून शेतातच थांबले. रात्री ८ वाजेपर्यंत ते घरी परतले नसल्याने कुटुंबीयांनी आणि नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली. पावसामुळे नाल्याला आलेल्या पुरामुळे संभाजी आत्राम हे नाला ओलांडताना वाहून गेले असावेत, असा अंदाज होता. रविवारी माणिक विठ्ठल आत्राम यांच्या शेतालगत असलेल्या झाडाजवळ अडकलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला. जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून पावसाची संततधार सुरू आहे. शनिवारपासून पावसाने जोर पकडला असून, अनेक ठिकाणी पावसामुळे नदी, नाल्यांना पूर आला आहे. वणी तालुक्यात काही ठिकाणी घरांची पडझड झाली, तर घाटंजी तालुक्यात एक म्हैस पुरात वाहून गेली. दरम्यान जिल्ह्यात मंगळवारपर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्यात सध्या पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. नदी, नाल्यांच्या काठावरील गावांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. सततच्या पावसाने जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

## राज ठाकरे यांच्यावर कोणीही

मात्र उद्धव ठाकरे यांच्याबद्दल आम्ही बोलत राहू असेही त्यांनी सांगितले. उद्धव ठाकरे यांनी अतिशय गलिच्छ पद्धतीने भाषण करून उसन अवसान आणले, महाराष्ट्र, मराठी माणसांवर अन्याय असे भडकावून निवडणुका लढवण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याची टिकाही त्यांनी केली. मराठी माणसांना भडकावून त्यांची मत मिळवणे हाच त्यांचा उद्देश असल्याचे दिसून आले. तुमची एक हिंदी भाषिक खासदार आहे. प्रियंका चुर्तुवेदी त्यांना दोन शब्द मराठीत बोलता येत नसल्याची टिकाही त्यांनी केली.दोन महिन्यापूर्वीच मी सांगितले होते, की शिल्लक सेनेत कोणीही राहणार नाही, शनिवारी झालेल्या मेळाव्यात किती आमदार, खासदार उपस्थित होते, याचे उत्तर त्यांनीच द्यावे असेही ते म्हणाले. यावेळी म्हस्के यांनी राउत यांचाही समाचार घेतला, राउत यांनीच उध्दव ठाकरे यांचे वाटोळे केल्याची टिकाही त्यांनी केली. काँग्रेस, राष्ट्रवादी सोबत नेउन काय वाटोळे केल हे सर्वांना माहित आहे, आता त्यांना काँग्रेस सोबत राहायचे आहे का आणि काँग्रेसला यांच्यासोबत राहायचे आहे का असा प्रश्न राहिलेला आहे.

## फुके कुटुंबियांच्या सुनेचे

आर्थिक सुबत्ता असलेल्या अनेक घरांमधील स्त्रियांचा मानसिक छळ होत असल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. नागपूरमधील फुके कुटुंबातील वाद चव्हाट्यावर आला आहे. आमदार परिणय फुके यांचा भाउ आणि प्रिया फुके यांचे पती संकेत फुके यांचा सप्टेंबर २०२२ मध्ये मृत्यू झाला. संकेत यांच्या मृत्युनंतर काही महिन्यांनी प्रिया फुके यांनी सासरच्या मंडळींवर आरोप केले. पतीच्या मृत्युनंतर घरातील सदस्यांनी त्यांच्या बँकेतील सर्व पैसे काढून घेतले. तसेच, जमिनीच्या मालमत्तेतही हेराफेरी करून ती ताब्यात घेतल्याचे आरोप प्रिया फुके यांनी केले आहेत. शिवाय, अन्यायाविरोधात आवाज उठवल्यानंतर आपल्याला दोन लहान मुलांसह घरातून हाकलण्यात आल्याचा आरोप त्यांनी केल आहे.

आमदार परिणय फुके यांच्यावरही प्रिया यांनी अनेक गंभीर आरोप केले आहेत. पतीच्या मृत्यूनंतर निर्माण झालेली आर्थिक कोंडी आणि सासरच्या मंडळींकडून सुरू असलेल्या छळामुळे त्यांना मुलांचे संगोपन करण्यात अडचणी येत आहेत. सासरच्या मंडळींकडून त्यांना घरात येण्यास मज्जाव करण्यात येत असून त्यांच्या मागावर सतत माणसे असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सातत्याने त्यांना बलात्काराच्या आणि ठार मारण्याच्या धमक्या देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. आपल्यावर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी प्रिया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची चार वेळा भेट घेतली असून या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. पोलिसांकडूनही त्यांना सहकार्य मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. गेल्या दीड वर्षांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वेळ मागत आहे. त्यांच्या एका शब्दावर माझ्या दोन मुलांना न्याय मिळेल. मात्र, दुर्दैवाने या प्रकरणाची दखल घेतली जात नाही. मुलांचे शाळेचे शुल्क सुमारे दोन लाख रु पये असून तीदेखील फुके कुटुंब भरत नाही. केवळ शाळा सुरू होताना पहिल्या सहामहिन्यांची शुल्क भरण्यात आले. दोन बहिणी आणि आई असे त्यांचे कुटुंब असून आर्थिक पाठबळ नसल्याने आर्थिक कोंडी होत आहे, असे प्रिया फुके यांनी सांगितले. प्रिया फुके यांनी केलेल्या आरोपांबाबत रमा फुके यांनी नागपुरामध्ये पत्रकार परिषद घेतली आहे. तसेच, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून सर्व खटले कुटुंब न्यायालयात व जिल्हा न्यायालयात सुरू आहेत.- परिणय फुके, आमदार

## सरोज टॉकीजसह बसमध्ये

बॉम्ब असल्याची माहिती दिली. हा बॉम्ब कधीही फुटू शकतो असे त्याने सांगितले. या माहितीनंतर पोलीस विभागात खळबळ उडाली आणि तात्काळ बॉम्ब शोध पथक, श्वानपथक आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. एसीपी व सिटी कोतवाली पोलीस निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली परिसराची कसून तपासणी करण्यात आली. परिसरातील दुकान आणि वाहनांची पण तपासणी केली.मात्र, तपासणीत कोणताही स्फोटक पदार्थ आढळून आला नाही. दरम्यान, या घटनेनंतर सरोज टॉकीज परिसर आणि वसंत चौकामध्ये पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. पोलीस आता कॉल करणाऱ्या अज्ञात इसमाचा शोध घेत आहेत. याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

अज्ञात इसमाने कंट्रोल रूमला पहिला कॉल केला, त्यावेळी सरोज टॉकीज परिसरात बॉम्ब असल्याची माहिती दिली. यानंतर पोलीस तिथे पोहचले. लगेच त्याने दुसरा फोन कॉल केला आणि वसंत चौक परिसरातील एका बसमधील बॅगमध्ये बॉम्ब ठेवल्याची माहिती दिली. हा बॉम्ब केव्हाही फुटू शकते असे त्याने सांगीतले. या नंतर पोलिसांनी आपला मोर्चा वसंत चौक परिसराकडे वळविला. येथे पण पोलिसांनी संपूर्ण परिसराची तपासणी केली. दुकाने आणि ये-जस करणाऱ्या नागरिकांना थांबून त्यांची तपासणी करण्यात आली. दरम्यान दोन्ही ठिकाणी कोणताच स्फोटक पदार्थ आढला नसल्यामुळे पोलिस आता कॉल करून माहिती देणा-या त्या अज्ञाताचा शोध घेत आहे.

## अघोरी पूजेमध्ये पोलिसांची

आणि अमानुष वागणूक देऊन जबरदस्तीने डांबून ठेवल्याचे समोर आले आहे. यापैकी एका मुलीच्या शरीरावर लोखंडी वस्तूंनी चटके दिल्याचे दिसून आले. पीडित महिलेला अनेक दिवस बंद खोलीत ठेवून अमानुष वागणूक देण्यात आली होती. इतकेच नव्हे तर त्या महिलेला व तिच्या मुलीस 'अघोरी पूजे'च्या नावाखाली जबरदस्तीने उपस्थित राहण्यास भाग पाडण्यात आले होते. खोलीत अत्यंत गलिच्छ परिस्थिती होती, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

याप्रकरणी त्रिशा जयस्वाल हिच्या जबाबावरून आरोपीविरोधात कलम ११८(२), १३७, १३८भारतीय दंड संहिता, बाल न्याय अधिनियम कलम ७५ तसेच महाराष्ट्र जादूटोणा बंदी अधिनियम कलम ३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासोबतच पो.नि. रामकृष्ण जाधव यांच्या तक्रारीवरून आरोपीवर कलम २२६ भारतीय दंड संहिता अन्वये स्वतंत्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून अघोरी पूजेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## एमडी ड्रग्ज प्रकरणात

फहीम याला ताब्यात घेतले. सध्या त्याच्याकडून एमडी ड्रग्ज मिळालेली नाही, मात्र तो कुठून आणि कोणाकडून हे अमली पदार्थ आणायचा, याचा पोलिस बारकाईने तपास करत आहेत. पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणात इतर अनेक आरोपींचा उलगडा होण्याची शक्यता आहे, त्यामुळे चौकशी अधिक व्यापक केली जात आहे.

## माजी मंत्री जगदीश गुप्ता

एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या या निर्णयाचे स्वागत केले. त्यांनी समर्थकांसह पार्टीमध्ये अधिकृत प्रवेश केला. या प्रवेशासाठी जिल्ह्यातून १४ वाहनांनी समर्थक मुंबईसाठी रवाना झाले. शिर्डी मध्ये साईबाबाचे दर्शन घेऊन सर्वे मुंबईत पोहोचले आणि सायंकाळी गुप्ता यांनी समर्थकांसह पक्षामध्ये प्रवेश केला.यावेळी भाजयुमो चे जिल्हाध्यक्ष नितिन डहाके,माजी स्थायी समिती सभापती नितिन चांडक, राजू राठी , विलास रोंघे, सुरेंद्र पोपली, मनीष जोशी, सुभाष रत्नपारखी, प्रशांत महाजन, अनिल कडू, चंद्रकांत चौधरी, भास्कर मानमोडे, वासुदेव देऊलकर, कृष्णराव वानखडे, चंदुमल बिल्दानी, शंकर बुटे, दिलीप पोपट, प्रा. डॉ. राजेश जयपुरकर आनंद बक्षी ,प्रशांत तायडे, विनोद डागा, सुधीर बोपुलकर, दिलीप झाडे, रविंद्र भुयार, राजकिशोर दायमा, संतोष गुप्ता, अरुण लवणकर, विजय गुप्ता, विजय पांडे, कमल पंजवानी, संदीप पटवा, राजू बिलगये, सुनिलसिंह चौहान, राजेंद्र माहुरे, दीपक खैरकर, मनोहर भारसाकले, प्रकाश डोफे, आशीष खाडेकर, गजानन चौधरी, गंगाराम चौधरी, नीलेश कदम, विनोद शिरसाट, प्रशांत हिवराले, मोहन मिश्रा, संजय देशमुख, कैलाश लड्डा, राजेश हुतके, नीलेश मोहोड, नीलेश गुप्ता, प्रशांत तायडे, श्याम गावंडे, मुकेश उसरे, प्रमोद पांडे, राधेश्याम गुप्ता, श्यामसुंदर कारेगांवकर, रविंद्र भुयार, संतोष गुप्ता, मंगेश डहाके, सोहनलाल कुरील, विजय गुप्ता, गणेश रेखे, प्रकाश गुप्ता, चंद्रकांत चौधरी, संतोष मिश्रा, चंद्रकांत यादव, किशोर गंगवानी,अशोक जोशी, अनिल चौधरी, गजानन फरकाडे, जयंत देशपांडे, शशांक सुतलार, विनोद आष्टोनकर, भूषण डहाले, अनुराग काले, राजेंद्र राठी, संजय चव्हाण, विजय साखरकर, अनिल वानखडे, रणजितसिंह खमारे,अनिल तराले, कन्हैया बुंदेले, दीपक चव्हाण, रंजन पवार, चंद्रकांत घोगरे, चंद्रकांत उंबरकर, श्यामकांत चौधरी, नंदकिशोर बाचे, विनोद टाकोरे, तेजेंद्र मंजलवार, तनिश लड्डा, उत्कर्ष साहू, प्रफुल ठवले, आदित्य यादव, जयंत ढोले, करण देशमुख, आशीष राजा, विवेक मिश्रा, यश साहू, नयनसिंह परिहार, रोहन सावरलाल, यश मोहोड, यश सावले, जितेंद्र बघेल, निकेश डोले, किशोर काटोलकर, प्रशांत वैद्य, प्रवीण पाटिल, प्रमोद लवणकर,पंजाब गोफणे, भगवानसिंह चौहान, संजय वानखडे, नाना तिडके, गोवर्धन रेवस्कर, देवेंद्र आसरे, अशोक जगताप, नितिन साटोटे, भगवान बेनिवाल, गौरव बोर्डे, सुरेश यादव, श्रीकांत वानखडे, कमलकिशोर गुप्ता, सुधीर बोपुलकर, योगेश कथले, सुनील शिरभाते, रुपेश पाटिल, प्रवीण माहुले, नरेंद्र काटोले, प्रफुल भेंडे, प्रणय हजारे, वासुदेव देऊलकर, पंकज काजे, विठ्ठल कंचनपुरे, सेवकराम लोखंडे, मनोज पोपटानी, संजय पाटिल, गोपाल करुले, महेश हेडा, अश्विन कोरट, विजय पांडे, संतोष गुप्ता, अनिल कैथवास, ओम पंचारिया, राजेश तिवारी, अमोल सूर्यवंशी, शरद राजणकर, छत्रपति ओगले, संतोष ठाकुर, संतोष रेचे, अनिकेत कडू, छोटू वानखडे, रामचंद्र गुप्ता, मधुलाल साहू, रवि साहू, केकराज धोटे, संजू साकेत,परमानंद अहेरवार, दिलीप हारडे, खुशाल जोशी, पवन दुबे, गणेश चढार,धीरज यादव, सुरजीत संधु, अजय शिंदे, रोहित जाधव, रितिक सोळंके, अतुल काळे, गजानन खंडारे, विकास गायकी, विजय पिंजानी, प्रदीप कापडी, सुरेश यादव,माजी स्थायी समिती सभापती नितिन चांडक सह जुगलकिशोर कासट, किशोर गोयनका, संदीप पटवा, मनोज खंडेलवाल, विनोद डागा, कैलाश लड्डा,राज गुप्ता सह इतरांचा सहभाग होता.

## भानखेडामध्ये घरफोडी

पोत १० ग्रॅम ३० हजार असा एकूण, ३ लाख ६२ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माहितीनुसार संजय अंबादास शिंदे (वय ३५, भानखेडा) आपल्या कुटुंबीयांसह पंधरा दिवसांसाठी मध्यप्रदेश येथील बैतूलला गेले होते. गावी जाण्यापूर्वी संजय शिंदे यांनी आपले मेहुणे सुरेश मांडवकर यांच्याकडून २ लाख रुपये कॅश प्लॉट घेण्यासाठी घेतले होते आणि पैसे कपाटात ठेवून ते कुटुंबियांसह बैतूल येथे गेले. १ जुलै रोजी संजय शिंदे यांना त्यांच्या चुलत भावाचा फोन आला.त्याने सांगितले की तुमच्या घरातील दाराचा कुलूप कोंडा तुटलेला दिसत आहे. हे माहित झाल्यावर संजय शिंदे त्याच दिवशी परत आले आणि त्यांनी घरात येऊन पाहिले तर घरातील पूर्ण सामान इकडे तिकडे पडलेले होते.कपाटमध्ये ठेवलेले २ लाख कॅश आणि पत्नीचे दागिने गायब होते. या संदर्भात त्यांनी बनडेरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली.पोलिसांनी तपास करून आरोपी विशाल विजय सिंगर याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपयुक्त गणेश शिंदे, सहाय्यक आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बडनेरा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण, क्राईमचे प्रफुल गीते, संदीप हिवाळे, डीबी पथक प्रमुख सुधीर प्रांजले, रोशन निसंग, शशिकांत शेळके, विशाल पंडित, धनराज ठाकूर, मोहम्मद समीर, शुभम कटूकार यांनी केली.

## एसटीची दुचाकीला जबर

मोहम्मद शमीम याने दुचाकीवर दोघांना बसवून घेतले आणि तिघेही अमरावती कडे निघाले. दरम्यान मागून येणाऱ्या चिमूर-अमरावती बस क्र. एम.एच.४०,सीएम ४४१८ ने पिंपळविहिर नजीक दुचाकीला मागून धडक दिली.या अपघातात मागे बसलेली महिला गंभीर जखमी झाली तर महिलेचा पती राजेश व दुचाकी चालक शेख मुख्तार मोहम्मद शमीम हे जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तिघांनाही अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच विजया पवार यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय चमूने सांगितले.नांदगाव पेठ पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

## कोर्ट परिसरातून बंदीचे

तीन महिन्यापूर्वी अटक करण्यात आली होती. तेव्हापासून तो कारागृहामध्ये होता. सोमवारी त्याची पेशी असल्यामुळे पोलीस कर्मचारी त्याला घेऊन कोर्ट परिसरात आले होते. यावेळी त्याने पोलिसांची नजर चुकवत येथून पलायन केले. मात्र त्याला पोलिसांनी काही वेळातच अटक केली.

## आ.प्रवीण तायडे यांच्या

आमदार म्हणून निवडून येताच आ. प्रवीण तायडे यांनी कामगारांना ही बंद फिनले मिल पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. पण आश्वासनाची पूर्तता न करणारे अनेक नेते मंडळी आपण पाहिलेले आहे .याला अपवाद मात्र अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे असून गेल्या काही दिवसांपूर्वीच त्यांनी अचलपूर शहरातील बंद फीनले मील येथे कामगारांसोबत ठिय्या आंदोलन केले होते. याची दखल केंद्र स्तरावर घेण्यात आली होती. यानंतर आज ७ जुलै रोजी दिल्ली येथे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे व मिल कामगार प्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये आमदार प्रवीण तायडे यांनी गेल्या ३१ महिन्यापासून थकीत कामगारांचे वेतन आणि कोरोना काळापासून मील बंद असल्याने कामगारांवर येणारी उपासमारीची वेळ असे विविध समस्या त्यांनी मांडल्या.

आमदार प्रवीण तायडे हे सुरुवातीपासूनच बंद फिनले मिल पुन्हा सुरू करण्यासाठी आग्रही आहे. या संदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी ,अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे ही पाठपुरावा केला होता. या प्रयत्नांची फलश्रुती म्हणून अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्यासोबत आज केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली .यावेळी विविध विषयावर सविस्तर सकारात्मक चर्चा करण्यात आली यातून आता सकारात्मक निर्णय होणार अशी आशा व्यक्त केली जात आहे. लवकरच राज्य व केंद्र शासन राज्यातील बंद एनटीसी च्या सात मिल संदर्भात कोणता निर्णय घेणार ? आणि बंद फिनले मिल पुन्हा सुरू होणार का ? याकडे आता संपूर्ण अचलपूर मतदार संघासह राज्याचे लक्ष लागलेले आहे . या बैठकीमध्ये आमदार प्रवीण तायडे यांच्यासोबत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रमोद कोरडे, शहराध्यक्ष कुंदन यादव ,विशाल काकड, रूपेश ढेपे,राजा ठाकूर, दिनेश उघडे ,सचिन जिसकार व एनटीसी चे दिल्लीतील अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## दर्यापूर तालुक्यात ७४

जमातीसाठी ४ अशा पद्धतीने सरपंच पदासाठी एकूण ७४ ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. या सरपंच पदाच्या सोडतीत अनेक फेरबदल झाले असून कही खुशी कही गम अशी स्थिती निर्माण झाली आहे. गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या मातब्बरांचे स्वप्न धुळीस मिळाले आहे. तर अनेकांना अनपेक्षित लॉटरी लागल्याचे चित्र दिसत आहे. एकूण ७४ ग्रामपंचायतीपैकी ३८ ग्रामपंचायतीवर महीलाराज असणार आहे.

**यात्प्रमाणे आरक्षण सोडत -**

**अनुसूचित जाती,जमातीसाठी आरक्षण-**

पेठ इतबापूर,शिवर बु.,तेलखेडा,कळमगव्हाण,नाचोना, सांगळूद,लासूर, माटरगाव,बेबळा बु., कोळंबी, कान्होली,थिलोरी, टाकळी,करतखेडा, शिंगणावाडी,चंद्रपुर,गौरखेडा या गावांचा समावेश झाला आहे. तर अनुसूचित जमातींच्या सरपंच पदासाठी घड़ा,एरंडगाव,टोगलाबाद,गायवाडी या ग्रामपंचायती आरक्षीत झाल्या आहेत.

**नागरिकांच्या मागास प्रवर्गः**

येवदा,सासन रामापूर,वडनेर गंगाई,अडूळा बाजार,दारापूर, वडाळगव्हाण,शिंगणापूर,नांदरुण, रामगाव, पिंपळखुट,आमला, नालवाडा, उमरी इतबारपूर, पिंपळोद,जसापूर,लोतवाडा,वडुरा,माहुली धांडे,सुकळी,भामोद

**सर्वसाधारण प्रवर्गासाठी ः**

सामदा, इटकी,नरदोडा, उपराई,वरुड बु,धामोडी, घोडचंदी,चांडोळा, रुस्तमपूर, गोळेगांव, हिंगणी मिर्झापूर,मार्कडा, खैरी,नायगाव, महिमापूर,कळाशी, बेलोरा,खल्लार, आराळा, बोराळा, चंडीकापूर,नांदेड बु ,सासन बु,जैनपूर,पनोरा,म्हैसपूर मोचर्डा,सांगवा बु.,नरशिगपूर, रामतीर्थ,डोंगरगाव,लेहगाव,शिरजदा,ऊमरी ममदाबाद

## अचलपूर तालुक्यात सरपंच

गटासाठी ४३ ग्रामपंचायती आरक्षित आहेत, यामध्ये १४ महिला व २९ पुरुष उमेदवारांसाठी खुल्या जागा आहेत.

या आरक्षणामुळे ग्रामीण नेतृत्वात सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्वाची संधी मिळणार असून महिलांचे प्रमाण देखील लक्षणीय आहे. महिलांसाठी राखीव जागांची वाढ ही स्तुत्य बाब मानली जात आहे.

**पारदर्शक प्रक्रिया:**

आरक्षण निश्चित करताना लोकसंख्येचा सांख्यिकीय आधार, मागील आरक्षण चक्र, मागासलेपणा, महिला सक्षमीकरण यांचा विचार करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. यामुळे विविध समाजघटकांमध्ये राजकीय सहभाग वाढेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

**निवडणूक कार्यक्रमाची प्रतीक्षा :**

सरपंच आरक्षण यादी जाहीर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष निवडणूक कार्यक्रमाकडे लागले आहे. संभाव्य उमेदवारांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. विविध गावांमध्ये राजकीय हालचालींना गती मिळाली असून, येत्या काळात प्रचार आणि स्थानिक समीकरणे रंगतील, हे निश्चित.

## संशयास्पद मृत्यूः घातपात

मृत्यू झाल्याची माहिती त्यांच्या पत्नी व मुलाने नातेवाइकांना दिली. माहिती मिळताच भावंडे व इतर नातेवाईक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मृत्यूवर संशय व्यक्त करत पोलिसांत धाव घेतली. मृतकाचे भाऊ आणि पुतण्या यांनी तक्रारीत नमूद केले की, संतोष यांचा मृत्यू अचानक झालेला नसून त्यांना काहीतरी घात करून ठार करण्यात आले आहे. संतोष यांच्या भावांनी शवविच्छेदनाची मागणी केली, परंतु पत्नीने त्याला नकार दिला. यामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली. पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त ठेवत दोन्ही बाजूंची समजूत घातली. अखेर रात्री २ वाजताच्या सुमारास मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. मृतकाच्या भावाच्या सांगण्यानुसार, संतोष यांना पत्नीने सात-आठ वर्षांपूर्वी अमरावतीला आणले. गावातील घर व प्लॉट विकायला लावून दत्तवाडीत स्थायिक केले. तीन मुली आणि एक मुलगा असूनही त्यांच्याकडे योग्य लक्ष दिले जात नव्हते. त्यामुळे ते मानसिक तणावात होते आणि याच तणावातून मृत्यू ओढवला, असा आरोपही नातेवाइकांनी केला. शवविच्छेदनानंतर शेवटचे संस्कार कोठे करावेत, यावरून पत्नीच्या नातेवाइक व भावांच्या कुटुंबीयांमध्ये वाद झाला. एकीकडे गावात नेण्याचा आग्रह होता, तर दुसरीकडे अमरावतीतच अंतिम संस्कार करण्याचा आग्रह होता. पोलिसांनी हस्तक्षेप करत समजूत काढली आणि अखेर अमरावतीत अंत्यसंस्कार पार पडले.

**शवविच्छेदन अहवालाकडे लक्ष-**

खोलपुरी गेट पोलीस ठाण्याचे अधिकारी म्हणाले, 'शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होईल. सद्यस्थितीत मर्ग दाखल करण्यात आला आहे.' मात्र, संतोष यांचे भाऊ आणि पुतण्या यांचा ठाम आरोप आहे की, 'त्यांचा मृत्यू नाही, तर खूनच झाला आहे.' पोलीस यंत्रणा आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे. शवविच्छेदन अहवाल व इतर पुराव्यांच्या आधारे पुढील कारवाई होणार आहे.

# सरकारी संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीस मान्यता

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठ आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर रिक्त पदे भरल्यास नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनुसार उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर रिक्त पदांच्या भरतीस सकारात्मक प्रतिसाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आला आहे. तसेच अभियांत्रिकी शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीसही अनुकूलता दाखवण्यात आली आहे. अकृषी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर पदांचा आकृतिबंध लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत.

विधानभवन येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विविध विषयांवर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विद्यापीठांच्या प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव श्री. सौरभ, नियोजनचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू अतुल वैद्य,उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक विनोद मोहितकर, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर आदींसह अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, 'राज्यात तंत्रज्ञान विद्यापीठांची संख्या कमी असून, ही विद्यापीठे पूर्ण क्षमतेने सुरू ठेवणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी प्राप्त होतील व गुणवत्ता वाढेल. लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठात १०५ अध्यापकीय पदे, एक शिक्षक समकक्ष पदांस मंजूरी देण्यात यावी असे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले. याचबरोबर इतर विद्यापीठाप्रमाणे तंत्रज्ञान विद्यापीठात आठ कोटी रूपये दैनंदिन व प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी प्रदान



करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली. तसेच ७८८ अध्यापकीय पदे, २२४२ इतकी शिक्षकेतर पदे भरण्यात मान्यता देण्यात आली आहे.'

'उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील ५०१२ पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली आहे. तसेच व्ही.जे.टी.आय व गुरू गोविंदसिंग अभियांत्रिकी महाविद्यालय नांदेड यांसह राज्यातील इतर शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठास एकूण ६०३ पदांचा सुधारीत आकृतीबंधही मंजूर करण्यात आला. तसेच ग्रंथालय अनुदानात ४० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला मा. मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली असून, हा प्रस्ताव तातडीने वित्त विभागाकडे पाठवावा,' अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

प्रोत्साहनपर विशेष अनुदान मंजूर

'अ', 'ब', 'क', 'ड' श्रेणीतील ग्रंथालयांची तपासणी करून त्यांच्या श्रेणीवाढीस तत्त्वत मान्यता देण्यात आली असून, त्यासाठी लागणा-या वाढीव अनुदानाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करावा. याचबरोबर राज्यातील १७०६ ग्रंथालयांची मान्यता रद्द केलेल्या प्रमाणात नवीन ग्रंथालयांना शासन मान्यता देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले तसेच राज्यातील ५०, ७५, १०० वर्ष पूर्ण करणा-या सार्वजनिक ग्रंथालयांना प्रोत्साहनपर विशेष अनुदान मंजूर करण्यास मान्यता दिली.

**विज्ञान व तंत्रज्ञान विभाग स्थापन करावा-** 'विज्ञान व तंत्रज्ञान काळाची गरज असताना, सर्वच विभागात आपण तंत्रज्ञानाचा वापर करीत आहोत. विज्ञान व तंत्रज्ञान विभाग अनेक राज्यात कार्यरत असून, इतर राज्यांतील कार्यप्रणालीचा अभ्यास करून, महाराष्ट्रात हा विभाग कसा सुरू करता येईल याबाबत रूपरेषा तयार करता येईल.

***- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस***

## संक्षिप्त

### राज्यातील स्मशानभूमीचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम राबवावा- अमित देशमुख

**मुंबई :** मुंबईसह महाराष्ट्रात सध्या स्मशानभूमीचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे असे नमूद करून महाराष्ट्र शासनाने राज्यातील एकूण लोकसंख्या, जन्मदर, मृत्युदर आणि क्षेत्रफळ या गोष्टींचा विचार करून हा प्रश्न सोडवण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवारी विधानसभेत या विषयावरील चर्चेत सहभागी होताना केली.आमदार देशमुख या विषयावरील चर्चेत सहभागी होताना म्हणाले की, स्मशानभूमी उपलब्धतेची मुंबई येथे खूपच गंभीर समस्या आहे, त्याचप्रमाणे राज्यात गावागावातही अलीकडच्या काळात या संदर्भातील अडचणी निर्माण होत आहेत, बहुतांश ठिकाणी शासनाने स्मशानभूमीची व्यवस्था केली आहे. काही ठिकाणी खासगी स्वरूपाची स्मशानभूमीची व्यवस्था आहे. परंतु वेगवेगळ्या समाजाची वाढलेली लोकसंख्या, वाढलेल्या वस्त्या यामुळे अनेक ठिकाणी स्मशानभूमी संदर्भात मागणी येत आहे, प्रामुख्याने सर्वसामान्य जनतेला अनेक ठिकाणी स्मशानभूमी अभावी बिकट अशा समस्येला सामोरे जावे लागत आहे, सदरील समस्या सोडवण्यासाठी शासनाने या बाबतीत व्यापक सर्वेक्षण करणे गरजेचे आहे.सर्वेक्षणाअंती एकूण लोकसंख्या, जन्मदर, मृत्युदर या गोष्टीचा सारासार विचार करून यासंदर्भात एक कालबद्ध धोरण आखण्यात यावे, या धोरणाची अंमलबजावणी करून, स्मशानभूमीची समस्या सोडविण्यात यावी अशी मागणी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी केली.

### भेसळयुक्त खाद्यतेल प्रकरणात दोषींवर कारवाई करण्यात येणार

**मुंबई :** नंदुरबार जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या तपासणीत काही खाद्यतेल नमुने अयोग्य दर्जाचे आढळून आले असून, याप्रकरणी दोषी



अधिका-यांना निलंबित करण्यात येणार असून संबंधित कंपनी बंद करण्याची कार्यवाही केली जाईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य आमश्या पाडवी यांनी प्रश्न उपस्थित केला होता.मंत्री झिरवाळ म्हणाले, दि. १० मार्च २०२५ रोजी अक्कलकुवा येथील मे. गोपाल प्रोव्हिजन या आस्थापनाची तपासणी करताना महिका ब्रँडचे रिफाईन्ड सोयाबीन तेल व कमला ब्रँडचे शेंगदाणा तेल या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. प्राप्त झालेल्या प्राथमिक अहवालानुसार हे नमुने अन्न सुरक्षा मानकांनुसार अप्रमाणित आढळले. विक्रेत्याने अपील केल्यामुळे नमुने फेरविश्लेषणासाठी सेंट्रल फूड टेक्न?ल?जिकल रिसर्च इन्स्टिट्यूट, मैसूर येथे पाठविण्यात आले आहेत.सन २०२४-२५ या कालावधीत नंदुरबार जिल्ह्यात खाद्यतेलाचे एकूण १२ नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी ५ नमुने अयोग्य दर्जाचे घोषित करण्यात आले आहेत. त्यातील २ प्रकरणांमध्ये अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत कारवाई सुरू असून उर्वरित ३ नमुने रेफरल प्रयोगशाळेकडून तपासणी अहवालाच्या प्रतीक्षेत आहेत.अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणा-यांविरोधात कठोर पावले उचलली जातील असे मंत्री झिरवाळ यांनी यावेळी सांगितले.

### बांधकामापूर्वी रक्कम अदा; 2 अभियंत्याचे निलंबन

**मुंबई :**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे लासूर येथील शाळा बांधकाम आणि मौजे गुरु धानोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामाच्या पूर्वीच १४७ लाख रुपये ठेकेदाराला अदा करण्यात आले. या प्रकरणाची प्राथमिक चौकशीअंती संबंधित जिल्हा परिषद बांधकाम विभागातील शाखा अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांचे निलंबन करण्यात आले आहे. या अधिका-यांची खातेनिहाय चौकशी पुढील दोन महिन्यात करण्यात येणार असल्याचे माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.विधानपरिषद सदस्य सतीश चव्हाण यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. यात विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, सदस्य ॲड.अनिल परब, भाई जगताप यांनीही उपप्रश्न विचारला. गोरे म्हणाले की, या बांधकामांदर्भात चौकशी करण्यात आली असून प्रत्यक्षात झालेल्या कामापेक्षा अधिकचे मूल्यांकन मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आले आहे. कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट नसतानाही देयके मंजूर करण्यात आली आहे. यासंदर्भात आदर्श कार्यपद्धती असूनही त्यानुसार ही देयके अदा केली असल्याचे त्यांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे.

### महापुरुषांबद्दल वादग्रस्त विधानावर संजय गायकवाड यांची दिलगिरी

**अकोला :**आमदार संजय गायकवाड यांनी केलेल्या वादग्रस्त विधानावर दिलगिरी व्यक्त करत विरोधक माझ्या शब्दाच्या अर्थाचा अनर्थ करत असल्याचे



सांगत आपल्या वादग्रस्त विधानावर स्पष्टीकरण दिले आहे.दरम्यान, त्रिभाषा सूत्राच्या प्रश्नावर शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी छत्रपती संभाजी राजे व छत्रपती शिवराय यांच्या बद्दल असभ्य शब्दांचा वापर करून प्रतिक्रिया दिली होती. यामुळे संपूर्ण राज्यात शिवभक्तांच्या भावना दुखावून वाद निर्माण झाला होता. त्यावर आज संजय गायकवाड यांनी दिलगिरी व्यक्त करत विरोधक माझ्या शब्दाच्या अर्थाचा अनर्थ करत असल्याचे सांगत आपल्या वादग्रस्त विधानावर स्पष्टीकरण दिले आहे. माझ्या शब्दाचा अर्थाचा अनर्थ विरोधकांनी केला, मी शिवभक्त असून माझं शिवप्रेम संपूर्ण जगाला माहिती आहे. त्यामुळे माझ्या वाक्याचा अनर्थ झाल्यामुळे ज्या शिवभक्तांची भावना दुखावली असेल तर मी माझे शब्द मागे घेतो व मी दिलगिरी व्यक्त करत आहे असं म्हणत आमदार संजय गायकवाड यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. मुंबईत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र आल्यानंतर त्यांच्यावर टीका करताना शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांची जीभ घसरली. मराठी भाषेच्या मुद्द्यावर बोलताना आणि ठाकरेंवर टीका करताना त्यांनी छत्रपती संभाजीराजे आणि शिवरायांबद्दलही अपशब्द वापरले होते.

### एकाच कुटुंबातील ५ जणांना जाळून मारले

■ संपूर्ण गावावर आरोप ■

**पाटणा/वृत्तसंस्था-**बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एकाच कुटुंबातील पाच जणांना चेटकीण असल्याच्या संशयावरुन मारहाण करुन जिवंत जाळण्यात आले. ही खळबळजनक घटना मुफस्सिल पोलिस स्टेशन परिसरातील तेटगामा गावातील आहे. गावातील



रामदेव ओरांव यांच्या मुलाचा भूताबाधा विधीदरम्यान मृत्यू झाला, तर दुस-या मुलाची तब्येत बिघडत चालली होती. यामुळेच गावक-यांनी त्या कुटुंबाला ठार मारले. मिळालेल्या माहितीनुसार, बाबूलाल ओरांव, सीता देवी, मनजीत ओरांव, रानिया देवी आणि तपतो मोसमत यांना गावक-यांनी आधी जबर मारहाण केली, त्यानंतर जिवंत जाळून ठार मारले. मृत सर्व एकाच कुटुंबातील आहेत. या घटनेनंतर गावात भीतीचे वातावरण असून, लोक घराबाहेर पडायलाही घाबरत आहेत. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी नकुल कुमारला अटक केली आहे. त्याच्यावर संबंधित कुटुंबाला जिवंत जाळण्यासाठी जमावाला प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. या घटनेतून वाचलेल्या मृताचा एकमेव वारस ललित कुमार यांनी सांगितले की, त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला चेटकीण असल्याच्या संशयावरुन जाळण्यात आले आहे. तसेच, हत्येनंतर मृतदेह नदीत फेकण्यात आले. एसपी स्वीटी सेहरावत म्हणाल्या की, ही घटना रविवारी रात्रीच्या वेळेस घडली आदिवासीबहुल भागात घडली आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हालचाली

■ निवडणूक आयोगाने बोलावली जिल्हाधिका-यांची बैठक ■

**मुंबई/प्रतिनिधी:** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एकीकडे राजकीय पक्ष कामाला लागले असून दुसरीकडे राज्य निवडणूक आयोगानेही मोहिम हाती घेतली आहे. त्यासाठीच, राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व जिल्हाधिका-यांना पत्राद्वारे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने बैठकीसाठी बोलावले आहे.



मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून राज्यातील इतर सर्व जिल्ह्यातील निवडणूक पूर्व परिस्थितीचा आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे. त्याअनुशंगाने जिल्हाधिका-यांना बैठकीसाठी काय तयारी करायची आणि काय माहिती घेउन हजर राहायचे याबाबतही सांगण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२५ हाच या बैठकीचा विषय असून १० जुलै रोजी दुपारी १२ वाजता व्हीडीओ क?न्फरन्सद्वारे ही बैठक होणार आहे. राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्या, २४८ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका आगामी काळात घेण्यात येणार आहेत. या निवडणुकीच्या (महानगरपालिका वगळून) पूर्वतयारीचा विभागनिहाय आढावा मा. राज्य निवडणूक आयुक्त व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेणार आहेत. या बैठकीमध्ये खालील विषयांचा आढावा घेण्यात येईल असे परिपत्रकच राज्य निवडणूक आयोगाने काढले आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सोबतच्या परिपत्रामध्ये माहिती तयार करून ती आयोगास पीडीपी फॉरमेटमध्ये ई-मेलद्वारे ९ जुलै २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी सादर करण्यात यावी. तसेच उक्त नमूद सर्व मुद्यांसंदर्भातील माहितीसह व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे होणा-या बैठकीस आपण व्यक्तिशः उपस्थित राहावे, ही विनंती. सदर व्हीडीओ कॉन्फरन्सची लिंक यथावकाश उपलब्ध करून देण्यात येईल असे या परिपत्रकात सांगण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने उपायुक्त राजेंद्र पाटील यांनी याबाबतचे पत्र राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना लिहिले आहे. तसेच, उपरोक्त व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे होणा-या बैठकीस आपण उपस्थित राहावे असेही सांगण्यात आले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांचे नितीन गडकरींना पत्र

पुणे-नाशिक आणि नाशिक-मुंबई राष्ट्रीय महामार्गांवर खड्डे

**पुणे/प्रतिनिधी:** पुणे-नाशिक आणि नाशिक-मुंबई राष्ट्रीय महामार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून या दोन्ही मार्गांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. वाहतुकीसाठी धोकादायक ठरत असलेल्या या रस्त्यांवर अपघातांची संख्या वाढली आहे. ही परिस्थिती लक्षात घेता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहून दोन्ही महामार्गांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केल्याची माहिती मिळाली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांना दिलेल्या पत्रात, पुणे-नाशिक महामार्ग हा औद्योगिक, व्यापारी आणि प्रवासी वाहतुकीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा असून सध्या या मार्गावर अनेक ठिकाणी खोल खड्डे



पडले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. वेळेचा, इंधनाचा आणि मनस्तापाचा मोठा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. याशिवाय, या महामार्गावर नियमितपणे टोल आकारला जात असतानाही रस्त्याच्या गुणवत्तेत व सुरक्षिततेत कोणतीही सुधारणा झालेली नाही, हे दुर्दैवी आहे असे अजित पवार यांनी या पत्रात म्हटल्याचे सांगितले जात आहे. नाशिक-मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील कसारा घाट, इगतपुरी परिसरातील खराब रस्त्यांची अवस्था, खराब दर्जाचे डायव्हर्जन आणि पुलांचे अपूर्ण काम ही वाहतुकीस धोका निर्माण करणारी बाब आहे असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे.

# मुख्यमंत्र्यांकडील गृहखात्याने होमवर्क करावे

*मुनगंटीवारांचा दांडपट्टा सुरूच; पुन्हा सरकारला घरचा आहेर*

**मुंबई/प्रतिनिधी:** माजी मंत्री भाजपचे ज्येष्ठ आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत ओवायओ(ओयो) हॉटेलच्या परवानग्यांवरून सरकारवर हल्लाबोल केला. या हॉटेलमध्ये एक तासासाठी खोली भाड्याने दिली जाते. ही कशासाठी दिली जाते हा पोलिसांच्या अभ्यासाचा विषय आहे. संस्कृती रक्षकांचे सरकार आहे, इथे जर संस्कृतीचा -हास होत असेल तर गृह विभागाने ओवायओचा अभ्यास करावा अशा शब्दात सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला घरचा आहेर दिला. विधानसभेत गृह व इतर विभागांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेताना सुधीर मुनगंटीवार यांनी ओयो हॉटेलच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. ओवायओ नावाची हाटेल चैन तयार झाली आहे. शहराच्या बाहेर ही हाटेल आहेत. या हाटेलसाठी कोणत्याही ग्रामपंचायत, नगरपंचायत, महापालिकेची परावनगी घेतली जात नाही. ओयोची किती हाटेल आहेत त्याची माहिती द्यावी अशी मागणी त्यांनी गृह विभागाकडे केली. कृषी खात्यावर बोलताना खताच्या



वापरावरून त्यांनी सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले एकीकडे आपण सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी पुरवणी मागण्यात तरतुद करतो आहे दुसरीकडे मोदी सांगत आहे की, शेतीतील खताची मात्रा कमी केली पाहिजे. तरीही संपूर्ण महाराष्ट्रत शेतक-यांना आवश्यक खताऐवजी लिंकिंग करून महागडे खत घ्यायला लावला जात आहे. ज्यावर सरकारचे अनुदान आहे. माझ्या जिल्ह्यात कोरोमंडल कंपनीला डीएपी खत द्यायचे होते, पण कंपनीने जिल्हाधिकारी, कृषी अधिकारी यांनी नियमानुसार आवंटित केलेल्या खताऐवजी त्याच विक्रेत्यांना खत दिले आणि सांगितले की शेतक-यांना सल्फर, नॅनो डीएपी, पीडीएम पॉटेश, १५-१५-१५ अशी महागडी खते घ्यायला लावली पाहिजेत.

# 'शक्तिपीठ'ऐवजी शेतक-यांचे २५ हजार कोटींचे कर्ज माफ करा

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यात विधानसभा निवडणुकांच्यापूर्वी शेतक-यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. राज्यात दररोज सरासरी ८ शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत पण कर्जमाफी होत नाही. आता विधानसभेच्या पुढील निवडणुका २०२९ मध्ये होतील तोपर्यंत राज्यात १५ हजार शेतकरी आत्महत्या करतील अशी भीती व्यक्त करताना, शक्तिपीठ महामार्गाला ८५ हजार कोटी देण्याऐवजी शेतक-यांचे २५ हजार कोटींचे कर्ज माफ करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आज विधानसभेत केली

पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेताना त्यांनी शेतक-यांच्या कर्जमाफीकडे सभागृहाचे लक्ष वेधले. अहमदपूरमधील अंबादास पवार या वयोवृध्द शेतक-यांकडे शेतीच्या कामासाठी बैल नसल्याने स्वत:लाच नांगरणीच्या कामाला जोडल्याचा फोटो वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द



झाला होता. त्यानंतर या शेतक-याची कर्जमाफ करण्यासाठी अनेकांनी धाव घेतली. एका शेतक-याचे कर्जमाफ झाले पण कोट्यवधी शेतक-यांचे कर्ज अद्याप माफ झालेले नाही. विधानसभा निवडणुकांपूर्वी महायुती सरकारने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. आता कर्जमाफीसाठी २०२९ मधील विधानसभा निवडणुकांची वाट बघायची का? असा सवाल रोहित पवार यांनी केला. शक्तीपीठ महामार्गाचा उल्लेख करताना ते म्हणाले की, शक्तीपीठ महामार्गासाठी ८५ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. रस्ते नंतर बांधता येतील. त्यापूर्वी शेतक-यांची २५ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करण्याची रोहित पवार यांनी मागणी केली. दुस-या राज्यात जाणा-या उद्योगांवरून रोहित पवार यांनी सरकारला धारेवर धरले. पूर्वी पुण्यातील हिंजेवाडीमध्ये एक क्रमांकाचे आयटी पार्क होते. पण आता या भागात प्रचंड खड्डे पडले आहेत. आता कंपन्या दुस-या राज्यात जायला लागल्या आहेत. आता हिंजेवाडीचे आयटी पार्क पाचव्या क्रमांकावर गेल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.

# निधी वाटपात मनमानी; विरोधकांचा तर विषयच नाही

**भाजप व शिंदेसेनेच्या आमदारांचीही नाराजी**

**भास्कर जाधवांची अजित पवारांवर बोचरी टीका**



**मुंबई/प्रतिनिधी:** अर्थमंत्री ठरवतील त्यांना पैसे अशा पद्धतीने अर्थखाते चालू शकत नाही. विरोधकांना तर निधी मिळतच नाही. पण भाजप आणि शिंदे गटाच्या आमदारांनाही दिल्लीतील नेत्यांकडे अर्थमंत्र्यांच्या विरोधात तक्रारी कराव्या लागत आहेत. कोणाला किती पैसे द्यायचे हे एकटे अर्थमंत्री कसे काय ठरवू शकतात? असा सवाल करत शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीकास्त्र सोडले.आज विधानसभेत गृह, कृषी, पशुसंवर्धन आदी खात्यांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा होउन त्या मंजूर करण्यात आल्या. तत्पूर्वी या चर्चेत सहभागी होताना जाधव यांनी वित्त विभागाच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका केली. कोणाला किती निधी द्यायचा याचा लेखाजोखा अर्थसंकल्पात असतो. कोणत्या मंत्र्याला, कोणत्या विभागाला किती निधी द्यायचा ते अर्थमंत्री ठरवतात. पण आता सरकारमध्ये निधी वाटपावरून आपापसात तक्रारी सुरु झाल्या आहेत. भाजप आणि शिंदे गटाचे लोक दिल्लीतील नेत्यांकडे अर्थमंत्र्यांच्या विरोधात तक्रारी करीत आहेत.

अर्थमंत्री ठरवतील त्यांनाच फक्त पैसे अशा पद्धतीने अर्थखाते चालू शकत नाही. गुहागरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला कशा प्रकारे निधी नाकारला त्याचे उदाहरण जाधव यांनी दिले. रत्नागिरीतल्या नउपैकी ८ तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. फक्त गुहागर तालुक्यात पुतळा नाही. त्यासाठी मी अर्थमंत्री अजित पवार यांना पत्र दिले. गुहागरमध्ये शिवरायांचा पुतळा उभारण्यासाठी दहा कोटी रुपयांची मागणी केली. पण अजित पवार यांनी होकारही दिला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याबाबत तरी राजकारण करू नका, अशी टीका भास्कर जाधव यांनी केली.

**पोलिस पर्यटनाला जातात काय?-** गृह खात्यावर बोलताना जाधव यांनी कायदा आणि सुव्यवस्थेवरून सरकारवर टीका करताना त्यांनी स्वत:चे उदाहरण दिले. मुख्यमंत्र्यांना एक पत्र लिहिले मात्र त्यांनी साधे उत्तर देखील दिले नाही, माझ्या घरावर पेट्रोल ब?म्ब टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, साधी विचारपूस देखील त्यांनी केली नाही. दादरला शिवसेना भवनाच्या बाहेर पार्क केलेल्या त्यांच्या मोटारीची टकटक गँगने काच फोडली. आणि मोटारीत ठेवलेली विधिमंडळ अधिवेशनाची कागदपत्रे चोरांनी चोरली. तक्रार केल्यानंतर पोलिसांनी टकटक गँगच्या शोधासाठी पाच पथके नेमली. या घटनेला दीड वर्ष झाले तरी अद्याप टकटक गँगचा पत्ता लागलेला नाही. अलीकडे काही घडले की लगेच पोलिसांचे पथक नेमले जाते. बीडमध्ये वाल्मिक कराडचा शोध घेण्यासाठी पथके स्थापन केली. पण वाल्मिक कराड स्वत:हून पोलिसात हजर झाला. शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला सरकारने पोलिस पथक नेमले आरोपी घरी सापडला. मग ही पोलिस पथके नेमकी करतात काय ? सरकारच्या पैशाने पर्यटनाला, सहलीला जातात काय? असा बोचरा सवाल भास्कर जाधव यांनी केला.

# धावत्या स्कूल व्हॅनच्या डिक्कीतून पडले विद्यार्थी

■ चालकाला पत्ताच नाही ■ रिक्षावाल्यामुळे वाचले

**अंबरनाथ/प्रतिनिधी:** अंबरनाथमध्ये धावत्या स्कूल व्हॅनमधून दोन विद्यार्थी पडल्याची घटना घडली आहे. सुदैवाने मागून कोणतेही वाहन न आल्याने या चिमुकल्यांचा जीव वाचला. मात्र त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. याप्रकरणी स्कूल व्हॅन चालकासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबरनाथच्या फातिमा शाळेच्या विद्यार्थ्यांना



घेउन सोमवारी एक खासगी स्कूल व्हॅन विमको नाक्याच्या दिशेने जात होती. नेताजी मार्केट परिसरात अचानक भरधाव स्कूल व्हॅनच्या डिक्कीचा दरवाजा उघडला आणि त्यातून दोन विद्यार्थी रस्त्यावर पडले. धक्कादायक बाब म्हणजे स्कूल व्हॅन चालकाच्या हा प्रकार लक्षातही आला नाही आणि तो तिथून निघून गेला. मात्र मागून येणा-या एका रिक्षाचालकाने हा अपघात पाहून रिक्षा थांबवली. यानंतर गंभीर जखमी झालेल्या या विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेत त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

हे विद्यार्थी पडले, त्यावेळेस मागून जर एखादा ट्रक येत असता, तर विद्यार्थी जीवानिशी गेले असते. या अपघातात एका विद्यार्थ्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून दुस-या विद्यार्थी किरकोळ जखमी झाला आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होउ लागला आहे. या अपघाताच्या घटनेनंतर पोलीस प्रशासनाला जाग आली असून त्यांनी लागलीच स्कूल व्हॅनचा चालक सोलमन सकप्पा, स्कूल व्हॅनची लेडी अटेंडंट उषा बळीद आणि कविता जाधव यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खासगी स्कूल व्हॅनच्या डिक्कीत अक्षरशः २०-२० मुलांना कोंबून त्यांची अवैधरित्या वाहतूक केली जाते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणताही उपाययोजना केल्या जात नाही. अनेक शाळांमध्ये खाजगी व्हॅन मधून विद्यार्थ्यांची वाहतूक केली जाते. त्यासाठी कोणतीही परवानगी घेतली जात नाही. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आरटीओने मंजूर केलेली स्कूल व्हॅनच अधिकृत असताना देखील खाजगी वाहनातून ही वाहतूक केली जात आहे. आज ज्या व्हॅन मधून ही घटना घडली ती व्हॅन देखील पांढ-या नंबर प्लेटची असून ती खाजगी वापरासाठी होती. मात्र त्या व्हॅनमध्ये सोयीनुसार बसण्याची वाढीव सोय करून विद्यार्थ्यांना कोंबून भरण्यात आले होते. गेल्याच आठवड्यात आरटीओ मार्फत या स्कूल बस आणि स्कूल व्हॅनवर कारवाई करण्यात आली होती. मात्र या कारवाईला न जुमानता खाजगी वाहनातून विद्यार्थ्यांची ने आण सुरू आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ मंगळवार, ८ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## डब्ल्यूसीएल मध्ये नोकरीचे आमिष दाखवून तरुणांची कोट्यवधींची फसवणूक!

■ प्रतिनिधी | अकोला ■

**अकोला आणि परिसरातील जवळपास २५ बेरोजगार तरुण-तरुणींना Western Coalfields Limited (WCL) मध्ये नोकरी देण्याचे आमिष दाखवून प्रत्येकी १० लाख रुपये वसूल करण्यात आले. एका व्यक्तीकडून २० लाख रुपयांचा व्यवहार ठरवण्यात आला होता, परंतु पहिल्या टप्प्यात प्रत्येकीकडून १० लाख रुपये घेण्यात आले. यामध्ये कोट्यवधींची फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे.**

या प्रकरणात नागपूर येथील वासुदेव हालमारे आणि अकोल्यातील दलाल आशुतोष चंगोईवाला यांनी मध्यस्थी करत हे पैसे घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे, नागपूरला नेत डमी अधिकाऱ्यांची भेटही या बेरोजगारांना घालून देण्यात आली होती, ज्यामुळे ते अधिक विश्वासात आले.

या फसवणुकीला आठ महिने उलटून गेले असून अद्याप नोकरी मिळाली नसल्यामुळे तरुणांनी पैसे मागितले असता, आशुतोष चंगोईवाला हा शिंदे गटाचे उपनेते आणि माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांच्या नावाने धमक्या देत असल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे. मात्र बाजोरियांनी या सर्व आरोपांचे खंडन करत चंगोईवाला पाच वर्षांपासून आपल्या संपर्कात नसल्याचे स्पष्ट केले आहे.

तर या प्रकरणी अकोल्याच्या सिव्हिल लाइन्स पोलीस स्टेशनमध्ये चार जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये नागपूरचा वासुदेव हालमारे आणि अकोल्याचा आशुतोष चंगोईवाला आणि दोन इतर यांचा समावेश आहे. तर या प्रकरणाचा तपास सुरू असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल अशी माहिती सिव्हिल लाईन पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक मालती कायंदे यांनी दिली.



'चंगोईवाला यांना मी ओळखतो पण तो गेल्या पाच वर्षांपासून माझ्या संपर्कात नाही. तर दुसरा नागपूर येथील रहिवासी असलेल्या व्यक्तीला मी ओळखत सुद्धा नाही. जर या लोकांनी माझ्या नावाचा दुरुपयोग केला असणार तर ही बाब गंभीर असून त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई केली पाहिजे. माझा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही.'

**गोपीकिशन बाजोरिया,** माजी आमदार, शिंदे गट

सुरुवातीला नोकरीचे आश्वासन देऊन पैसे घेतले गेले. आता धमक्या मिळत आहेत. विशेष म्हणजे याप्रकरणात फसवणूक करणारे हे राजकीय वरदहस्त असल्याचा गंभीर आरोप तक्रार दारांकडून करण्यात आला आहे.

**फसवणूक झालेल्या २५ तरुणांची नावे :** यश गुप्ता, स्वाती ढोरे, समृद्धी पवार, आनंद बोरतने, अक्षय बडगे, अमृता श्रोतरी, राहुल ठाकूर, श्रेयस देशमुख, किरण कोकुलवार, कविता सपात्कार, मकरंद व्यवहारे, पराग वाघमारे, श्रद्धा वाघमारे, जानवी चक्रपाणी, मयूर बाचांवरे, राकेश शेलार, अशोक लोडम, जयेश खुलेकर, पूजा इंगळे, दर्शन धोटे, सौरभ तागडे, शिवम बदरके, श्याम कदम, दीक्षा खुलेकर, रोशन तायडे या तरुणांचा समावेश आहे.

## पंढरपूरहून परत येणाऱ्या वारकऱ्यांच्या एसटी बसचा भीषण अपघात

■ प्रतिनिधी | बुलढाणा ■

पंढरपूरहून दर्शन घेऊन परत येणाऱ्या वाकऱ्यांनी भरलेल्या एसटी बसचा चिखलीजवळ महाबीज कार्यालयासमोर भीषण अपघात झाला. ही घटना सोमवारी ७ जुलै रोजी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास घडली. बस डिव्हायडरवर आदळून उलटली आणि या अपघातात ३० हून अधिक वा?करी जखमी झाले आहेत. यापैकी १० ते १५ जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जात आहे.

खामगाव आगाराची एमएच ४० वाय ५८३० क्रमांकाची ही बस पंढरपूरहून ५२ वा?कऱ्यांना घेऊन परत येत होती. चिखलीजवळ महाबीज कार्यालयासमोर अचानक बस अनियंत्रित झाली आणि ती डिव्हायडरवर आदळून उलटली. या धडकेत बसचे समोरील भाग पूर्णतः चुराडा झाला.



### ३० हून अधिक जण जखमी; सुदैवाने जीवितहानी नाही

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केले. चिखली पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचे काम हाती घेतले. पहाटेच्या अंधारातही अनेक नागरिकांनी जखमींना मदत केली.

या दुर्घटनेमुळे वारकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही, ही मोठी दिलासा देणारी बाब आहे. काही प्रवाशांनी हा अपघात बसचालकाच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचा आरोप केला असून, चालक झोपेत असल्याचेही काहींचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रशासनाने अशा बसगाड्यांच्या देखभालीसह चालकांच्या सतर्कतेवर लक्ष देणे गरजेचे असल्याची मागणी वारकऱ्यांनी केली आहे.

## सेवेची परंपरा जपणारा उपक्रम, मंत्री चॅरिटेबल ट्रस्टचा खिचडी वाटप कार्यक्रम यशस्वी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आषाढी एकादशी म्हणजे भक्ती, श्रद्धा आणि सेवाभाव यांचा संगम. याच भक्तिपर्वाचे औचित्य साधून मंत्री चॅरिटेबल ट्रस्ट व मंत्री परिवार यांच्यातर्फे गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या साबुदाणा खिचडी राजगिरा लाडू प्रसाद वाटप.

दरवर्षीप्रमाणे यंदाही सकाळी ११ वाजता प्रसाद वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. राम कृष्ण हरीच्या गजरात, उपस्थित भाविकांना साबुदाणा खिचडीचा गरमागरम प्रसाद वाटण्यात आला. हा उपक्रम एकादशीच्या दिवसभर अखंडपणे चालू होता. शहरातील विविध भागातून आलेल्या भक्तांनी या उपक्रमात सहभागी होत प्रसादाचा लाभ घेतला. भक्तिभाव, सेवा आणि परंपरेचा संगम या उपक्रमामध्ये मंत्री चॅरिटेबल ट्रस्टकडून केवळ प्रसाद वाटप नव्हे, तर भक्तीमय वातावरणात समाजसेवेचा भाव दिसून येतो. शिस्तबद्ध आणि प्रेमपूर्वक केलेले हे आयोजन वाशिम शहराच्या धार्मिक-सामाजिक वातावरणात एक महत्त्वाचा ठसा उमटवते. प्रसादासाठी आलेल्या वृद्ध, महिला, युवक व लहानग्यांना विशेष सहकार्य करण्यात आले. मंत्री परिवाराचा सेवाभाव उल्लेखनीय या उपक्रमात मंत्री परिवारातील सर्व सदस्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत भाविकांच्या सेवेत आपली उपस्थिती नोंदवली. त्यामागे भाविकांच्या सेवेसाठी असलेला निस्वार्थ हेतू स्पष्टपणे दिसून आला. एक परंपरा जोपासणारा उपक्रम

वर्षानुवर्षे चालणारा हा उपक्रम आता वाशिमकरांसाठी केवळ प्रसाद वाटप नसून, तो एक परंपरा आणि श्रद्धेचा भाग बनला आहे. शहरातील विविध समाजघटक, व्यापारी वर्ग, वयोवृद्ध भक्त, महिलावर्ग आदी सर्वांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४' साठी मुदतवाढ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/ छायाचित्रे/ वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता दि. १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

## आयडीबीआय बँकेचे शाखा व्यवस्थापक आशिष देशमुख यांचे अपघाती निधन

### लिंगा कोतवाल गावावर शोककळा, एकादशीही साजरी झाली नाही

■ प्रतिनिधी | रिसोड ■

शनिवार दिनांक ५ जुलै रोजी संध्याकाळी एक अत्यंत दुःखद घटना घडली. आयडीबीआय बँकेचे देगलूर शाखेचे शाखा व्यवस्थापक आशिष विजयराव देशमुख (वय २८) यांचे दुर्दैवी अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण रिसोड तालुक्यासह लिंगा कोतवाल गावावर शोककळा पसरली आहे.आशिष देशमुख हे लिंगा कोतवाल येथील माजी उपसभापती स्व. विजयराव देशमुख यांचे चिरंजीव होते. ते सध्या नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे आयडीबीआय बँकेत शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. त्यांचे राहणे हदगाव येथे असल्याने ते दररोज बुलेटवरून हदगाव ते देगलूर अशी अपडाऊन करत होते.शनिवारी सायंकाळी आठ ते साडेआठच्या सुमारास देगलूरहून बँकेचे



कामकाज आटपून घरी परतताना, रस्त्यात अज्ञात ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात आशिष देशमुख यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताचे दृश्य पाहणाऱ्यांचे डोळे पाणावले.त्यांचे शवविच्छेदन हदगाव येथे करून दुसऱ्या दिवशी रविवार, ६ जुलै रोजी लिंगा कोतवाल येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीसाठी परिसरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती, ग्रामस्थ व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात आई, दोन बहिणी, काका-काकू, भावंडे आणि आप्त परिवार असून, त्यांच्या जाण्याने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आशिष देशमुख हे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भैय्यासाहेब देशमुख आणि डॉक्टर असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. अरुण देशमुख यांचे पुतणे होते.शांत, संयमी, आणि मनमिळावू स्वभावामुळे आशिष हा गावातील सर्वांचा लाडका होता. त्याच्या अकाली निधनाने संपूर्ण गाव हळहळून गेला आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या निधनाची वार्ता गावात पसरताच आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला गावकऱ्यांनी एकादशी साजरी न करता श्रद्धांजली वाहिली.या दुर्घटनेने केवळ देशमुख परिवारावरच नव्हे, तर संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे. सामाजिक, राजकीय आणि बँकिंग क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे.

## बळींच्या मामाच्या गावाने आणला हास्य महापूर



### लोकरंग ने दिली सारं गाव मामाचं एकपात्री प्रयोगाची मेजवानी

■ प्रतिनिधी | अकोला ■

'चला हवा येऊ द्या' फेम सुप्रसिद्ध कवी व अभिनेते किशोर बळी यांच्या एकपात्री नाट्यप्रयोगाने अकोल्यात हास्याचे फवारे उडवले. 'सारं गाव मामाचं या विनोदी एकपात्री प्रयोगाचे आयोजन रविवारी, ६ जुलै २०२५ रोजी प्रमिलाताई ओक हॉल येथे करण्यात आले होते.

ग्रामीण भागातील बोली, पात्र आणि तऱ्हेवाईक स्वभाव असलेल्या व्यक्तिरेखांमधून बळी यांनी श्रोत्यांना अंतर्मुख करणारी आणि हसविणारी सादरीकरण शैली सादर केली. सादरीकरणात त्यांनी ग्रामीण जीवनातील विसंगतींवर मार्मिक विनोदाच्या माध्यमातून भाष्य केले. प्रेक्षकांनी त्यांच्या अभिनयास टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लोकरंग प्रस्तुत या नाट्यप्रयोगात खुसखुशीत संवाद, वेळोवेळी बदलणाऱ्या वेशभूषा आणि स्पष्ट, स्वच्छ विनोदीशैलीमुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. विशेषता व-हाडी बोलीचा सहज वापर आणि ग्रामीण संस्कृतीतील बारकावे यामुळे हा प्रयोग अधिक प्रभावी ठरला. लोकरंग या सांस्कृतिक व कला मंचाने आयोजित केलेल्या किशोर बळी यांच्या या प्रयोगाने अकोल्यातील प्रेक्षकांना निखळ हास्याचा आनंद दिला आहे. अशा प्रकारच्या दर्जेदार प्रयोगांची पुनरावृत्ती व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अकोल्यात अलीकडे स्थापन झालेल्या लोकरंग या संस्थेने किशोर बळी यांच्या एकपात्री प्रयोगाचे आयोजन केले होते. ही संस्था अकोल्यात रसिकांच्या मदतीने गाजलेल्या कार्यक्रमांचे सशुल्क आयोजन करणार असून दहा हजार अनामत आणि वार्षिक पाच हजार शुल्कात रसिकांना वर्षाला दोन व्यक्तींना पाच दर्जेदार कार्यक्रमांची मेजवानी दिली जाणार आहे, अशी माहिती आपल्या प्रस्ताविकात लोकरंग अध्यक्ष अनिल गावंडे यांनी दिली.

**मान्यवरांची शाबासकी :** किशोर बळी यांचा एकपात्री प्रयोग बघून त्याला आशीर्वाद देण्यासाठी अकोल्याच्या कला क्षेत्रातील अनेक दिग्गज लोकांनी हजेरी लावली होती. कलावंत दिलीप देशपांडे, कलावंत रमेश थोरात आणि हास्यजत्रा फेम कलावंत कुणाल मेश्राम यांनी सारे गाव मामाचं हा प्रयोग बघून किशोर बळी यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत या अस्सल वऱ्हाडी प्रयोगाचा डंका सर्वत्र वाजेल अशी अपेक्षा व्यक्त केली. किशोर बळी यांच्या या प्रयोगासाठी खास मार्गदर्शन करणारे ज्येष्ठ रंगकर्मी अरुणजी घाटोळे यांचा या समारंभात लोकरंगचे अध्यक्ष अनिल गावंडे आणि किशोर बळी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

**हे रसिक मायबापांचे प्रेम :** हा एकपात्री प्रयोग सादर करताना अकोलेकर रसिक मायबापानी जो अलोट गर्दी करीत प्रतिसाद दिला हे माझ्यावर त्यांनी केलेले ऋण आहे. याचे श्रेय नक्कीच सर्व चाहते आणि मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तींचे आहे. ग्रामीण जीवनातील विसंगती टिपताना विनोद येतोच मात्र त्याच्या माध्यमातून प्रबोधनाचा संदेश सुद्धा जाईल याची काळजी घेण्यात आली आहे, या प्रयोगाने हुरूप वाढला आहे आता कलेचा हा घोडा चौखूर उधळेल याची खात्री असल्याची प्रतिक्रिया किशोर बळी यांनी या प्रयोगानंतर व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन लोकरंगचे सचिव ॲड.सुधाकर खुमकर यांनी केले.

## आदिशक्ती संस्थेचा विद्याश्री शिष्यवृत्ती वितरण सोहळा संपन्न

■ प्रतिनिधी | कारंजा ■

आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था, वाल्हई यांच्या वतीने आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थितीत असलेल्या गरजू व हुशार विद्यार्थ्यांना सलग अकराव्या वर्षी ८७ विद्यार्थ्यांना 'विद्याश्री शिष्यवृत्ती' उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

विद्याश्री शिष्यवृत्ती मध्ये संबंधित वर्गाच्या विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य ज्यामध्ये स्कूल बॅग वॉटर बॅग लेटर बुक पुस्तका कंपास इत्यादी साहित्य वितरण समारंभ दिनांक ६ जुलै रोजी, रविवार, दुपारी ११ वाजता, महेश भवन, कारंजा येथे उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धीरज उजवणे, प्राचार्य नृसिंह विद्यालय, धामणी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रवींद्र



मोरे,व्यवस्थापक, कारंजा आगार कारंजा, बंडूभाऊ इंगोले,जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बहुजन पत्रकार संघ, सौ. मंदाताई ठाकूर, कोषाध्यक्ष, सौ. मृणाली तोमर सचिव,आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था, पुरुषोत्तम म्हातारमारे, मुख्याध्यापक कृष्णप्रभा विद्यालय खेर्डा, मुख्याध्यापक मोहन गोळे, व आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्थेचे संचालक प्रा. निर्मलसिंह ठाकूर उपस्थित होते.

यावेळी ८७ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या साहित्यामध्ये स्कूल बॅग, पाठ्यपुस्तके, लेटर बुक, पेन, पेन्सिल, कंपास पेटी आदींचा समावेश होता. तसेच विद्याश्री शिष्यवृत्तीच्या माध्यमातून डी.फार्म शिक्षण पूर्ण करणाऱ्या कु. मयुरी जाधव व कु. कांचन पानझाडे या विद्यार्थिनींचा विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांपैकी काहींनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. निर्मल ठाकूर यांनी करताना संस्थेच्या अकरा वर्षांच्या कार्याची प्रेरणादायी मांडणी केली. बंडूभाऊ इंगोले यांनी संस्थेच्या सातत्यपूर्ण कार्याची प्रशंसा करत इतरांनीही या कार्यातून प्रेरणा घ्यावी असे सांगितले. रवींद्र मोरे यांनी संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत भविष्यात सहकार्य करण्याची तयारी दर्शवली. मोहन गोळे यांनी विद्यार्थ्यांना होणाऱ्या फायद्यांविषयी आपले विचार मांडले. अध्यक्ष धीरज उजवणे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, 'गेल्या अकरा वर्षांपासून या संस्थेशी जोडले गेलो असून, अनेक विद्यार्थ्यांनी या माध्यमातून शिक्षण पूर्ण करून यशाचे शिखर गाठले आहे.' कार्यक्रमाचे संचालन हेमंत पापळे यांनी केले, तर आभार गोपाल कदम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विजय भड, संतोष नेमाने, आनंद पेंटे, गोपाल लुंगे, विशाल वैद्य, अनिल बैस, जाधव व गजानन गावंडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## सहकार पुरस्कारासाठी सहकारी संस्थांकडून प्रस्ताव मागविले; १८ जुलै प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्यातील सहकार चळवळीमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या सहकारी संस्थांचा गौरव करण्यासाठी शासनामार्फत सहकार पुरस्कार देण्यात येतो. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारे या पुरस्कारासाठी संस्थांची निवड होणार असून इच्छुक सहकारी संस्थांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव १८ जुलै २०२५ या कालावधीत संबंधित तालुका सहायक/उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह दाखल करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. या पुरस्कारांमध्ये सहकार महर्षी - १, सहकार भूषण - २१ आणि सहकार निष्ठ - २३ पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कारासाठीचे निकष, गुणपद्धती व सविस्तर माहिती https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच जिल्हा व तालुका निबंधक कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे.

सहकार क्षेत्रातील संस्थांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून करण्यात आले आहे. असे आर. आर. सावंत सहाय्यक निबंधक (प्रशासन) अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांनी कळविले आहे.

## शेतकरी–शास्त्रज्ञ संवादातून शेतीला नवी दिशा

### अकोला कृषी विद्यापीठाचा उपक्रम प्रभावी ठरत आहे!

■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्यातर्फे सुरु करण्यात आलेल्या शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद मंचातून विदर्भातील शेतकऱ्यांना आधुनिक, शाश्वत व फायदेशीर शेतीसाठी योग्य मार्गदर्शन मिळत असल्याने हा उपक्रम प्रभावी ठरत असल्याचे चित्र आहे.

कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या संकल्पनेतून, तत्कालीन संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली हा मंच विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये स्थापन करण्यात आला. या मंचाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पेरणीपूर्व मशागत, माती-पाणी परीक्षण, योग्य पीक निवड, बीज प्रक्रिया, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, उत्पादन ते विपणन आणि प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती वेळेवर मिळते.

या शृंखलेत, नवनियुक्त संशोधन संचालक डॉ. श्यामसुंदर माने यांच्या मार्गदर्शनात, तेलबिया संशोधन केंद्राचे डॉ. संतोष गहुकार



यांच्या नेतृत्वात अलीकडेच बार्शीटाकळी तालुक्यातील जलालाबाद, वरखेड आणि वाघजई या गावांमध्ये शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद सभा पार पडली. या सभांमध्ये शेतकऱ्यांना पेरणीपूर्व काळजी, रुंद सरी वरंबा पद्धतीने सोयाबीनची पेरणी, बियाण्याची निवड व उगम तपासणी, बीज प्रक्रिया याचे महत्त्व पटवून देण्यात आले. कीड व रोग व्यवस्थापनासाठी सेंद्रिय व वैज्ञानिक उपायांवरही चर्चा झाली.

१ जुलै २०२५ रोजी कृषी दिन जलालाबाद आणि वरखेड येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन साजरा करण्यात आला. यावेळी पिकांच्या प्राथमिक अवस्थेतील कीड-रोग नियंत्रण, खत व्यवस्थापन, तन नियंत्रण यासंबंधी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.

सभेसाठी तेलबिया संशोधन विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. प्रशांत माने, कीटकशास्त्रज्ञ डॉ. मनीष लाडोले, पीक पैदासकार डॉ. मंजुषा गायकवाड, वनस्पती रोगतज्ज्ञ डॉ. भारत फरकाडे उपस्थित होते. मंचाचे सदस्य श्री. निवृत्ती थोरात, नामदेव थोरात, शंकरराव ठाकरे, महादेव ठाकरे, विठ्ठल मुंढे, सुरेश शेंडे, राजेश शेंडे यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते. शास्त्रज्ञ व शेतकरी यांच्यातील हा थेट संवाद शेतीत नवनवीन प्रयोगांना चालना देत असून, शेती शाश्वत व नफ्यावर नेण्याचा निर्धार यातून दिसून येत आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २२३ ■ मंगळवार, ८ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# सोनिया ठरली शिक्षणाची बळी.. शिक्षण यंत्रणा अजून किती बळी घेणार.. !

**विरुळ / सचिन देवताळे :** दोन दिवसांपूर्वी देवळी तालुक्यातील लोणसावळी गावातील एका तरुण मुलीने शिक्षणासाठी पैसे नसल्याने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला असुन समाजमन हेलावले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत वेगवेगळ्या कारणावरून आत्महत्या झाल्या.परंतु बारावीच्या प्रवेश फी आपले आई वडील गरीबीमुळे भरू शकत नाही. याचा पश्चात्ताप मनात ठेवत या तरुणीने आत्महत्या केली. ही जिल्ह्यातील पहिलीच घटना आहे. एकीकडे राज्य सरकार फुशारकी मारून मुलींना शिक्षण मोफत असल्याचा गवगवा करीत मोठमोठ्या जाहिराती करतात तर ग्रामीण भागातील मुल मात्र शिक्षणासाठी पैसे नाही म्हणून आत्महत्या करतात ही या महाराष्ट्र राज्याची शोकांतिकाच म्हणावी लागेल.



काय दोष होता या मुलीचा.आई वडील गरीब आहे. वेळेवर मुलांच्या शिक्षणासाठी पैसे नाही पुरवु शकतात त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी हुशार असुनही तो केवळ आपल्या आर्थिक परिस्थिती मुळे मागे राहतो.आणि याच गरीब परिस्थितीमुळे आज या तरुणीचा मृत्यू झाला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. शासनाच्या विविध योजना शिक्षणासाठी आहे. परंतु या योजनेची अंमलबजावणी बरोबर होत नसल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अजुनही केवळ पैश्यामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याचे दिसून येत आहे. फक्त रोज खिचडी खाऊ घालण्यात हे शासन धन्यता मानत आहे. विद्यार्थ्यांना खिचडी खाऊ घालुन शिक्षणाचा दर्जा सुधारणार नाही तर योग्य वेळी शिक्षणासाठी मुलांच कुठे अडते मुल पैशामुळे शिक्षण घेऊ शकत नाही का. यावर शिक्षण क्षेत्रातील विविध तज्ञांनी यावर तोडगा काढण्याची गरज आहे. नाही तर ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी पैसे नाही मिळाल्याने आत्महत्या सारखे पाऊल उचल्या शिवाय राहणार नाही,हे मात्र तेवढेच खरे.. अत्यंत घरची आर्थिक परिस्थिती असलेल्या सोनिया उईके या तरूणीने जो दुर्दैवी नि णय घेतला. हा जरी योग्य नसला तरी शासनाने या गंभीर गोष्टी कडे लक्ष वेधून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कोणतीही अट न ठेवता शिक्षण मोफत करण्याची गरज आहे. नाही तर गरीबांचे मुले हुशार असुनही ते विविध शिक्षण क्षेत्रात जाऊ शकणार नाही..या दुर्दैवी घटनेची माहिती समजताच आज खासदार अमर काळे यांनी लोणसावळी गावात भेट देऊन उईके कुटुंबाचे सांत्वन केले. यावेळी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष मनोज चांदुरकर उपस्थित होते.

विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना वर्धा जिल्ह्यात घडली. या घटनेनंतर सगळीकडे खळबळ माजली आहे.

यावेळी खासदार अमर काळे त्या मृतक विद्यार्थ्यीच्या घरी गेले आणि परिवारांचे सांत्वन केले, यावेळी खासदार म्हणाले शिक्षणाकरिता मुली आत्महत्या करीत आहे. यापेक्षा दुसरी लाजिरवाणी गोष्ट कोणतीच नसावी. राज्यात लाचार करणाऱ्या योजना आल्या आहे, त्या लाचार योजनांचे नाव घेणार नाही, पण राज्य सरकारने सुरू केलेल्या ज्या योजना आहेत. त्या लोकांना लाचार करीत आहे. परंतु शिक्षणावर दुर्दैवाने खर्च होताना दिसत नाही. आतापर्यंत महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या. पण आता शाळकरी विद्यार्थी सुद्धा आज आत्महत्या करीत आहे. हे पुरोगामी महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी बाब आहे. दुर्दैवाने वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर हे शिक्षण राज्यमंत्री आहे. शिक्षण मंत्र्यांच्या जिल्ह्यातच विद्यार्थिनीने आत्महत्या केली आहे, यापेक्षा दुसरी लाजीरवाणी गोष्ट नाही. आणि अजून पर्यंत शासनाचा एकही जबाबदार अधिकारी या ठिकाणी आला नसल्याचे देखील खासदार अमर काळे त्यांनी खंत व्यक्त केली,

# राज्यात रिक्त पदांसाठी लवकरच 'मेगा भरती' -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई जनमाध्यम :** राज्य शासनाने सर्व विभागांना १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमांतर्गत आकृतीबंध, नियुक्ती नियम (रिक्रुटमेंट रूल) सुधारित करणे, अनुकंपा तत्वावरील भरती १०० टक्के करणे, आदी उद्दिष्टे दिली आहेत. या उद्दिष्टपूर्तीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती समोर आल्यावर या रिक्त पदांसाठी राज्य शासन 'मेगा भरती' करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.



अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदांच्या भरतीबाबत सदस्य भीमराव केराम यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेदरम्यान सदस्य डॉ. नितीन राऊत, नाना पटोले, भास्कर जाधव, सुरेश धस यांनीही उपप्रश्न उपस्थिती केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील काळात शासनाने ७५ हजार पदभरतीचा कार्यक्रम जाहिर केला होता. त्यानुसार एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती करण्यात आली. शासन पदभरतीबाबत कुठेही मागे पुढे पाहणार नाही. राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६,८६० पदांवर जात वैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेले कार्यरत आहे. मात्र त्यांना २० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. अशा पदांबाबत शासनाने मानवतापूर्ण दृष्टीने विचार करीत ही पदे अधिसंख्य केली. या पदांवर कार्यरत असलेल्यांना बढती मिळणार नाही. पण शासन त्यांना पदावरून कमीही करणार नाही. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर ही पदे व्यपगत होतील. अनुसूचित जमाती प्रवर्गातील बिंदूनामावलीनुसार एकही राखीव पद रिक्त ठेवण्यात येणार नाही.

अधिसंख्य असलेली ६ हजार ८६० पदे अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी भरती करण्याकरिता रिक्त झालेली आहे. त्यापैकी १३४३ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांवर भरती केलेली आहे. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ब्लॉक चेन पद्धतीवर अभिलेखा आणण्याबाबत शासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी करताना कागदपत्रे तपासणे सोयीचे होईल. तसेच जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना सक्षम करण्यात येत आहे. अधिक वेगाने आणि पारदर्शकपणे वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत सचिवांचा गट तयार करण्यात येईल. या गटाच्या माध्यमातून अभ्यास करून कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने सफाई कामगारांची पदे वारसा हक्काने भरण्याबाबत असलेली स्थगिती उठवलेली आहे. लाड – पागे समितीच्या शिफारशीनुसार ही पदे वारसा हक्काने भरण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीच्या पदांसाठीही भरतीही करण्यात येणार आहे.

# संत्र्याच्या झाडाला मृग बहार येत नसल्याने शेतकऱ्याने संत्राची बागच तोडून फेकली

**कारंजा जनमाध्यम :** तालुक्यात संत्रा बागायतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. जसापूर येथील युवा शेतकरी किशोर बन्नगरे यांनी तीन एकरात दहा वर्षांपूर्वी संत्रा बाग लावली. त्यानंतर लहान मुलासारखे संत्रा बागेचे संगोपन केले. मात्र, या संत्रा बागेला कधीही फळ न आल्याने शेतकरी हताश झाला. अखेर त्यांनी संत्रा बाग शेतातून तोडून फेकली.



बन्नगरे यांना संत्रा झाडाला कधी तरी बहार येईल अशी आशा होती. परंतु, यावर्षी मे महिन्यात अवकाळी पाऊस झाला आणि त्याचा फटका संत्रा बागेला पडला. यामूळे यावर्षी संत्रा बागेला मृग बहार न आल्याने शेतकऱ्याला संत्रा बागेवर कुऱ्हाड चालवावी लागली.

संत्रा बाग ही शेतात लावण्यापासून तर फळ येईपर्यंत मोठ्या प्रमाणात त्यावर खर्च करावा लागतो. लहान बाळासारखं या बागेच संगोपन करून कधीतरी संत्रा बागेला संत्रा येईल अशी शेतकऱ्यांला अपेक्षा असते.

मात्र ही अपेक्षा कालांतराने फोल ठरल्यावर शेतकरी हताश झाल्यानंतर शेतातील संत्रा बाग तोडावी लागली. संत्रा बाग असल्याने त्यात अंतर्गत कोणतेही उत्पन्न घेता येत नाही. त्यामुळे आता या बागेला शेतात ठेवून काही उत्पन्न येत नसल्याने शेतकऱ्यांने चक्क शेकडो संत्रा झाड तोडून फेकली. आता तरी सरकारला जाग येऊन आर्थिक मदत देण्यात येईल, का अशी मागणी शेतकरी करीत आहे.

# विठु नामाच्या गजरात रंगली सिंदीनगरी आषाढी एकादशीला निघाल्यात १६ दिंड्या

## -महिला भजनी मंडळाचा उत्स्फूर्त सहभाग

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम -** देवशयनी आषाढी एकादशी निमित्त शहराच्या विविध भागांतून टाळ मृदंगाच्या गजरात, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन महिला व पुरुष भजनी मंडळींनी दिंड्यांसह भाग घेत विठु नामाच्या गजरात अवघी सिंदी नगरी रंगुन पंढरपूर अवतरल्याचे वातावरण निर्माण झाले.

शहरातील प्रत्येक दिंडीत महिलांची उपस्थिती लक्षणीय होती,हे विशेष!



शहरातील नंदा नदीच्या तिरावरील सार्वजनिक विठ्ठल रुक्मिणी मंदीर तसेच कोष्टी पुऱ्यातील सार्वजनिक विठ्ठल रुक्मिणी मंदीर आणि पोष्ट कार्यालयाजवळील सार्वजनिक विठ्ठल रुक्मिणी मंदीर आशा तीनही शहरातील मंदीरात पाहाटे मान्यवरांच्या हस्ते विधीवत अभिषेक, अभ्यांग स्नान,धुप आरती,पुजन करण्यात आले. सकाळपासुन या मंदीरात दिवसभर दर्शनासाठी भावीकांची प्रचंड गर्दी केली होती.सोबतच भजन ,कथा वाचन,प्रसाद वाटप सुरु होते.

शहरातील अनेक मंदीरातुन असंख्य महीला-पुरुष भजन मंडळांच्या सहभागाने दिंडी सोहळ्याला सुरुवात झाली.हि दिंडी शहरातील प्रमुख मार्गावरून फिरत आप आपल्या मंदीरात समारोप झाला.शहरात ठिकठिकाणी भावीकांनी दिंडीचे पुजन करुन अल्पोहाराचे प्रसादाचे वाटप करण्यात आले.

दिंडीतील महीला भजनीं मंडळाचा सहभाग लक्षणीय होता.डोक्यावर तुळसी,विवीध संतांच्या वेशभुषेतील चिमुकले आणि टाळ मृदुंगाच्या गजरात विठु नामाच्या गजराने संपूर्ण शहर विठ्ठलमय झाले होते.शिवाय विठ्ठल भक्तीत महिलांनी घातलेली फुगडी, नृत्य सिंदीकरांचे लक्ष वेधुन घेत होते.

# आ. बकाने यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुलगावच्या विकासासाठी १०० कोटींची मागणी

**पुलगाव जनमाध्यम :** शहराचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आ. राजेश बकाने यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मंत्रालयात भेट घेऊन पुलगाव समृद्धी विकास आराखड्यांतर्गत १०० कोटी रुपये निधीची मागणी करणारे निवेदन दिले.



पुलगाव शहरास भारतातील प्रमुख रेल्वे मार्ग व मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्गाची जोड मिळालेली असून आशिया खंडातील सर्वात मोठे केंद्रीय दारूगोळा भांडार आहे. या भागात जवळपास ४ हजार सैनिक कुटुंबांसह ३७ हजारापेक्षा जास्त लोकसंख्या, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऐतिहासिक वास्तव्य यामुळे पुलगाव शहरास विशेष ओळख प्राप्त झाली आहे. याशिवाय संलग्न असलेली नाचणगाव ही राज्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असून या परिसरात नागरी सुविधा, औद्योगिक वाढ आणि वाहतूक सुलभतेसाठी विशेष आराखड्याची गरज असल्याचे आ. बकाने यांनी यावेळी स्पष्ट केले. २५ वर्षांत विकास कामांचा मोठा अनुशेष राहिल्याचे त्यांनी नमूद केले. पुलगाव शहराच्या सर्वांगीण आणि सुनियोजित विकासासाठी पुलगाव समृद्धी विकास आराखडा राबवून १०० कोटींच्या नावीन्यपूर्ण निधीची तरतूद करण्यात यावी, अशी ठाम मागणी या निवेदनातून करण्यात आली. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मागणीची गंभीर दखल घेतली असून लवकरच तांत्रिक आणि प्रशासकीय पातळीवर कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन आ. बकाने यांना दिले.

# हिंगणघाट येथे ८६ हजार रुपयांचा अवैध दारू साठा जप्त

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील पोलीस स्टेशन गुन्हे प्रगटीकरण पथकाला सोमवार ७ जुलै रोजी पेट्रोलिंग करीत असतांना खबरी कडून मिळालेल्या माहितीनुसार एक इसम निळ्या रंगाची मोपेड गाडीने दारूचा माल घेवून दाभा रोडने हिंगणघाट कडे वाहतूक करीत असलेल्या माहीतीच्या आधारावर पोलीसांनी नाकाबंदी केली असता आरोपी किशोर मोगरे (वय २७) रा.काजी वॉर्ड त्याचे ताब्यातून निळ्या रंगाची बर्गमन मोपेड गाडी क्र. एप ३२ ह्न४४५६ किं. ८०, हजार, चार प्लास्टीक पन्नीमध्ये ४० लिटर गावठी मोहा दारू की ६,००० असा जू.किं. ८६,००० रू चा माल जप्त करण्यात आला. पोलिसांनी आरोपीविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे नोंद करून आरोपीला अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन,अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. सागर कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडीत यांच्या मार्गदर्शनात येथील डि.बी.पथकाचे पोलीस हवालदार प्रशांत ठोंबरे, पो.ना राजेश शेंडे, पोशी आशिष नेवारे,पो.शि. मंगेश वाघमारे, पोशी रोहीत साठे यांनी केली. सदर गुन्हयाचा पुढील तपास हिंगणघाट पोलीस करीत आहे.



# शाळा प्रवेशासाठी पैसे नसल्याने विद्यार्थिनीची आत्महत्या अतिशय मन खिन्न करणारी बाब : खासदार अमर काळे

## -शाळा प्रवेशा करता पैसे नसल्याने विद्यार्थिनीने घेतला गळफास

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील लोणसावळी येथील इयत्ता बारावीच्या विद्यार्थिनीला शाळा प्रवेशासाठी पैसे नसल्याने विद्यार्थिनीने गळफास घेऊन जीवन यात्रा संपवली आहे वर्ध्याच्या लोणसावळी या गावांमध्ये ही घटना घडली आहे. सोनिया वासुदेव उईके वय १७ वर्षे राहणार लोनसावळी असे मृतक विद्यार्थिनीचे नाव आहे. इयत्ता बारावीचे वर्ष असल्याने विद्यार्थिनीने शाळा प्रवेशासाठी आई-वडिलांकडे पैशाची मागणी केली होती मजुरीचे पैसे आल्यावर प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन सुद्धा आई-वडिलांनी दिले होते शैक्षणिक सत्र सुरू होऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करू न शकल्याने हाताश झालेल्या विद्यार्थिनीने अखेर गळफास घेत जीवन यात्रा संपवली आहे.अतिशय मन खिन्न करणारी बाब आहे अशी भावना खासदार अमर काळे यांनी व्यक्त केली आहे , मुलीच्या कुटुंबाला खासदार अमर काळे यांनी दिली सांत्वन भेट देत कुटुंबीयांचे सांत्वन करत विचारपूस केली,शाळा प्रवेशासाठी पैसे नसल्याने विद्यार्थी आत्महत्या करत आहे,आज पर्यंत शेतकरी आत्महत्या करत आहे हे आपण पहात आहे,पण आता विद्यार्थी या कारणांसाठी आत्महत्या करीत आहे हे आपल्या पूरोगामी महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी बाब आहे.मोठमोठ्या योजनांवर खर्च करण्यापेक्षा शिक्षण व्यवस्था प्रगल्प करण्याची गरज दिसून येत आहे.पुढच्या काळात अशा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होऊ नये यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवे,भाजपचे लक्ष फक्त आपलं सरकार कसं येईल यावरच आहे प्रथम प्राधान्य सरकारने शिक्षणाला द्यायला हवे,अजून पर्यंत कोणताही अधिकारी कर्मचारी कुटुंबापर्यंत पोहोचला नसल्याची खंत अमर काळे व्यक्त केली,भारतीय जनता पार्टी बेटी बचाव बेटी पढावचा नारा देत आहे परंतु शिक्षणासाठी मुली आत्महत्या करत आहे, शिक्षण राज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यामध्ये अशी दुर्दैवी घटना घडत आहे यापेक्षा दुसरी लाजिरवाणी घटना नसावी,भाजपने लोकांना लाचार बनवणाऱ्या योजनावर करोडोंचा खर्च सरकार करत आहे परंतु राष्ट्राचा पाया रचणाऱ्या शिक्षणावर दुर्दैवाने खर्च होताना दिसत नसल्याचेही खासदार अमर काळे यांनी व्यक्त केले.



यावेळी मनोज चांदुरकर माजी जिल्हा परिषद सदस्य,प्रफुल कुचेवार माजी जिल्हा परिषद सदस्य,सागर गुढे माजी जिल्हा परिषद सदस्य, प्रा. राजू जाधव अध्यक्ष श्रीकृष्ण देवस्थान लोनसावळी, उमाकांत जाधव माजी सरपंच लोनसावळी, विजय राऊत माजी सरपंच वायफड, पंकज घोडमारे राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष, शुभम मुरकुटे, सुखदेव कोडापे,चंद्रशेखर मडावी, विजय वाके, खुशाल बावणे, देव अखूडे इतर उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

माझे ग्राहक श्री.सचिन प्रभाकर बोभाटे हे मौझा नालवाडी मौज क्रमांक ७३ ता.- आणि जिल्हा-वर्धाचे सर्वे क्र. ८७ मधील उत्तेरेकडील प्लॉट क्र. ६६ क्षेत्रफळ ७७.६५ sq.mt. चे मालक आहेत सादर प्लॉटची चतुरसीम - पूर्वेस-३० फूट रोड पश्चिमेस- २९ फूट रोड उत्तरेस - रोड दक्षिणेस ह्याच प्लॉटचा उर्वरित भाग. श्री. राहुल प्रकाशराव झोरे यांनी सादर प्लॉट माझ्या पक्षकाराला दिनांक २०-०६-२०२५ दस्त क्रमांक अन्वय २८२५ /२०२५ विक्री पत्रा द्वारे विकत दिलेले आहे. माझ्या पक्षकाराकडून मूळलिंक विक्री पत्र दिनांक २७/११/ २००८ दस्त क्रमांक. ८४४२ /२००८ हरविलेले आहे.आणि पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर देखील दाखल केला. माझ्या पक्षकाराने Jana Small Finance Bank Limited कर्जासाठी अर्ज केला आहे. सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल आणि जर कोणाला मूळ लिंक विक्री दस्तऐवज आढळला तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**ॲड.आर. आर.तिवारी**
**रामनगर, वर्धा.**
**४४२००१**
**मो. नं. ९९२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझे ग्राहक सौ. रजनी सुखेंद्र मोरे हे मौझा BaRadi मौज क्रमांक ९३ ता.- आणि जिल्हा-वर्धाचे सर्वे क्र. १९७/२ मधील पूर्वेकडील प्लॉट क्र. ७ क्षेत्रफळ १११.५२ sq.mt. चे मालक आहेत सादर प्लॉटची चतुरसीम - पूर्वेस- प्लॉट क्रमांक ८ पश्चिमेस- ह्याच प्लॉटचा उर्वरित भाग उत्तरेस - लेआऊट रोड दक्षिणेस - प्लॉट क्रमांक ९ अँड १० . श्री, प्रवीण कृष्णराव डफरे यांनी सादर प्लॉट माझ्या पक्षकाराला दिनांक १९/०६/२०१२ दस्त क्रमांक अन्वय ५४५१/२०१२ विक्री पत्रा द्वारे विकत दिलेले आहे. माझ्या पक्षकाराकडून मूळलिंक विक्री पत्र दिनांक २०/०३/१९९८ दस्त क्रमांक. ५८५ /१९९८ व मूळ लिंक विक्रीपत्र दिनांक १४/१०/१९९१ दस्त क्रमांक ५०२४/१९९१ हरविलेले आहे. आणि पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर देखील दाखल केला. माझ्या पक्षकाराने The Tata Capital Housing Finance Ltd. कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल आणि जर कोणाला मूळ लिंक विक्री दस्तऐवज आढळला तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**ॲड.आर. आर.तिवारी**
**रामनगर, वर्धा.**
**४४२००१**
**मो. नं. ९९२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझे ग्राहक श्री. शालीग्राम नानाजी चांदोरे हे मौझा Satoda मौज क्रमांक १३९ ता.- आणि जिल्हा-वर्धाचे सर्वे क्र. ७/२ मधील प्लॉट क्र. २० क्षेत्रफळ १७१.०० sq.mt. चे मालक आहेत सादर प्लॉटची चतुरसीम - पूर्वेस- प्लॉट क्रमांक १७ पश्चिमेस- १२ ft लेआऊट रोड उत्तरेस - प्लॉट क्रमांक १९ दक्षिणेस - सर्वे क्रमांक ७/१ . कृष्ण बिल्डर्स अँड डेव्हलपर्स through पार्टनर्स श्री. अनिल राजारामजी गुल्हाने , श्री. प्रमोद वसंतराव श्रीराव अँड Shri. योगेश लक्समिकांत गावंडे through POA विनोद वसंतराव पडवे यांनी सादर प्लॉट माझ्या पक्षकाराला दिनांक १९/०३/२०१५ दस्त क्रमांक अन्वय १४३०/२०१५ विक्री पत्रा द्वारे विकत दिलेले आहे . माझ्या पक्षकाराकडून मूळलिंक विक्री पत्र दिनांक २०/०३/१९९८ दस्त क्रमांक . ५८५ /१९९८ व मूळ लिंक विक्रीपत्र दिनांक १९/०३/२०१५ दस्त क्रमांक अन्वय १४३०/२०१५ हरविलेले आहे . आणि पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर देखील दाखल केला. माझ्या पक्षकाराने सादर प्लॉट विकण्याचा सौदा सौ . वर्षा विनोद फुलझेले ह्यांच्यासोबत केलेला आहे. सौ. वर्षा विनोद फुलझेले ह्यांनी The Adhar Housing Finance Ltd. (AHFL). कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल आणि जर कोणाला मूळ लिंक विक्री दस्तऐवज आढळला तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा. ४४२००१**
**मो.९९२२४२६१६८**

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## भ्रष्ट कारभार

लोकशाहीतील एक महत्त्वाचा खांब म्हणजे न्यायव्यवस्था; पण यामध्येही अधूनमधून भ्रष्टाचाराचे प्रकार घडतात. आता दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावर महाभियोग चालवण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून, त्यामागचे कारण त्यांचा कथित भ्रष्टाचार हेच आहे. संसदेतील प्रमुख विरोधी पक्षांनी न्या. वर्मा यांना हटवण्यास तत्त्वतः संमती दिल्यानंतर खासदारांच्या स्वाक्षऱ्या गोळा केल्या जाणार आहेत. हा न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराचा मुद्दा असल्यामुळे सर्व राजकीय पक्षांचे एकमत व्हावे, यासाठी केंद्र सरकारचा प्रयत्न आहे. सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीने न्या. वर्मा दोषी असल्याचे म्हटलेले नाही, तर पुढील कार्यवाही करण्याबाबत केवळ शिफारस केली आहे. कारण, न्यायमूर्तींना पदावरून हटवण्याचा अधिकार केवळ संसदेलाच असतो. सध्या अलाहाबाद उच्च न्यायालयात असलेले न्या. वर्मा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी जळालेल्या अवस्थेतील कोट्यवधीची रोख रक्कम आढळून आली होती. या बेहिशेबी रोख रकमेच्या कथित जप्तीवरून वाद निर्माण झाला होता.निवासस्थानाला आग लागल्यानंतर पोलीस व अग्निशमनचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी आग विझवताना एका खोलीत मोठ्या प्रमाणात रोकड आढळल्याचे वृत्त पसरले. अग्निशमनच्या अधिकाऱ्यांनीच प्रथम याची कबुली दिली आणि नंतर त्याचा इन्कारही केला आणि त्यानंतर त्यांनी पुन्हा कोलांटी उडी मारली. या प्रकरणाची तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी गंभीरपणे दखल घेतली. त्यांनी न्या. वर्मा यांच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. त्यापूर्वी त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय यांच्याकडून अहवाल मागितला होता. त्यानंतर न्या. वर्मा यांच्याकडे कोणतेही न्यायालयीन काम न सोपवण्याचे निर्देश देण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे, मुख्य न्यायाधीशांचा अहवाल तसेच घटनेची ध्वनिचित्रफीत व छायाचित्रे सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली.आम्ही पैशांचे व्यवहार बँकेच्या माध्यमातून आणि तपशिलाच्या सर्व नोंदींसह करतो, असे न्या. वर्मा यांनी म्हटले असले, तरी इतक्या प्रचंड नोटा त्यांच्याकडे आल्या कुठून, हा प्रश्न होताच. या नोटा आपल्या नाहीतच, असा त्यांचा दावा असला, तरीदेखील प्रथमदर्शनी घटनेची अधिक चौकशी व्हावी, असेच मत संबंधित चौकशी समितीने व्यक्त केले होते. हे आपल्याला अडकवण्याचे व प्रतिमा मलिन करण्याचे कारस्थान आहे, असेही न्या. वर्मा यांनी म्हटले असले, तरी यामागे नेमके कोण आहेत व त्यांनी असे का केले, हे त्यांनी स्पष्ट केले नाही. न्या. वर्मा यांनी अगोदर कोणकोणते खटले हाताळले आणि त्यासंबंधी निवाडा कसा केला, हेही आता तपासून पाहावे लागेल. त्रिसदस्यीय समितीने केलेल्या चौकशीत दोषी आढळून आल्यानंतर त्यांच्यावर महाभियोग चालवण्याची शिफारस करण्यात आली. २१ जुलैपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होणार असून, त्यात महाभियोग आणला जाऊ शकतो.लोकसभेत हा ठराव आणण्यासाठी किमान १०० खासदारांची, तर राज्यसभेत किमान ५० खासदारांची त्यावर स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. अजूनपर्यंत कोणत्या सभागृहात ठराव येणार, हे निश्चित झालेले नसून, सरकारने त्याचा निर्णय घेतल्यानंतर स्वाक्षऱ्या गोळा करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. एकदा ठराव सभागृहात दाखल झाला की, नंतरच न्या. वर्मा यांच्या उचलबांगडीची प्रक्रिया सुरू होईल. केवळ सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीचा अहवालच ग्राह्य न धरता सर्वंकष कायदेशीर प्रक्रियेद्वारेच न्या. वर्मा यांना दूर केले जाणार असून, हे रास्त पाऊल आहे. महाभियोग आणण्याची एक पद्धत आहे. न्यायाधीश (चौकशी) कायदा १९६८ अनुसार, एकदा संबंधित व्यक्तीवर महाभियोगासंदर्भात ठराव दाखल झाला की, लोकसभा अध्यक्ष किंवा राज्यसभा सभापती हे त्रिसदस्यीय समिती नेमतील. सरन्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयातील एक न्यायमूर्ती, देशातील एक उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती आणि एका प्रतिष्ठित कायदेतज्ज्ञाचा या समितीत समावेश असेल.न्यायव्यस्थेवर लोकांचा विश्वास राहण्याच्या दृष्टीने तेथे सचोटीचे आणि निःस्पृह न्यायाधीशच असले पाहिजेत आणि भ्रष्ट व संशयाच्या घेऱ्यात सापडलेल्यांना तत्काळ दूर केले पाहिजे. तसेच आवश्यक तेव्हा संसदेने एकमताने महाभियोग चालवून उच्च न्यायाधीशांवर कठोर कारवाई करण्याची गरजही आहे. या पार्श्वभूमीवर याच आशयाच्या आणखी एका प्रकरणाची सध्या चर्चा होत आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्या. शेखर यादव यांच्याबाबत मात्र सरकारी पातळीवरून मौन बाळगण्यात आले आहे, असा आरोप होत आहे. गतवर्षी विश्व हिंदू परिषदेच्या एका कार्यक्रमात प्रक्षोभक भाषण केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.१९९३ मध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असताना आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपाखाली महाभियोगाला सामोरे जाणारे न्या. व्ही. रामास्वामी हे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश होते; मात्र मतदानाच्या दिवशी ४०१ सदस्य उपस्थित होते. १९६ सदस्यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला; परंतु २०५ सदस्य गैरहजर राहिले आणि त्यात मुख्यतः काँग्रेस व अण्णा द्रमुक सदस्यांचा समावेश होता. याचाच अर्थ संसदेत त्याचा न्याय होऊ शकला नाही. सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात भाग घेतल्याबद्दल तुरुंगात असताना २४ जानेवारी १९२२ रोजी ज्येष्ठ नेते सी. राजगोपालाचारी यांनी दैनंदिनीत लिहिले होते की, भारताला स्वातंत्र्य मिळेल, तेव्हा निवडणुकांसोबत येणारा भ्रष्टाचार, अन्याय आणि प्रशासनातील गलथानपणा या गोष्टींना एवढे उधाण येईल की, जीवन नकोसे वाटू लागेल. त्यांनी व्यक्त केलेले हे भाकित न्या. वर्मा यांच्या कृत्याने तंतोतंत खरे ठरले. न्यायदान हे पुण्याचे काम. लोकांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास असतो. तो कमी न होता अढळ राहण्यासाठी न्यायव्यवस्थेसह सरकारने पुढाकार घ्यायला हवा. या प्रकरणात तो घेतला आहे. त्यावर न्याय काय होणार, हे लवकरच स्पष्ट होईल.

**राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा पहिलाच आठवडा विरोधीपक्षनेते नसूनही विरोधीपक्षांनी सरकारवर आक्रमकपणे हल्लाबोल करत गाजवला. पाशवी बहुमत असलेल्या भाजप-महायुतीच्या सरकारच्या मंत्र्यांना या अधिवेशनात सत्ताधारी सदस्यांकडूनही अनेकदा घरचा आहेर मिळाल्याचे दिसले.**

# भाजप-महायुतीवर विरोधकांचा हल्लाबोल!

महाराष्ट्रात सध्या राजकीय सामाजिक घडामोडींचा बहर आला आहे. सर्वदूर पावसाने हजेरी लावली आहे. शेतीच्या कामांना वेग आला आहे. तर राजकीय पेरण्याही जोरात सुरू झाल्या आहेत. राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा पहिलाच आठवडा विरोधीपक्षनेते नसूनही विरोधीपक्षांनी सरकारवर आक्रमकपणे हल्लाबोल करत गाजवला. पाशवी बहुमत असलेल्या भाजप-महायुतीच्या सरकारच्या मंत्र्यांना या अधिवेशनात सत्ताधारी सदस्यांकडूनही अनेकदा घरचा आहेर मिळाल्याचे दिसले. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी तर आपल्याच सरकारच्या शेतकऱ्यांना सक्तीने सोलर मिटर देण्याच्या धोरणाची भर सभागृहात चिरफाड करत जणू आपण सत्ताधारी नसून विरोधीपक्षनेते आहोत की काय ? अश्या थाटात समाचार घेतला. मात्र सरकारच्या मंत्र्याचा 'होमवर्क' तोकडा पडल्याचे पहिल्याच आठवड्यात पहायला मिळाले.

### तर अधिवेशनाचा फार्स तरी कशासाठी?

शेतकऱ्यांना अव्दातव्दा बोलून त्यांचा अवमान करणारे माजी मंत्री आणि विद्यमान भाजप आमदार बबनराव लोणीकर यांना देखील नाईलाजाने सभागृहात माफी मागावी लागली. शेतकऱ्यांच्या राज्यात सर्वाधिक आत्महत्या होत असताना लोणीकर यांनी त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार केला. तीच गोष्ट कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची. त्यांनी देखील सरंजामदार असल्याच्या थाटात शेतकऱ्यांबाबत अनेकानेक वक्तव्ये मागील काही महिन्यांपासून अव्याहतपणे केली. त्याचा जाब मुठभर विरोधकांनी नेमकेपणाने विचारलाच. मात्र विरोधकांना शासनाकडून प्रतिसाद देण्याचे औदार्य सत्ताधारी पक्षांकडून दाखविण्यात आले नाही. त्यावेळी पिठासीन अधिकारी, विधानसभा अध्यक्ष यांच्याकडूनही सरकारची पाठराखण केली जात असल्याचे पहिल्या आठवड्यात वारंवार पहायला मिळाले आहे. माजी विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांनी त्यावर तिव्र संताप व्यक्त करण्यासाठी अध्यक्षांच्या पिठासनावर जावून लक्ष वेधण्याचा प्रयत्न करताना चक्क राजदंडाला हात घातला, ज्या कृतीचे समर्थन कुणालाच करता येणार नाही. मात्र विरोधकांच्या मुद्यांना दुर्लक्षीत करायचा सपाटाच जर सत्ताधारी लावत असतील आणि पिठासनावरून अध्यक्ष तालिका अध्यक्ष त्यावर लक्ष देत नसतील तर विरोधकांची ही मुस्कटदाबीच म्हणावी लागेल की नाही? लोकशाहीच्या मंदिरात न्याय ज्यांनी द्यायचा त्यांच्याकडून 'वेळ नाही' म्हणून मुद्देच दामटवून नेण्याचा प्रकार होत असेल तर विरोधीपक्षांना पायऱ्यांवर येवून घोषणा देण्याशिवाय पर्याय रहात नाही. याकडेही डोळे उघडून सरकार आणि विधीमंडळाने पहायची गरज आहे. सत्ता आहे पाशवी बहुमत आहे म्हणून कारभार रेटून करायचा असेल तर अधिवेशनाचा फार्स तरी कश्यासाठी हवा? असा प्रश्न मग सामान्य जनतेला पडल्याशिवाय रहात नाही.

अशाच प्रकारे तालिका अध्यक्ष चेतन तुपे यांनी तासाभरात पूर्ण करायच्या लक्षवेधी सूचना अडिच तास सुरूच ठेवल्या आणि पुणे जिल्ह्यातील आपल्या परिसरातील प्रश्नावर झाडून साऱ्या पुणेकर लोकप्रतिनीधींना अर्धा अर्धातास भाषणे करत बोलायला दिले असा आक्षेप शिवसेना उबाठाच्या भास्कर जाधव यांनी टिपणी करत घेतला. त्यावर तुपे यांनी पिठासनावर बसून सत्ताधारी पक्षाच्या वतीने बोलत असल्यासारखी भुमिका मांडली. जे पिठासीन अधिकारी म्हणून कदापी मान्य होणारे नाही. हाच मुद्दा दुसऱ्या दिवशी अध्यक्ष राहूल नार्वेकर यांच्यासमोर विजय वडेट्टीवार यांनी मांडला, त्यानंतर मात्र अध्यक्षांनी झाल्या प्रकाराबद्दल नाराजी व्यक्त करत पिठासीन अधिकाऱ्याला सत्ताधारी-विरोधक असा भेद करता येत नसल्याचे सांगत विरोधकांच्या आक्षेपाला कौल दिला. हे लोकशाहीच्या प्रथा आणि परंपराच्या या सार्वभौम सदनाचे वैभव आहे, येथे सर्वांना समान संधी आणि न्याय दिला जातो. यासाठी देशभरात महाराष्ट्रांच्या विधीमंडळाचा लौकीक सांगितला जातो असे अध्यक्ष नार्वेकर म्हणाले. तालिका अध्यक्षांची संख्या चार पेक्षा जास्त असू नये असे नियमात उल्लेख असताना यावेळी अध्यक्षांनी आठ जणांची निवड यासाठी केली आहे. ही गोष्टही या निमित्ताने समोर आली!

### सरकारला १ लाख ३ हजार ४०० कोटी रुपये कमी पडणार?

राज्य विधीमंडळात या अधिवेशनात तीनच महिन्यापूर्वी संपूर्ण अर्थसंकल्प मांडणाऱ्या राज्य सरकारकडून सुमारे साठ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या



दिवशी मांडण्यात आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी वित्तमंत्री जयंतराव पाटील यांनीच मग सरकारला धारेवर धरले. राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे, सरकारचे आर्थिक संतुलन ढासळलं आहे त्यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होतो आहे अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. ते म्हणाले की, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केला असा मी उल्लेख केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. आज राज्याच्या अर्थमंत्रांनी पुन्हा पुरवणी मागण्या मांडल्या, त्या ५७ हजार ५०९ कोटीच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्याने या पुरवणी मागण्या मंजूर होतीलच. त्यावेळी सरकारला १ लाख ३ हजार ४०० कोटी रुपये कमी पडणार आहेत. पूर्वीच्या आणि आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक नवा विक्रम रचला आहे असे ते म्हणाले.? पुरवणी मागण्या समोर मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही असे या सरकारचे सुरू आहे. यापुढे हिवाळी अधिवेशन देखील येणार आहे. पुढचा अर्थसंकल्प मांडण्याच्या आधी एक पुरवणी मागणी येणार. म्हणजे राज्याची महसूली तूट हे सरकार दीड किंवा दोन लाख कोटींपर्यंत पोहोचवतील. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. नाहीतर ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणं बाकी आहे असे लोकं एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये या प्रकारे एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे असं मत त्यांनी व्यक्त केले. राज्यातील कंत्राटदारांचे सरकारकडे ९०हजार कोटीचे देणे थकले आहे. राज्य कंगालीकडे गेले आहे.याचा हा पुरावा म्हणायला हवा, पण शू ऽ बोलू नका!

सरकारला आता अर्थसंकल्पाचे संतुलन टिकवणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे. राज्याचे आर्थिक संतुलन ढासळलं आहे. यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होतो आहे. एसटी, एससी, ओबीसी यांच्यावर खर्च होणारा पैसा कागदावर दाखवला जातो आणि ३१ मार्चला कळतं यावर काहीच पैसा खर्च झालेला नाही. तीच पुनरावृत्ती यावर्षी सरकार करते आहे असे मला वाटते असे ते म्हणाले. असे ९वेळाचे माजी वित्तमंत्री म्हणाले. पण लक्षात कोण घेतो?

### तर महाराष्ट्राचा धर्म संकटात आहे, असेच म्हणावे लागेल?

राज्याच्या संत परंपरेत हजारो वर्षांपासून समतेचा, बंधुतेचा आणि मानवतेचा सांस्कृतिक साक्षात्कार म्हणजे पंढरीची वारी! ज्ञानेश्वर, तुकाराम, चोखोबा, जनाबाई यांच्यापासून सुरू झालेल्या या चळवळीने हजारो वर्षांपासून जात, धर्म, लिंग यांच्या सीमारेषा पार करून भक्तिमार्गातून लोकशाहीचे आदिम बीज पेरले होते. हेच बीज नंतर आपल्या संविधानात मूर्त स्वरूपात अभिव्यक्त झाले. त्यातून आपल्या संस्कृतीमध्ये खोलवर रूजलेल्या लोकपरंपरेचा पुरोगामी, समताधिष्ठित, आणि संविधाननिष्ठ आविष्कार दिसून येतो.

मात्र आता विधीमंडळातून शिवसेना शिंदे गटाच्या (पूर्वाश्रमीच्या भाजप) आमदार मनिषा कायंदे यांनी 'अर्बन नक्षल' वारीत घुसण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आहे. विधान परिषदेतील आमदार मनीषा कायंदे यांनी'संविधान दिंडी'त अर्बन नक्षलवादी सहभागी होत आहेत, असा गंभीर आरोप ऐन वारी सुरू असतानाच आणि अचानकपणे करून त्यांनी एक सांस्कृतिक व संविधानिक चळवळीला संशयाच्या घेऱ्यात बदनाम करण्याचा प्रयत्न केला नाही का?. वर्षानुवर्ष वारी म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रम, वारी, समाज जागर आणि संविधान यांचे नाते जोडणाऱ्या चळवळीला 'अर्बन नक्षल' ठरवण्यामागे काही हेतुपूरस्सर उद्दिष्ट आहेत का? हे आता पहावे लागेल.

पारंपारीक सांस्कृतिक उपक्रमाना 'नक्षल' ठरवणे म्हणजे केवळ संतांचे आणि संस्कृतीचा अपमान नाही, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आत्म्याचे विघटन करण्याचा प्रयत्न आहे. विधीमंडळाचे विशेषाधिकार आहेत म्हणून कोणाताही पुरावा न देता, कोणत्याही प्रश्नावर सामाजिक कार्यकर्त्यांना, विचारवंतांना आणि जनआंदोलनांना अर्बन नक्षल सारख्या या नावाने हिणवले जाते. राष्ट्रद्रोही ठरवले जाईल आणि त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले जातील तर महाराष्ट्राचा धर्म संकटात आहे असेच म्हणावे लागेल.

वास्तविक पाहता, वारकरी संप्रदायामध्ये कोणत्याही स्वरूपाचे हिंसक वा देशद्रोही विचार नाहीत. उलट, ते मानवतेचा आणि करुणेचा धर्म शिकवतात. त्यामुळे या उपक्रमांना देशद्रोही ठरवण्याचा प्रयत्न म्हणजे समाजात जातीय आणि सांस्कृतिक तेढ निर्माण करण्याची चाल आहे का याचा सरकारने शोध घ्यायलाच हवा. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि यांनी या आरोपांचा गंभीरपणे चौकशी करताना असा आरोप करणाऱ्यांचा नेमका हेतू काय? हे देखील पहायला हवे.

आषाढी एकादशीच्या दोन दिवस आधी जे लोक दिंडी आणि वारीत चालत होते त्यांचा हा अपमान नव्हे काय?, त्यांच्यावर तपास आणि कायदेशीर कारवाई व्हावी या हेतूने तर अश्या विषारी वक्तव्यांचा उगम होत नाही ना? सरकारची दिशाभूल व्हावी शांतीप्रिय वारीच्या परंपरेला गालबोट लागावे असा जर यामागे कुणाचा हेतू असेल तर सरकारने जबाबदारीने याचा तपास केला पाहीजे. कायंदे यांच्या आरोपांचा रोख 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' आणि 'संविधान समता दिंडी' या उपक्रमांबाबत असल्याचे सांगण्यात येत आहे . मात्र त्यावर अश्या प्रकारे विधीमंडळात दोषारोप केल्याने सनसनाटी निर्माण होईल त्याचा दुष्परिणाम समाजाच्या एकात्मतेवर होतील याची खबरदारी कुणी घेणार आहे की नाही?

**किशोर आपटे**

# बंगालमध्ये भाजपाचे नवे अध्यक्ष !




रा.स्व.संघ,अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि भारतीय जनता युवा मोर्चा या संघटनांमध्ये सुरूवातीला कार्यरत असलेल्या समीक भट्टाचार्य यांची नुकतीच पश्चिम बंगाल भाजपा प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली आहे.तपन सिकदर,राहुल सिन्हा, दिलीप घोष आणि सुकांता मुजुमदार यांच्या नंतर प्रदेशाध्यक्षपदी आता समीक भट्टाचार्य यांची निवड झाली आहे.समीक भट्टाचार्य हे अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रमाणे उदारमतवादी आहेत.त्यांच्या सर्व समावेशक वृत्तीमुळे ते पक्षामध्ये सर्वांशी चांगले संबंध राखून आहेत.

सध्या ते राज्यसभेचे खासदार आहेत.अतिशय अभ्यासू आणि मीतभाषी असलेले,समीक भट्टाचार्य हे बंगाल मधील भद्रलोक (उच्च विद्याविभूषित) बरोबर चांगला संवाद राखून आहेत.२०१४ साली त्यांनी भाजपाच्या तिकिटावर बशिरहाट (दक्षिण) विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत विजय मिळवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला होता.ममता बॅनर्जी यांच्या राजवटीत एखादी पोटनिवडणुक जिंकणे ही विरोधी पक्षांसाठी सोपी गोष्ट नाही.त्यामुळेच समीक भट्टाचार्य यांचा विजय विशेष महत्त्वाचा मानला गेला.त्या काळात पश्चिम बंगाल मध्ये भाजपा,आजच्या इतकी प्रबळ नव्हती,?ही गोष्ट या ठिकाणी लक्षात घ्यायला हवी.भाजपाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष म्हणून समीक भट्टाचार्य यांच्या समोर बरीच आव्हाने आहेत.पश्चिम बंगाल भाजपामध्ये मुळचे कार्यकर्ते आणि नेते व बाहेरून आलेले नेते व कार्यकर्ते असा सुप्त संघर्ष आहे.उदाहरण द्यायचे झाल्यास भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष यांचा उल्लेख करता येईल.

दिलीप घोष हे पश्चिम बंगाल भाजपाचे आजवरचे सर्वात यशस्वी प्रदेशाध्यक्ष मानले जातात.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत दिलीप घोष यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या एकूण ४२ जागांपैकी १८ जागा जिंकून ममता बॅनर्जी यांना मोठाच धक्का दिला होता.त्या निवडणुकीत भाजपा आणि तृणमूल काँग्रेस यांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत फारसा फरक नव्हता.विशेष म्हणजे मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डावी आघाडी आणि काँग्रेस या पश्चिम बंगाल मधील प्रस्थापित पक्षांना खूप मागे सारून भाजपाने, सत्ताधारी तृणमूल काँग्रेस पाठोपाठ दुसरा क्रमांक पटकावला होता.

आज काय स्थिती आहे? भाजपाला पश्चिम बंगाल मध्ये इतका मोठा विजय मिळवून देणारे, दिलीप घोष एका बाजूला पडले आहेत.समीक भट्टाचार्य यांच्या निवडणुक प्रक्रियेत, दिलीप घोष कुठेच दिसले नाहीत.अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर,समीक भट्टाचार्य यांच्या सत्कार समारंभाला दिलीप घोष यांना आमंत्रित केले नव्हते असे म्हणतात.सत्कार समारंभात माजी अध्यक्ष सुकांता मुजुमदार यांनी दिलीप घोष यांनी पक्षाकरता घेतलेल्या मेहनतीचा उल्लेख केला, परंतु भाजपाचे पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्ष नेते सुवेंदू अधिकारी यांनी दिलीप घोष यांचा उल्लेख टाळला.भाजपामधील मुळचे नेते आणि बाहेरून आलेले नेते यांच्यातील फरक हाच आहे.

सुवेंदु अधिकारी हे तृणमूल काँग्रेसमधून भाजपात आलेले नेते आहेत.ते ममता बॅनर्जी यांचे उजवे हात समजले जात असत.ते मासबेस असलेले नेते आहेत.२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत,सुवेंदु अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता.ते आता कट्टर हिंदुत्ववादी झाले आहेत.समीक भट्टाचार्य यांनी सत्काराला उत्तर देताना केलेले भाषण भाजपा मधील अनेकांना आश्चर्याचा धक्का देणारे होते.ते म्हणाले आमचा लढा मुसलमानांच्या विरोधात नाही.मुस्लिम घरांतील जे तरुण हातात दगड घेतात त्यांच्या हातात आम्हाला पुस्तक द्यायचे आहे, जे तरुण हातात तलवार घेतात,त्यांच्या हातात आम्हाला पेन द्यायचे आहे.हिंसाचार आणि जातीयवाद हे आमचे खरे शत्रू आहेत.

समीक भट्टाचार्य यांनी मांडलेले हे विचार पक्षाच्या हिंदुत्ववादी भूमिकेला छेद देणारे असले तरी,त्यांची ही भूमिका भाजपाकरता कदाचित फायदेशीरही ठरू शकेल.आज पश्चिम बंगाल मध्ये अशी परिस्थिती आहे की, मुस्लिम समाजातील एक वर्ग ममता बॅनर्जी यांच्यावर कमालीचा नाराज आहे.परंतु भाजपाच्या भितीमुळे हा वर्ग नाईलाजाने ममता बॅनर्जी यांच्या पाठीशी उभा रहात आहे.पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.तृणमूल काँग्रेसच्या काही नेत्यांची

भ्रष्टाचाराची प्रकरणे एका पाठोपाठ एक बाहेर येत आहेत.बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत.लोकांना विकल्प हवा आहे.परंतु पश्चिम बंगाल मध्ये ३० टक्के लोकसंख्या असलेला मुस्लिम समाज जोपर्यंत ममतांच्या पाठीमागे ठामपणे उभा रहात आहे तोपर्यंत ममतांना पराभूत करणे अतिशय अवघड आहे. समीक भट्टाचार्य यांनी मांडलेले विचार वास्तववादी आहेत.मात्र भाजपामध्ये बाहेरून आलेले नेते, त्यांना कशी साथ देतात हे महत्त्वाचे ठरणार आहे.समीक भट्टाचार्य यांना जुने आणि नवे यांची व्यवस्थित सांगड घालावी लागणार आहे.त्या करता त्यांना दिलीप घोष आणि सुकांता मुजुमदार या माजी अध्यक्षांचा सल्ला अतिशय मोलाचा ठरणार आहे.त्यांच्या समोरील आव्हान सोपे नाही,कारण त्यांची लढाई ममता बॅनर्जी यांच्याबरोबर आहे.

**अभय गोखले**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करण्यासाठी १३८ किलोमीटरची पदयात्रा सुरू; बच्चू कडू यांचा एल्गार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आणि सरकारने दिलेल्या आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी "एकच झेंडा, शेतकरी अजेंडा" या मोहिमेअंतर्गत पापळ ते चिलगव्हाण अशी १३८ किलोमीटरची भव्य पदयात्रा ७ जुलैपासून सुरू होत आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते व राज्याचे माजी मंत्री बच्चू भाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या यात्रेत सर्वपक्षीय नेते, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि हजारो शेतकरी सहभागी होणार आहेत.

राज्यातील युती सरकारने विधानसभेच्या निवडणुकीत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप या आश्वासनाची अंमलबजावणी न झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष आहे. आर्थिक विवंचनेतून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा, त्यांचा ७/१२ उतारा कर्जमुक्त व कोरा व्हावा, यासाठी ही पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे. ही यात्रा भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जन्मगाव पापळ येथून सुरू होणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील चिलगव्हाण या गावात, १९८६ साली शेतकरी साहेबराव करपे व त्यांच्या कुटुंबीयांनी सामूहिक आत्महत्या करून शेतकऱ्यांच्या दुरवस्थेची दखल देशभर घडवून आणली होती. त्यांना व त्यांच्या बलिदानाला नतमस्तक होत या गावात यात्रेचा समारोप होणार आहे. त्यानंतर अंबोडा येथे भव्य सभा होईल. या पार्श्वभूमीवर अंबोडा येथे काल नियोजन बैठक झाली. गजानन महाराज संस्थान येथे झालेल्या बैठकीत बच्चू कडू यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष बल्लूभाऊ जवंजाळ, शेतकरी नेते मनीष जाधव, पंजाबराव देशमुख खडकेकर, माजी जि.प. सदस्य शिवाजीराव देशमुख, प्रगतशील शेतकरी अमृतराव देशमुख, माजी पंचायत समिती सभापती सिताराम ठाकरे, भाजप नेते गोविंदराव देशमुख, काँग्रेस नेते महेंद्र कावळे, नगरसेवक साकिब शाह, डॉ. अरुण पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यात्रेपूर्वी गहुली येथे वसंतराव नाईक आणि जलक्रांतीचे प्रणेते सुधाकरराव नाईक यांच्या समाधीस्थळाला भेट देऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी बच्चू कडू म्हणाले, "पंढरपूरला जाता आले नाही, पण पृथ्वीवरचा देव म्हणजे शेतकरी आहे आणि या देवाचे देव म्हणजे वसंतराव नाईक. त्यांना नतमस्तक होऊन अस्तित्वासाठी हा लढा सुरू करतो." शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, कष्टकरी समाजासाठी न्याय मिळवण्याच्या उद्देशाने ही यात्रा असून, जात, धर्म, पक्ष बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बिपिन चौधरी, प्रहार जिल्हाध्यक्ष प्रदीप आडे, गहुलीचे सरपंच नितीन कोल्हे, उपसरपंच आडे, शरद राठोड, रुपेश जाधव, धीरज पांडे, अमोल झरकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# आत्महत्याग्रस्त जिल्ह्याला कायमस्वरूपी कृषी अधिकारी द्या : शेतकरी नेते मनीष जाधव



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : जिल्हा हा अती संवेदनशील व शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून संपूर्ण देशात ओळख निर्माण झालेल्या यवतमाळ जिल्ह्यात गेल्या अनेक महिन्यांपासून कायमस्वरूपी जिल्हा कृषी अधिक्षक व कृषी अधिकारी नियुक्त नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्यामार्फत कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.

शेतकरी संघटनेचे नेते मनिष एस. जाधव यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, जिल्ह्यात कृषी अधिकाऱ्याचे पद रिक्त असल्याने कृषी विभागाचे कामकाज केवळ पदभारावर सुरू आहे. त्यामुळे यवतमाळ जिल्ह्यात बोगस बियाणे, बनावट रासायनिक खते, तसेच पीजीआरच्या माध्यमातून शेतकऱ्यांची फसवणूक सुरू असून, कृषी विभागाच्या हलगर्जीपणाचा फायदा काही विक्रेते घेत आहेत.

तसेच शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन होत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. कृषी अधिकाऱ्याचे पद रिक्त असणे ही गंभीर बाब असून, यवतमाळ सारख्या संवेदनशील जिल्ह्यात पालकमंत्री तथा कृषी मंत्र्यांनी याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. संघटनेने इशारा दिला आहे की, जर लवकरच जिल्ह्याला पूर्ण वेळ जिल्हा कृषी अधिक्षक व कृषी अधिकारी नेमले नाहीत, तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कृषी अधिकारी कार्यालय ताब्यात घेण्याचे आंदोलन करण्यात येईल. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाकडे निवेदन सादर करण्यात आले असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी होत आहे.

# थकीत देयके मिळण्यासाठी कंत्राटदार संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - राज्यातील सर्व विभागाकडील ओपन कंत्राटदार सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर संस्था विकासक यांची थकीत देयेके तात्काळ देण्यात यावी याकरिता यवतमाळ जिल्हा अधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित दादा पवार यांना निवेदन देऊन तात्काळ या निवेदनावर अंमलबजावणी करून थकित देयके देण्याची विनंती केली आहे.

महाराष्ट्रामध्ये ओपन कंत्राटदार सुशिक्षित व बेरोजगार अभियंता मजूर संस्था विकासक ही राज्यात सर्व विभागाकडे शासनाची विकास कामे करीत आहे पण सर्वात मोठी खेदाची बाब म्हणजे गेल्या आठ महिन्यापासून झालेल्या विकास कामाचे कंत्राटदार यांना कुठलीही देयेके मिळाली नसून सर्व विभागाकडे एकूण रक्कम ८९ हजार कोटी रुपयाची देयके प्रतिलंबित असून थकीत देयके मिळण्यासाठी कंत्राटदार संघटनेने वेळोवेळी आंदोलने उपोषणे मोर्चे सुद्धा केले आहे.अधिकारी राज्यकर्ते यांच्यासोबत चर्चासम्मीत घडून आणण्याचा खूप प्रयत्न केला पण शासन व प्रशासन कुठलाही प्रतिसाद देत नसून कुंभकर्णी झोपेत असल्याचे नाटक करत आहे व या गंभीर विषयाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे राज्यातील सर्व कंत्राटदार संघटनांनी दि.४ जुलै रोजी राज्यभर एकाच दिवशी सर्व राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना एकाच वेळी निवेदन देऊन संताप व्यक्त करीत शासन प्रशासनाने त्यावर तात्काळ तोडगा न काढल्यास शेती नंतरचा मोठा व्यवसाय व या व्यवसायावर अवलंबून असणारे कुटुंब त्यांचे जीवन चरितार्थ आर्थिक अडचणीत येऊन राज्यातील विकासा सुधारण्याची योजनांची चालणारी कामाची चाके थांबतील असे या कंत्राटदार संघटनेने या निवेदनात स्पष्ट केले असून यवतमाळ जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य महासंघ संघटनेचे जिल्हाध्यक्ष सैय्यद अन्वर अली, अभिजीत दुबे, नन्हे खान, मिलींद देशमुख, अ.कादर, दिपक काळे, अयुब शकुर, साजिद कुरेशी, योगेश पांडे व इतर सर्व कंत्राटदार यांचे वतीने जिल्हाधिकारी यवतमाळ यांना निवेदन दिले आहे.

# यवतमाळ शहराकरीता एकात्मिक टपाल वितरण केंद्राचे उद्घाटन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : संपूर्ण यवतमाळ शहर व लगतच्या क्षेत्राकरीता एकात्मिक टपाल वितरण केंद्राचे उद्घाटन आज दिनांक ०७ जुलै २०२५ रोजी मा. शोभा मधाळे पोस्ट मास्टर जनरल, नागपूर रीजन यांच्या हस्ते यवतमाळ मुख्य टपाल कार्यालय येथे करण्यात आले.

यवतमाळ शहर व लगतच्या ग्रामीण परिसरातील टपाल वितरण अधिक सुव्यवस्थित आणि जलद व्हावे या उद्देशाने ही सुविधा राबविण्यात येत आहे. यामध्ये संपुर्ण यवतमाळ शहर व शहरालगतच्या वडगाव, लोहारा, भोसा, करळगाव या परिसरातील नागरिकांना त्यांचे नावे येणारी टपाल सु-व्यवस्थित व जलद वितरित व्हावी याकरीता या संपूर्ण क्षेत्राकरीता एकाच जागेवरून वितरण व्हावे व नागरिकांना संपर्क साधण्याकरीता सोयीचे व्हावे म्हणून यवतमाळ प्रधान डाकघर येथे एकात्मिक टपाल वितरण केंद्र आजपासून सुरु झाले आहे. यावेळी मा. शोभा मधाळे पोस्ट मास्टर जनरल, नागपूर रीजन यांनी हिरवी झेंडी दाखवुन सर्व पोस्टमनला एकत्रितरीत्या टपाल वितरणा करीता रवाना केले. यामध्ये सर्व पोस्टमन आपल्या उपलब्ध वाहनाद्वारे टपाल वितरण करतील आणि त्यांना याकरिता वरिष्ठ कार्यालयाकडून मंजूर झालेल्या दराप्रमाणे इंधन भत्ता दिल्या जाईल. पर्यावरण संरक्षणाचा हेतु समोर ठेवुन ई- वाहनला प्रोत्साहन देण्यात येईल असे सांगतांनाच ई-वाहन असणाऱ्या दोन पोस्टमनचे कौतुक सुद्धा करण्यात आले. बदलत्या काळानुसार टपाल वितरण प्रक्रियेचे आधुनिकीकरण करतांना हि प्रक्रिया पोस्टमनच्या मोबाईल मधील विशेष ॲपद्वारे डिजीटल होईल व आपण पाठविलेल्या टपालाच्या वितरणाची संपूर्ण माहिती डिजीटल माध्यमाव्दारे सुनिश्चित होईल अशीही माहिती यावेळी मा. शोभा मधाळे पो पोस्ट मास्टर जनरल, नागपूर रीजन यांनी दिली.

# नेर अर्बन बँकेतर्फे निबंध स्पर्धा व रक्तदान शिबिर उत्साहात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



नेर - आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त व नेर अर्बन बँकेचे महाव्यवस्थापक प्रदीप झाडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्थानिक शाहू महाराज इंग्लिश मीडियम स्कूल येथे निबंध लेखन स्पर्धा व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी तब्बल 101 रक्तदात्यांनी रक्तदान केले.

नेर अर्बन को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी, सहकार अधिकारी व सहकार संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सरकार वर्ष सप्ताह निमित्ताने राजेश्री शाहू महाराज इंग्लिश मीडियम स्कूल व जुनियर कॉलेज बहिरम नगर येथे दिनांक 6/7/25 ला सात ते दहा या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेचा विषय "देशाच्या आर्थिक विकासात सहकार चळवळीची भूमिका" हा ठेवण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये नेर तालुक्यातील अनेक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदणीला उत्तीर्ण विद्यार्थ्यांना 5000 ते 1000 हजार रुपये पर्यंतचे बक्षीसे, शील्ड व प्रमाणपत्र मान्यवरांच्या शुभहस्ते देण्यात आले. दिनांक 7/7/ 25 रोज सोमवारला सकाळी अकरा वाजता रक्तदान शिबिर घेण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये वैभव मुंदाने, निलेश वंजारी, अतुल मांडूळकर,ओम ढवळे, प्रमोद दरोई, रुपेश पचगाडे, सुनिल दरोई, प्रवीण गंदेवार व अन्य रक्तदात्यांनी रक्तदान केले.रक्तदात्यांना प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह वेळीच देण्यात आले. यावेळी रक्त संक्रमण अधिकारी गो पो गौरव, आशिष खडसे, मोहन तडवेकर, संदीप ताकसांडे, सचिन सोनवार, पल्लवी राठोड, शितल ठाकरे, प्रणाली भुनेश्वर, दानिश शेख उपस्थित होते.

# माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन पुसदकडून मानवतेची आगळीवेगळी आषाढी एकादशी



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - आषाढी एकादशी निमित्त लाखो विठ्ठल भक्त पंढरपूरच्या वारीला जातात. पण प्रत्येकाला पंढरपूरच्या वारीला जाऊन माऊलीची सेवा करणे शक्य होत नाही. काही माऊली उपजिल्हा रुग्णालय येथे आजारामुळे दवाखान्यात उपचार घेत असतात अशा गरजुवंत माऊलींची सेवा माणुसकीची भिंत सदस्य हे मागील दहा वर्षापासून मोफत अन्नदान व फळे वाटप करून सेवा करीत आहेत.

माणुसकीची भिंत उपजिल्हा रुग्णालय मदत केंद्र पुसद येथे आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी प्रमाणे प्रथम विठ्ठल रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन माणुसकीची भिंत सदस्य व महिला सदस्यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते करून उपजिल्हा रुग्णालय येथील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना व पुसद मधील गरजूंना फळे, राजगिरा लाडू आणि फराळ प्रसाद म्हणून देण्यात आला तसेच महिलांना साड्या, वृद्ध महिलांना लुगडे, पुरुषांना धोतर व कपडे वाटप करून मोठ्या उत्साहात आषाढी एकादशीचा सण साजरा करण्यात आला. या वेळेस उपस्थित मान्यवर श्री सुमित भांगडे सर, हितेश भाऊ मते,गजानन ठाकरे, मंगेश भगत,तसेच महिला सदस्या .मोनिका जाधव, शांताबाई जाधव, अर्चनाताई गावंडे, अल्काताईआघाम, पूजाताई इंगोले, स्वातीताई भगत, पूजाताई जाधव,सौ. शिवनंदाताई शिलार, मीराताई गव्हाणकर, कांचनताई दळवी, वंदनाताई कदम, प्रतिभाताई बुरांडे, रंजनाताई ठाकरे, वैभवीतीई मते, कु.गौरी जाधव, कु.वैष्णवी जाधव, कु. रुद्राणी इंगोले, शेतीनिष्ठ शेतकरी दत्तात्रय जाधव, माणुसकीची भिंत अध्यक्ष गजानन जाधव, पंजाबराव ढेकळे, मधुकर चव्हाण, रुग्ण मित्र फाउंडेशन शांतीसागर इंगोले, मंगेश भगत, आदित्य जाधव,धनंजय आघाम, दीपक घाडगे व पुसद परिसरातील बरेच भाविक फक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आम्ही घटनात्मक हक्कापासून किती वर्षे वंचित राहायचं?

## ट्रायबल फोरमचा सवाल : सहा वर्षापासून आदिवासींची पदभरती रखडली

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : गेल्या चार दशकापासून राज्यातील शासकीय, निमशासकीय, शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये, शासकीय व खाजगी शिक्षण संस्था यांच्या आस्थापनेवरील अनुसूचित जमातीची १२ हजार ५२० पदे खोट्या जातप्रमाणपत्राच्या आधारे बिगर आदिवासींनी बळकावलेली आहेत.परंतु गेल्या सहा वर्षापासून आदिवासींची विशेष पदभरती मोहीम रखडली आहे.


आम्ही घटनात्मक हक्कापासून किती वर्ष वंचित राहायचं ? असा सवाल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांना ट्रायबल फोरमचे जिल्हा उपाध्यक्ष अंकित नैताम यांनी केला आहे.

राज्यात आदिवासी उमेदवारांची विशेष पदभरती मोहीम राबविण्याबाबत नुकतेच निवेदन पाठविण्यात आले आहे.शासनाने गेल्या सहा वर्षात केवळ ६ हजार ८१० पदे रिकामी केली असून यापैकी केवळ १ हजार ३४३ पदेचं भरण्यात आली आहे. अद्यापही ११ हजार २२७ अनुसूचित जमातीचे उमेदवार आपल्या घटनात्मक हक्कापासून वंचित असल्याचा दावाही केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये ६ जुलै ,२०१७ रोजी ऐतिहासिक न्याय निर्णय दिला. तद्अनुषंगाने या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र.३१४०/२०१८ या प्रकरणात राज्यात शासकीय व निमशासकीय सेवेत आदिवासी करीता राखीव असलेली तब्बल १२ हजार ५२० पदे गैरआदिवासींनी खोटे जातप्रमाणपत्र सादर करुन बळकावली असल्याचे प्रतिज्ञापत्र खुद्द राज्य शासनानेच दिले होते. सामान्य प्रशासन विभागाच्या २१ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीची बळकावलेली पदे ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत रिकामी करुन भरायची होती.

परंतू अद्यापही भरण्यात आलेली नाही. अनुसूचित जमातीचे बेरोजगार उमेदवार आपल्या घटनात्मक हक्काच्या नोकरीसाठी तडफडत असतांना त्यांची वयोमर्यादा संपत आहे. नोकरी नसल्यामुळे त्यांच्यात नैराश्य आले.पालक चिंतेत असून शासनाचे अनुसूचित जमाती विशेष पदभरतीकडे दुर्लक्ष आहेत.

# दोन महिन्यातच नाली कोसळली ; नगरपरिषद प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - शहरातील नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक २३ शिवनगर भागातील नुकतेच बांधण्यात आलेली नाली अवघ्या दोन महिन्यात कोसळली असून यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

यासंदर्भात भारतीय जनता पार्टीच्या ओबीसी मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस सोमेश चौधरी तसेच माजी नगरसेविका रिताताई धावतोडे यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी म्हटले की, नालीचे बांधकाम अतिशय हलक्या दर्जाचे असून त्यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित इंजिनिअर तसेच ठेकेदार यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. शहरात पावसाळा सुरू झाल्याने अनेक भागांत सांडपाण्याची समस्या निर्माण होत असून नाली कोसळल्याने शिवनगर परिसरात आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यापूर्वी प्रशासनाने वेळेत योग्य दर्जाचे काम केले असते, तर ही परिस्थिती उद्भवली नसती, असे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरातील बांधकाम विभागाचा भोंगळ कारभार व ठेकेदार-प्रशासन यांची संगनमताने होणारी कामे वारंवार उघड होत असताना देखील अद्याप कोणत्याही अधिकाऱ्यावर ठोस कारवाई झाली नाही. यामुळे संबंधित विभागाचे दुर्लक्ष समोर येत आहे. दरम्यान, स्थानिकांनी तात्काळ नाली दुरुस्तीची मागणी केली असून प्रशासनाने मोका पाहणी करून पुन्हा योग्य दर्जाचे बांधकाम करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

> "जनतेचा पैसा वाया घालवणाऱ्या दोषींवर कारवाई झालीच पाहिजे" : सोमेश चौधरी
>
> या पार्श्वभूमीवर भाजपचे जिल्हा सरचिटणीस सोमेश चौधरी यांनी सांगितले की, "शहरात सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कामांमध्ये भ्रष्टाचार होत असल्याचे हे मोठे उदाहरण आहे. नागरिकांच्या पैशाचा अपव्यय थांबवण्यासाठी संबंधित इंजिनिअर आणि ठेकेदार यांच्यावर चौकशी करून कारवाई झालीच पाहिजे. अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल."

# गरीब घरातील गुणवंतांनाही घेता येणार उच्चशिक्षण, मदतीसाठी सेवा सहयोग संस्थेचा हात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : गरीब घरातील विद्यार्थी कितीही हुशार असला तरी पैशाअभावी क्षमता असूनही त्याला इंजिनियर अथवा ड़ॉक्टर होता येत नव्हते. आता ही परिस्थिती बदलली आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सेवा सहयोग संस्थेच्या विद्यार्थी विकास योजनेतून मदतीचा हात पुढे आला आहे. संस्थेकडून गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती स्वरूपात मदत दिली जाते. दहावीमध्ये ९० टक्के, बारावीत ७० टक्के आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेत चांगल्या दर्जाच्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळतील इतके गुण मिळवणारे गरजू विद्यार्थी या योजनेत मदत मिळण्यास पात्र ठरतात. संस्थेच्या वतीने गेल्या १७ वर्षात ३६ जिल्ह्यातील २ हजार ३९६ विद्यार्थ्यांना २७ कोटी ३१ लाख रूपये शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात आले. समाजातील नव्या पिढीतील गुणवत्तेला न्याय देण्याचा प्रयत्न करणाया या उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे संस्थापक रविंद्र कर्वे यांनी केले आहे. ६२३ देणगीदार आणि ५०० शुभचिंतकांच्या सहकार्याने संस्थेचे कार्य सुरू असून या उपक्रमाद्वारे मार्च अखेरपर्यंत ३४ कोटी ९० लाख रूपयांचा निधी शैक्षणिक कार्यासाठी संकलीत झाला आहे. आतापर्यंत संस्थेच्या मदतीने १३६४ विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाले. एक हजार ३२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संबंधित विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी संस्थेच्या जिल्हानिहाय कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. त्यासाठी यवतमाळ येथे प्राचार्य रामदास पदमावार 8007866321, अमरावती येथे भावना जोशी 9371460783, अकोला येथे पल्लवी कुळकर्णी 9763288870, बुलढाणा येथे राम भोसले 9881088503, वाशिम येथे विजय जाधव 9421549999, नागपूर येथे मुरली चांदेकर 9822567712 आणि वर्धा येथे भूपेंद्र शहाणे 9822200918 यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.

# यवतमाळ जिल्ह्यात पावसाची संततधार घाटंजी तालुक्यात दोघांचा पूरबळी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून, अनेक तालुक्यात पूरसदृश स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान घाटंजी तालुक्यात दोन वेगवेगळ्या घटनेत दोघांचा पुरात वाहून गेल्याने मृत्यू झाला. यामध्ये एक मृत अज्ञात असून दुसऱ्या घटनेत शिरोली येथील वृद्ध मजुराचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी सायंकाळी घडली.

घाटंजी तालुक्यात संततधार सुरू असून, नदी-नाल्यांना जोरदार पूर आला आहे. कोपरी-येरंडगाव रस्त्यावर चिंचोली गावाजवळील पुलावरून गावकऱ्यांना वाघाडी नदीच्या पुरात एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह वाहत जाताना दिसून आला. संजय तुरक पाटील आणि इतर ग्रामस्थांनी तो मृतदेह बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रवाह इतका वेगवान होता की, मृतदेह तरोडा गावाच्या दिशेने पुढे वाहून गेला. या व्यक्तीची ओळख पटलेली नव्हती आणि मृतदेहचाही शोध लागला नव्हता. हे शोधकार्य आजही सुरू होते. दुसऱ्या घटनेत नाल्याला आलेल्या पुरात घाटंजी तालुक्यातीलच शिरोली येथील संभाजी भुऱ्या आत्राम (६०) यांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, संभाजी आत्राम हे पत्नी शांता यांच्या सोबत शेतात मजुरीचे काम करत होते. दि. ५ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता ते शेतात गेले होते. काम संपल्यावर पत्नी घरी परतली, मात्र संभाजी आत्राम यांनी ''मी नंतर येतो'' असे सांगून शेतातच थांबले. रात्री ८ वाजेपर्यंत ते घरी परतले नसल्याने कुटुंबीयांनी आणि नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली. पावसामुळे नाल्याला आलेल्या पुरामुळे संभाजी आत्राम हे नाला ओलांडताना वाहून गेले असावेत, असा अंदाज होता. रविवारी माणिक विठ्ठल आत्राम यांच्या शेतालगत असलेल्या झाडाजवळ अडकलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळून आला.

# खरबी येथे जुगार अड्डयावर छापा, ९ जणांवर गुन्हे दाखल, ४ लाखाचा मुद्देमाल जप्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : नांदेड जिल्हयाचे सिमेलगत यवतमाळ जिल्हा हद्यीतील दराटी पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात येणाऱ्या तालुक्यातील खरबी गावच्या शेतशिवारामध्ये स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून 52 पत्ते जुगार अडयावर छापा टाकून ९ जणाविरोधात गुन्हे दाखल करून ४ लाख १७ हजार २२० रुपयाचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना काल दिनांक ६ जुलै रोजी सायंकाळ दरम्यान घडली.

नारायण बुमन्ना कनपिलवाड(56) रा.मांडवा ता. किनवट जि. नांदेड, गणेश भिकू जाधव(36 ) रा. आंबाडी ता. किनवट जि. नांदेड, महेंद्र नारायणराव गंदमवार(47 ) रा. किनवट वेलमापुरा ता. किनवट जि. नांदेड, प्रल्हाद लक्ष्मण शिंदे(42) रा.दाभाडे नगर किनवट ता. किनवट जि. नांदेड,असद खान मेहबुब खान(56)रा. शिवाजीनगर किनवट ता. किनवट जि. नांदेड, राम जयराम राठोड (55) रा. मलकापूर ता. किनवट जि.नांदेड, रंगराव हिरामण राठोड(50) रा. बेंडीतांडा ता. किनवट जि. नांदेड, मुकेश प्रभाकर जाधव(50) रा. रामनगर ता. किनवट जि. नांदेड असे 52 पत्ते जुगार खेळत असतांना मिळून आलेल्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे . यावेळी त्यांची अंगझडती तसेच सदर ठिकाणारवरुन एकूण 4,17, 220/- रुचा मुददेमाल जप्त करुन त्याचे विरुध्द मजुका कलम 12 अ अन्वये गुन्हा दाखल करुन पुढील कारवाई करीता पोलीस स्टेशन दराटी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता , अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप , उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड पोलीस निरीक्षक सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, यांचे मार्गदर्शनात स.पो.नि. धिरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, पोहवा.मुन्ना आडे, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, पोशि सुनिल पंडागळे, चापोउपनि रविंद्र शिरामे, पोशि राजेश जाधव सर्व स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# वेचक



## संजय खाडे यांच्याहस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान सभा मंडपाचे भूमिपूजन

वणी - शहरातील आंबेडकर चौक येथील श्री विठ्ठल रुक्माई हेमाळपंती देवस्थानात आषाढी एकादशी निमित्त कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. आषाढी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात भव्य दिव्य अश्या सभा मंडपाच्या भूमिपूजनांचा सोहळा संपन्न झाला. नवशक्ती दुर्गा माता मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष रवी बेलुरकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे उद्घाटक संजय खाडे अध्यक्ष-जय जगन्नाथ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड वणी, संचालक कापूस उत्पादक पणन महासंघ मुंबई, तसेच सामाजिक कार्यकर्ते यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले. मंदिर कमेटिचे उपाध्यक्ष दौलत वाघमारे, प्रमोद लोणारे, चंदन मोहुर्ले, नितीन बिहारी, रितेश सानेकर, धनु उईके, निकेश कडूकर, सुरेश मांडवकर,गणेश लाकडे यांची भूमिपूजन कार्यक्रमाला उपस्थिती होती. यावेळी ट्रस्टचे -अध्यक्ष रवि बेलुरकर यांनी मंदिर सभागृह बांधून पुढच्या आषाढी एकादशी पर्यंत वणीतील भक्तांचे दर्शनासाठी लोकार्पन करण्याचा मानस दाखविला तेव्हा वणी शहरातील भाविक भक्तांचे मंदिरात दर्शनासाठी गर्दी उसळली होती या भूमिपूजन कार्यक्रमासाठी वार्डातील सर्व महिला व पुरुषांनी तसेच मुलांनी सहकार्य केले व नंतर दुपारी बारा वाजता फराळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवशक्ती मंडळाचे सचिव -प्रमोद लोणारे यांनी केले तर उपाध्यक्ष- दौलत वाघमारे यांनी आभार मानले.

## फॅमिली कोर्ट बार असोशिएशनचा स्तुत्य उपक्रम : प्रथम वर्धापन दिनानिमित्त १०१ वृक्ष लागवड



यवतमाळ : जिल्ह्यातील फॅमिली कोर्ट बार असोशिएशन, यवतमाळ यांच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या निमित्ताने १०१ विविध जातींच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. फॅमिली कोर्ट बार असोशिएशन, यवतमाळ गेल्या वर्षभरापासून वकिलांचे हित जपत नागरिकांच्या कायदेशीर हक्कांसाठी सातत्याने कार्यरत आहे. सामाजिक भान ठेवून असोशिएशनने यंदा वर्धापन दिनानिमित्त निसर्ग संवर्धनासाठी पुढाकार घेत १०१ वृक्षांची लागवड केली. असोशिएशनचे अध्यक्ष ॲड. वैभव एडके, उपाध्यक्ष ॲड. जितेश पवार आणि कोषाध्यक्ष ॲड. शुभम पुंडकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी असोशिएशनच्या सदस्यांनी निसर्गाप्रती असलेले कर्तव्य जपत वृक्षारोपणात सहभाग घेतला. तसेच, वर्धापन दिनाचे औचित्य साधून "एक हात मदतीचा" उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील विविध वृद्धाश्रमांना भेटवस्तू दिल्या जाणार आहेत. यासोबतच कायदेशीर जनजागृतीसाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष ॲड. वैभव एडके व उपाध्यक्ष ॲड. जितेश पवार यांनी दिली. पर्यावरण संवर्धनासोबतच समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य करणे, हेच खरे सामाजिक कर्तव्य असल्याचा संदेश फॅमिली कोर्ट बार असोशिएशन, यवतमाळने या उपक्रमातून दिला आहे.

## अनुसूचित जातीच्या बचतगटांना मिनी ट्रॅक्टर

यवतमाळ : अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटाकरिता मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधणे ही योजना सामाजिक न्याय विभागाच्यावतीने राबविण्यात येत आहे. यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. योजनेंतर्गत पात्र गटास 90 टक्के शासकीय अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरविण्यात येते. जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या बचतगटांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय यवतमाळ येथे दि. 31 जुलै पर्यंत सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावे, असे आवाहन समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त मंगला मुन यांनी केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# बच्चू कडूंच्या ७/१२ कोरा कोरा यात्रेला प्रारंभ

### भर पावसात शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने हजेरी






**अमरावती/प्रतिनिधी**

देशाचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ७/१२ कोरा कोरा कोरा यात्रेला आजपासून सुरुवात झाली आहे. उंबर्डा बाजार, मानकी, वळसा, तिवरी, तुपटाकळी, काळी दौलत, गुंज अशी गावे करत चिलगव्हाण या स्व. साहेबराव करपे यांच्या रणभूमीमध्ये या यात्रेची सांगता होणार आहे. भर पावसात सुमारे १३८ किमीच्या या यात्रेला शेतकरी, पक्षातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली आहे. सरकारने ७/१२ कोरा केलाच पाहिजे अशी मार्गनी करीत शेतकरी मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी होत आहेत.

आज सकाळी १० वाजल्यापासून पापळ येथून सुरु झालेल्या ७/१२ कोरा कोरा यात्रेत शेतकरी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. १४ जुलै रोजी चिलगव्हाण येथे या यात्रेची जाहीर सांगता सभा होणार आहे. ८ दिवसांच्या कालावधीत एकूण १३८ किमी पदयात्रा चालणार आहे. प्रहार नेते बच्चू कडू ७/१२ कोरा कोरा यात्रेच्या माध्यमातून गावागावात शेतकऱ्यांना, कष्टकरी समाजाला भेटून त्यांच्या समस्या समजून घेणार आहेत.

**लाडकी बहिण योजनेच्या वेळी समिती केली काय?**

माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ७/१२ कोरा कोरा कोरा यात्रेला आजपासून सुरुवात झाली. या यात्रेत सहभागी झालेल्या आंदोलक शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्यावेळी लाडकी बहीण योजना आणली त्यावेळी कोणती समिती गठीत केली काय? तर नाही मग शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी समिती कशाला तयार करत आहेत. थेट घोषणाच केली पाहिजे, अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली.

**सरकारने सातबारा कोरा करू सांगत फसविले**

बच्चू भाऊ कडू यांनी ज्यावेळी अन्नत्याग आंदोलन केले.त्यावेळी या सरकारने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीबाबत आश्वासन दिले होते. मात्र, त्यांनी ते पूर्ण केलेले नाही. काल आषाढी एकादशी निमित्त मुख्यमंत्री फडणवीस पंढरपूरला विठूरायाच्या शासकीय पूजेला गेले होते. त्यावेळी लाखो शेतकरी, भाविक उपस्थित होते. त्यांच्या समोर देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफी, सातबारा कोरा करण्याची घोषणा करायला हवी होती. मात्र, ती त्यांनी केली नसल्याचे आंदोलक शेतकऱ्यांनी म्हटले.

# सर्वाधिक अनुशेषग्रस्त जिल्ह्यांप्रती राज्यकर्त्यांची अनास्था

### प्रा. बी.टी. देशमुख यांची टीका

**अमरावती/का.प्र.**

अमरावती विभागातील अमरावती व वाशीम जिल्ह्याचा अनुशेष पूर्णपणे संपुष्टात आलेला आहे, असे राज्याच्या मुख्य सचिवांनी १६ एप्रिल २०२५ रोजी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सादर केलेल्या शपथपत्रात नमूद केले आहे. राज्यकर्त्यांची ही अधिकृत भूमिका सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांप्रती अत्यंत अशोभनीय वर्तन होय, अशी टीका माजी विधान परिषद सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी केली.

'जलसिंचन अनुशेष' या शब्दाची व्याख्या कोणाच्या मर्जीवर किंवा लहरीवर अवलंबून राहिलेली नाही, तर महाराष्ट्रामध्ये निश्चित अर्थ असलेली संज्ञा म्हणून स्थिर झालेली आहे. सत्यशोधन समितीच्या अहवालाने सर्वप्रथम ते ठरवून दिलेले आहे. 'अद्ययावत राज्य सरासरी पेक्षा जास्त किंवा निदान राज्यसरासरी इतकी सिंचनक्षमता ज्या दिवशी पदरी पडते त्याच दिवशी तो जिल्हा अनुशेषमुक्त होतो' अशी ही व्याखा सत्यशोधन समितीच्या अहवालाने ठरवून दिलेली आहे. अनुशेष व निर्देशांक समितीने ती व्याख्या जशीच्या तशी मान्य करून त्याप्रमाणे जलसिंचन अनुशेष निश्चित केला आहे, असे प्रा. देशमुख यांनी 'नुटा बुलेटिन' मध्ये नमूद केले आहे. ही व्याख्या लक्षात घेता विदर्भातील सहा महत्तम सिंचन अनुशेषग्रस्त जिल्ह्यांचा अनुशेष नष्ट होणे तर दूरच राहिले, पण कितीतरी पटीने तो वाढलेला आहे हे स्पष्ट होईल. २००६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी प्रत्यक्ष विदर्भाला भेट देऊन या सहा जिल्ह्यांसाठी २१७७ कोटी रुपयांचा निधी केंद्रशासनातर्फे त्यावेळी उपलब्ध करून दिला होता. असे असताना आता या अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील अनुशेष संपुष्टात आलेला आहे, हे म्हणणे किती लबाडीचे आहे, हे आकडेवारीतून दिसून येते, असेही त्यांनी म्हटले आहे.

राज्य सरासरीवर येण्यासाठी जेवढ्या हेक्टरची सिंचनक्षमता त्या जिल्ह्यात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे तेवढ्या हेक्टरचा त्या जिल्ह्याचा अनुशेष निश्चित होतो.

यालाच हेक्टरातील (भौतिक) अनुशेष म्हटले जाते. एकदा भौतिक अनुशेष निश्चित झाला की, तो अनुशेष दूर करण्यासाठी लागणाऱ्या रकमेला 'आर्थिक अनुशेष' असे संबोधले जाते. सत्यशोधन समितीचा अहवाल दाखल झाला त्यावेळेला ही रक्कम प्रतिहेक्टर १० हजार रुपये होती. अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल तयार झाला त्यावेळेला ही रक्कम ५० हजार रुपये प्रति हेक्टरी होती. आता प्राधिकरणाचा २०२०-२१ चा अहवाल सादर करीत असताना प्रतिहेक्टरी अनुशेष दूर करण्यासाठीची रक्कम ही २ लाख २ हजार ८८६ रुपये इतकी पाटबंधारे विभागाने अधिकृतपणे सांगितली आहे. त्यामुळे आर्थिक अनुशेष कितीतरी पटीने वाढला आहे. अमरावती विभागाचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष ४१७ कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार २१ हजार ५४० कोटी रुपये झाला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ५१ पटीहून जास्त वाढलेला आहे, याकडे प्रा. देशमुख यांनी लक्ष वेधले.

# अमरावतीच्या सुपर हॉस्पिटलसाठी अधिकाधिक निधी द्या-आ.संजय खोडके

### सुपर हॉस्पिटल संदर्भात सकारात्मक निर्णय-आरोग्यमंत्री आबिटकर

### अतिविशिष्ट डॉक्टरांना मिळणार वाढीव मानधन

**अमरावती/का.प्र.**

राज्यात नाशिक व अमरावती या दोन ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु असून अमरावतीच्या सुपर साठी तुलनात्मकदृष्ट्या कमी निधी मिळतो. वर्ष २०२५-२६ च्या पुरवणी मागणीत सुपर हॉस्पिटलसाठी १३९ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अमरावती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी अधिकाधिक निधी देण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके यांनी पावसाळी अधिवेशनातून केली आहे.




राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानपरिषदेतील कामकाजादरम्यान वर्ष २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करतांना आ. संजय खोडके यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती करिता पुरवणी बजेटमध्ये अधिकाधिक निधी देण्याची मागणी केली. मात्र शासनाकडून निधीचे वाटप होत असतांना अमरावती व नाशिक करिता एकत्रित बजेट करून निधी दिला जातो.ज्यामध्ये नाशिक येथे केवळ तीनच विभाग सुरु असतांना अमरावती पेक्षा अधिक निधी मिळतो.

तर अमरावती येथे सात युनिट कार्यरत असतांना निधी कमी मिळतो. यावर्षीच्या पुरवणी मागणीत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल करिता १३९ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. म्हणून निधी देतांना अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल करिता बजेट मध्ये स्वतंत्र प्रावधान करून अधिकाधिक निधी देण्याची मागणी आ. संजय खोडके यांनी सभागृहातून केली.

यावर उत्तर देतांना राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी सभागृहात सांगितले कि, सदस्यांनी मांडलेल्या लक्षवेधीच्या अनुषंगाने आगामी काळात निश्चितपणे सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल. तसेच सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल मधील अतिविशिष्ठ सेवा देणाऱ्या डॉक्टरच्या वाढीव मानधनासंदर्भात मुख्यमंत्री महोदय व आरोग्य विभागासोबत बैठक घेऊन त्याबाबतच्या सूचना देण्यात येईल. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेचा १०० टक्के निधी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल ला देण्यासंदर्भात आगामी कॅबिनेटच्या बैठकीमध्ये निर्णय घेणार असल्याचे उत्तर मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी सभागृहासमक्ष दिले.

# शासनाने उड्डाण पुलाची मागणी फेटाळली

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

परिसरातील अंजनगाव बारी - पार्डी (देवी) मार्गावरील रेल्वे गेट जवळील भुयारी मार्ग पावसाळ्याचे दिवसात पावसाच्या पाण्याने भरुन जात असल्याने हा मार्ग वाहतुकीच्या दृष्टीने निरुपयोगी ठरत आहे.हा भुयारी मार्ग बांधणीस सुरु करण्याआधी संबधीत गाव प्रशासनाने रेल्वे प्रशासन व शासन उड्डाण पुलाची मागणी केली होती. मात्र शासनाने उड्डाण पुलाची मागणी फेटाळून लावली.



अंजनगाव बारी - पार्डी हा मार्ग थेट अमरावती ते नागपूर असा जोडला गेला आहे. त्यामुळे या मार्गाने दररोज शेकडो लहान मोठी वाहने धावतात. यातच पार्डी(देवी) रेल्वे गेट लास तास बंद राहत असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत होता. या कारणास्तव भुयारी मार्गाचे निर्माण करण्यात आले. मात्र हा मार्ग पावसाचे दिवस वगळता सुरु ठेवता येतो. हा भुयारी मार्ग याठीकाणी पूर्वी असलेल्या नाल्यातुनच काढला गेला आहे. या नाल्यामध्ये अंजनगाव बारी पासून येणारे लहान मोठ्या नाल्याचे पाणी वाहत येते म्हणून साचलेल्या पाण्याचा वरचेवर विल्हेवाट लावणे गरजेचे ठरते. अन्यथा या मार्गातून दुचाकी, बैलगाडी,ऑटोरिक्षा गेल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

पार्डी (देवी )गेट नं. ६८ भूयारी मार्ग दरवर्षी प्रमाणे यंदाही पावसाळ्यात नागरीक व वाहतुकीस ये-जा करण्यास निरुपयोगी ठरत आहे. म्हणून जोपर्यंत या मार्गाचे काम पुर्ण होत नाही तोपर्यंत हा मार्ग बंद ठेवण्याची मागणी ग्रामपंचायत पार्डी (देवी) यांनी जिल्हाधिकारी व आमदार यांना लेखी निवेदना तून केली आहे. अन्यथा., आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी अक्षय मेश्राम सरपंच पार्डी (देवी),तुकाराम चव्हाण, दिलीप पाटील, गुलाब नबी, किशोर पाटील,अजय घुले, सुधाकर काळे, उद्धव कराळे, मनोहर मारोडकर, प्रवीण अरक, अजबराव गंगात्रे. सुरेश इंदाने आदी ग्रामस्थ व युवा स्वाभिमान कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाळ - मृदंगाचा गजरात रंगला आषाढी एकादशीचा सोहळा

**अमरावती-**सदिच्छा कॉलनी - विनायक नगर येथे आषाढी एकादशीच्या निमित्त श्री. विठ्ठल रुख्मिणी मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात आ सुलभा खोडके यांनी सर्वप्रथम भगवान श्री विठ्ठल व रुख्मिणी मातेचे दर्शन घेऊन कृपाशीर्वाद घेतले. यादरम्यान त्यांनी विठुरायाच्या प्रतिमेस पूजन, वंदन, माल्यार्पण करून विश्वमांगल्याची प्रार्थना केली. याप्रसंगी आसरा माता विठ्ठल मंदिराच्या वतीने आ.सुलभा खोडके यांचा शाल - श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.संजय खोडके, सदाशिवराव चिंचे, वामनराव खरबडे, विजयराव भुयार, ओंकारराव बोबडे, विश्वासराव बोबडे, सुधाकरराव मोडक,प्रमोद महल्ले, संजय भोगे,योगेश सवई, अविनाश मार्डीकर, छोटू पाटील, मंगेश मनोहरे, दीपक इंगोले, उत्तमराव राऊत, प्रवीण आकोडे आदिसहीत श्री. विठ्ठल रुख्मिणी मंदिर, सदिच्छा कॉलनी - विनायक नगर तसेच आसरामाता विठ्ठल मंदिर, यशोदा नगर येथील भावीकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बीएसएफने घेतली खा. बळवंत वानखडे यांची भेट

**अमरावती-**सेवानिवृत्त सैनिकांच्या बीएसएफ अर्थात बॉर्डर



सिक्युरिटी फोर्स असोसिएशन्ने खासदार बळवंत वानखडे यांची नुकतीच त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.या भेटी दरम्यान अध्यक्ष श्रीकांत शेगोकार यांच्यासोबत मोहन मालीये,किशन पुराम, जामुवंत कोरमेकर, रामा सोळंके, सुधीर सहारे ही मंडळी हजर होती.ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. गोविंद कासट यांचे मार्गदर्शन असलेल्या संघटनेच्या वतीने अध्यक्ष श्रीकांत शिगोकार यांनी संघटनेच्या जागेवर ऑफिसवर झेंडा बीट स्थापन करण्यास सहकार्य करावे व आर्मीला जी कॅन्टींग सेवा मिळते ती बीएसएफ संघटनेलाही अर्थात सदस्यांना देण्यात यावी अशा मागणीचे निवेदन खासदारांना देण्यात आले. खासदारांनी मागण्यावर सकारात्मक विचार करण्याचे व मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले.

### प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा यांना

# टीसीएसकडून 'प्रेफर्ड इन्स्टिट्यूट' मान्यता

### गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन व ठसठशीत प्लेसमेंटचे गौरवशाली फलित

### यावर्षी ५६० विद्यार्थ्यांना प्लेसमेंट

### सयाजी गावंडेला १२ लाखाचे पॅकेज



**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध असलेल्या प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च (PRMIT&R), बडनेरा या प्रतिष्ठित अभियांत्रिकी महाविद्यालयाने आणखी एक मोठा मैलाचा दगड गाठला आहे. देशातील आघाडीची IT कंपनी TataConsultancy Services (TCS) कडून PRMIT&R ला 'प्रेफर्ड इन्स्टिट्यूट' म्हणून अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे. ही मान्यता संस्थेच्या सातत्याने उंचावणाऱ्या शैक्षणिक गुणवत्तेची, संशोधनातील ठसा उमटवणाऱ्या कामगिरीची आणि उत्तम प्लेसमेंट रेकॉर्डची साक्ष आहे. या मान्यतेमुळे आता TCS नियमितपणे संस्थेला भेट देऊन, अधिकाधिक विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून देईल. यामुळे संस्थेतील विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअर घडवण्यासाठी अधिक व्यापक आणि दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

**अभ्यासक्रम, संशोधन व प्लेसमेंटमध्ये सातत्यपूर्ण उत्कृष्टता**

PRMIT&R ने नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्याधारित प्रशिक्षण, तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर भर दिला आहे. याच धोरणामुळे देशातील अनेक नामवंत कंपन्या दरवर्षी या संस्थेला भेट देतात. चालू शैक्षणिक वर्षात आतापर्यंत ५६० विद्यार्थ्यांनी विविध नामांकित कंपन्यांमध्ये यशस्वीरीत्या प्लेसमेंट मिळवली आहे. याशिवाय, TCS आणि Accenture या कंपन्यांचे अंतिम निकाल अजून अपेक्षित आहेत, ज्यामुळे प्लेसमेंटची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, यावर्षी १२ विद्यार्थ्यांना ९लाख किंवा त्यापेक्षा जास्त वार्षिक पॅकेजच्या ऑफर प्राप्त झाल्या आहेत. एचएसबीसी मॉर्गन स्टेनली आणि कंसल्ताड सारख्या कंपन्यांनी हे आकर्षक ऑफर्स दिले आहेत. कंप्युटर सायन्स विभागातील सयाजी गावंडे या विद्यार्थ्याने कंसल्ताड कंपनीकडून 12 LPA चे सर्वोच्च पॅकेज मिळवले आहे, जे संपूर्ण संस्थेसाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सांगीतेले की 'PRMIT&R ने संस्थेच्या स्थापनेपासूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीवर भर दिला आहे. दर्जेदार अध्यापन, आधुनिक प्रयोगशाळा, संशोधनासाठी अनुकूल वातावरण आणि उद्योगांशी घनिष्ठ संबंध यामुळे संस्थेची एक विश्वासार्ह प्रतिमा निर्माण झाली आहे. TCS कडून मिळालेली 'प्रेफर्ड इन्स्टिट्यूट' ही मान्यता हे आमच्या कार्याची पावती आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्या मेहनतीचेच नाही, तर आमच्या संपूर्ण शैक्षणिक व प्राशासनिक टीमच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. भविष्यात आम्ही विद्यार्थ्यांसाठी अधिकाधिक संधी निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. त्यांनी ट्रेनिंग एंड प्लेसमेंट विभागाची स्तुती करत त्यांच्या प्रयत्नांना वखाणले.

डॉ. गजेंद्र बामनोटे, प्राचार्य, PRMIT&R यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगितले की,'गेल्या काही वर्षांपासून आमच्या संस्थेतील प्लेसमेंट प्रक्रिया अधिकाधिक परिणामकारक ठरत आहे. गुणवत्ता आणि संख्या दोन्ही दृष्टीने आमचा प्लेसमेंट ग्राफ सातत्याने वाढत आहे. विद्यार्थ्यांनी तांत्रिक कौशल्ये, सॉफ्ट स्किल्स आणि स्वयंशिस्त यावर विशेष भर दिला आहे. ऊणए कडून मिळालेली मान्यता हे आमच्या शैक्षणिक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि गुणवत्ता टिकवण्याच्या निष्ठेचे प्रतीक आहे. यशाची ही परंपरा आम्ही भविष्यातही सुरु ठेवू.'

डॉ. निक्कू खालसा, डीन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट या प्रसंगी मत मांडताना म्हणाले की , 'विद्यार्थ्यांच्या यशामागे सातत्यपूर्ण तयारी, नियमित तांत्रिक व सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण, मॉक इंटरव्ह्यूज, विविध नॅशनल लेव्हल कोडिंग स्पर्धांमधील सहभाग, आणि त्यांच्या आत्मविश्वासाचा मोठा वाटा आहे. आम्ही विद्यार्थ्यांना केवळ नोकरी मिळवून देणे एवढ्यावर थांबत नाही, तर त्यांना उद्योगक्षेत्रातील नेतृत्व भूमिका स्वीकारण्यासाठीही सक्षम बनवतो. प्लेसमेंट टीम आणि संपूर्ण अध्यापकवर्गाने खूप मेहनत घेतली आहे. भविष्यात विद्यार्थ्यांना देश-विदेशातील नामवंत कंपन्यांमध्ये उत्कृष्ट संधी मिळवून देण्याचा आमचा दृढ संकल्प आहे.' PRMIT&R च्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब करणारी ही मान्यता केवळ संस्थेसाठी नव्हे, तर संपूर्ण अमरावती विभागासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठीही नामांकित कंपन्यांमध्ये करिअर घडवण्याचे दरवाजे मोठ्या प्रमाणात खुला झाले आहेत. ऊणए कडून मिळालेली 'प्रेफर्ड इन्स्टिट्यूट' ही मान्यता भविष्यातील विद्यार्थ्यांसाठी नवे मार्ग उघडणारी ठरणार असून, PRMIT&R संस्थेने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्ता केंद्रित कार्याची भक्कम छाप औद्योगिक क्षेत्रावर उमटवली आहे. विदर्भातील सर्वसामान्य विद्यार्थाला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात टिकून राहण्या करिता संवाद कौशल्य, भाषा प्रभुत्व, अँप्टिटयूट ट्रैनिंग, इंटरव्हिव टेकनिक आदी बाबींवर द्वितीय वर्षापासूनच तयारी करून घेण्याचे काम अतिशय सातत्य पूर्वक डीन डॉ निक्कू खालसा यांच्या नेतृत्वात प्रा. आनंद चौधरी (प्लेसमेंट ऑफिसर)व डॉ. प्रांजली देशमुख(ट्रैनिंग ऑफिसर) करीत आहेत. या प्रसंगी विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी चे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, उपाध्यक्ष एड उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे,डॉ पूनमताई चौधरी, पंकज देशमुख,प्रा.विनय गोहाड, प्रा.गजानन काळे, प्राचार्य डॉ गजेन्द्र बामनोटे यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले व महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण प्रगतीचा आलेख भविष्यात उंचावत नेण्या विषयी आशावाद व्यक्त केला.

# भाषेच्या लढाईचे निव्वळ अस्मिताखोर राजकारण नको

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गेली काही दशके चर्चिला गेलेला विषय नुकताच किनाऱ्याला लागला आहे. राज आणि उद्धव ठाकरे एकत्र आले आहेत. गेली काही महिने पेटून उठलेला मराठीचा मुद्दा आता दोन्ही बंधूंच्या गळाभेटीने तुर्तास तरी साजरा होताना दिसतो आहे. हिंदी सक्तीचा अध्यादेश आल्यापासून उभी राहिलेली भाषिक चळवळ आणि तिचे राजकारण विविध अंगाने ढवळून निघाले. नागरी समाज ते राजकीय पक्ष आणि समाज माध्यमांवरून ते रस्त्यावरच्या आंदोलनापर्यंत विविध घटकांनी भाषिक चळवळीच्या राजकारणाला गेल्या काही दिवसात आपापल्या मर्यादेत आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. ठाकरे बंधूंचे एकत्र येणे साजरे होत असताना मराठी भाषिक चळवळीच्या वर्तमानातील तात्त्विक आधारांची चिकित्सा अपरिहार्य ठरते. विज्योत्सवाचे भव्य सोहळे उभे राहताना जमीन पुन्हा चाचपडण्याची आवश्यकता नेहमीच असते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीला असलेला पुरोगामी वैचारिक पाया स्पष्ट होता. भाषेच्या आणि प्रदेशाच्या प्रश्नांचे वर्गीय, जातीय कंगोरे जाणणारे आणि त्यावर आधारलेला कार्यक्रम देणारे नेतृत्व आणि समाजमन तेव्हा अस्तित्वात होते. सामाजिक न्यायाची आणि भाषेची चळवळ गुंफण्याची आणि त्यातले संबंध स्पष्ट करून देण्याची वैचारिक- बौद्धिक सामग्री तत्कालीन नेतृत्वाकडे होती. अगदी संयुक्त महाराष्ट्र समितीने निवडणुकांच्या राजकारणात प्रवेश करत निवडणूकदेखील लढवली पण आपली पुरोगामी वैचारिक सुस्पष्टता कायम राखली.

भाषिक चळवळीला निव्वळ अस्मितेच्या अंगाने – इतर कोनांपेक्षा निराळे काढून- पाहाण्यापासून ते तिचे प्रक्षोभक अवडंबर उभे करण्यापर्यंत अनेक प्रकार गेल्या काही दशकांमध्ये दिसले. भाषिक चळवळीला निव्वळ अस्मितेपुरते, भावनिक राजकारणापुरतेच मर्यादित ठेवण्याचा पायंडा जसजसा पडत गेला तसतसे आपले 'संयुक्त महाराष्ट्रा'च्या वेळच्या भाषिक राजकारणापासूनचे अंतर वाढत गेले आणि उजव्या विचारांच्या पक्षांच्या हवाली भाषिक राजकारणाची मक्तेदारी आपण सोपवत गेलो. उजव्या पक्षांनी निव्वळ अस्मितेचे राजकारण पाहात त्याचे निवडणुकांच्या राजकारणापर्यंत प्रक्षोभक उभे करणे इथवरच आपली मर्यादित मजल जात राहिली. मात्र 'अस्मिते'चे राजकारण 'खेळणारे' उजवे पक्ष नेहमीच भांडवली, जातीय हितसंबंधदेखील जपत राहिले, हे पुढे लपून राहिले नाही. पर्यायाने पुरोगामी छावणीतील एक मोठा वर्ग मराठी भाषिक चळवळीपासून दूर फेकला जाऊ लागला.

उजव्या विचारसरणीच्या पक्षांकडे भाषिक राजकारणाची मक्तेदारी असणे आजवर विसंगती जन्मास घालत आले आहे. भाषेचे प्रश्न समग्र न पाहता



आणि भाषेला जोडलेले काही कळीचे प्रश्न सोयिस्कर बाजूला ठेवण्यात या पक्षांनी भूमिका बजावली. झपाट्याने उभ्या राहिलेल्या भांडवली व्यवस्थेतील मराठीचे अन् मराठी ग्राहक, उत्पादकांचे स्थान किंवा भाषेच्या आधारावर जातीय व्यवस्थेची केलेली पुनर्स्थापना इत्यादी क्लिष्ट विषयांना वाचा न फोडता भाषेचे प्रश्न निव्वळ अस्मितेच्या जिवावर सुटतील अशी धारणा या पक्षांनी समाजमनावर बिंबवली. प्रामुख्याने ही त्यांच्या सोयिस्कर आकलनाची मर्यादा आहे. उद्धव ठाकरे यांच्या भाषणातील एक वाक्य हे स्पष्ट करून जाते- 'आम्हाला हिंदू हिंदुस्थान मान्य पण हिंदी नाही' ही अतिशय बोलकी विसंगती आहे. 'हिंदी हिंदू हिंदुस्थान' हा संघ भाजप प्रणित राजकारणाचा एकसंघ प्रकल्प आहे. तो तुम्हाला हवा तसा तुकड्यात स्वीकारता येणारच नाही. एकाधिकारशाही राज्य स्थापण्यासाठी एकजिनसी भाषिक, धार्मिक आणि भौगोलिक पाया तयार करणे असा त्यांचा प्रकल्प समग्र आहे. त्याला पर्याय म्हणून आपल्याकडे फक्त तुकड्यातील प्रतिक्रिया आहेत. भाषिक अस्मितेसारखी महत्त्वाची लढाई निव्वळ आपल्याला समग्र पाहता येत नसल्याने आजवर पोकळ वाटचाल करत आली आणि त्याचे श्रेय भाषिक राजकारणाच्या मक्तेदारांना जाते.

भाषिक चळवळीच्या निमित्ताने नागरी समाजाने पुन्हा स्वतःला राजकीय पक्षांच्या परिघाच्या बाहेर स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे आणि तो वाखाणण्याजोगा आहे. विशेषतः 'शालेय शिक्षण अभ्यास आणि कृती समन्वय समिती' आणि डॉ. दीपक पवार यांनी घेतलेली कणखर भूमिका इथे महत्त्वाची ठरते. प्रस्तुत काळातील प्रश्नांची योग्य आणि समग्र सांगड घालून 'मराठीकरण' हे पर्यायी राजकारण उभे करण्याचा प्रयत्न होणे ही सध्याच्या मराठी भाषिक राजकारणातील महत्त्वाची घटना ठरते. अर्थातच उजव्या पक्षांना, वर स्पष्ट केलेल्या विसंगतीमुळे, 'मराठीकारण' कितपत सहन होते हा प्रश्न आहेच. दुर्दैवाने नागरी समाजातील चळवळींना आणि दबावगटांना राजकीय पक्षांसारखी स्वीकारार्हता आपल्याकडे आजही नाही. त्यामुळे आपले राजकीय पक्षांच्या अवतीभोवती फिरणारे संकुचित राजकारण या निमित्ताने पुन्हा स्पष्ट होते.

ठाकरे कुटुंब आणि मराठीच्या राजकारणाचे एक समीकरण महाराष्ट्रावर बिंबवले गेले आहे. किंबहुना त्याचे 'पेटंट' जणू त्यांच्या नावावर आहे. दोन्ही बंधूंच्या एकत्र येण्याने हिरमुसलेल्या मराठी मनाला चेतना मिळाली, त्या दृश्याने चळवळीला हवा असणारा जोर मिळाला किंवा उभे मराठी मन एक झाले हे ग्राह्य धरले तरीही या संदर्भात उभ्या राहिलेल्या विसंगतीबद्दलही बोलण्याची हीच वेळ आहे. भाषिक चळवळीचे लोकशाहीकरण करण्यात आपण असफल आहोत हेच 'आडनाव'पूजक समाज म्हणून आपण स्पष्ट करतो आणि म्हणून अस्मितेच्या पल्याडचे भाषेला असणारे वर्गीय, जातीय कंगोरेदेखील या ठिकाणी अधिक स्पष्ट होतात. संघ, भाजप यांनी महाराष्ट्र नावाच्या 'प्रयोगशाळे'त पहिला खडा टाकून पहिला आहे. पुढचा हल्ला हा अधिक तयारीचा आणि समग्र असेल. प्रतिक्रिया म्हणून आज आपल्याकडे काय तात्त्विक आधार आहे, काय सामग्री आहे, ही सामग्री संघ-भाजपकडच्या सामग्रीसारखीच प्रतिगामी तर नाही ना, याचा सर्वांगाने विचार करणे म्हणून आवश्यक ठरते.

**केतन गजानन शिंदे**

**मातृभाषा, इंग्रजीबरोबर इतर कोणत्याही भाषा शिकणे केव्हाही चांगलेच. मात्र अमुकच भाषा अमुकच वेळी शिकली पाहिजे असा आग्रह नको. उलट हवे ते, हवे तेव्हा, हव्या त्या गतीने, पद्धतीने शिका, पण आनंदाने शिका असे लवचिक शैक्षणिक धोरण हवे. सध्याच्या गोंधळाला शासनाचा हट्टी दुराग्रहच कारणीभूत आहे. राष्ट्रीय म्हणविणारे शैक्षणिक धोरण अनेक राज्यांनी स्वीकारले नाही. खरे तर कधी काय शिकवायचे, हाच खरा प्रश्न आहे.**

# कधी काय शिकवायचे हाच खरा प्रश्न!

निवडून आलेल्या सरकारला नियम, धोरण ठरविण्याचे स्वातंत्र्य असले तरी हे करताना घेण्यात येणारे निर्णय सार्वजनिक जनहिताचेच असले पाहिजेत. त्यातही शालेय शिक्षण क्षेत्रासंबंधीचे नियम, धोरण ठरविताना विशेष काळजी घेतली पाहिजे. कारण यावर अख्ख्या पिढीचे भवितव्य अवलंबून असते. मात्र हिंदी सक्तीच्या निर्णयाबाबत राज्य सरकारने जनहिताचा विचार केला नाही हे दिसून येते.

मुलाची वयानुसार ग्रहण करण्याची क्षमता यावर मेडिकल, सायकॉलॉजिकल क्षेत्रात जगभर बरेच संशोधन झाले आहे. शिक्षण प्रणाली ठरविताना खरे तर त्याचाच उपयोग केला जातो. काळानुसार, बदलत्या परिस्थितीनुसार, उपलब्ध सोयीसुविधांनुसार त्यात सातत्याने स्वाभाविक बदल होत राहतात. मुलाची कौशल्य (स्किल डेव्हलपमेंट) क्षमता वाढायला हवी हे सर्वमान्य तत्त्व. यात संवाद, लेखन कौशल्य अर्थातच महत्त्वाचे. इथे भाषा महत्त्वाची ठरते. मातृभाषेचे महत्त्व कुणीही नाकारू शकत नाही. जर एखाद्याला आपली मातृभाषा नीट बोलता लिहिता येत नसेल तर खरेच लाज वाटली पाहिजे. मातृभाषा शाळेत जाण्याअगोदर घरातून म्हणजे आईवडिलांकडून शिकली जाते. गंमत अशी की, हे सुरुवातीचे घरचे शिक्षण कुठलेही व्याकरणाचे नियम न समजावता शिकवले जाते. लहान मुले सायकल शिकतात तेव्हा ख?या अर्थाने ते न्यूटनचे, विज्ञानाचे, गणिताचे अनेक नियम अप्रत्यक्षपणे, अजाणता पाळत असतात. त्याशिवाय तोल सांभाळता येणार नाही. हेही शिक्षणच आहे ना? याचा अर्थ कसलीही गुंतागुंत न करता अनेक गोष्टी आपण लहानपणी घरीच शिकत असतो. खरे तर भाषेचा गोंधळ, त्यातले काठिण्य शाळेत गेल्यावर, व्याकरण शिकायला लागल्यावर सुरू होते. संस्कृत, मराठी, हिंदी या आपल्या भाषांत त्या मानाने गोंधळ कमी आहे. मला नेमका संदर्भ आठवत नाही, पण एकदा एअर इंडियाच्या विमानात त्यांच्या पत्रिकेत मी एक सुंदर लेख वाचला होता. त्यात देवनागरी लिपी ही किती सोपी, सहज आहे याचे सोदाहरण सुंदर विवेचन होते. मराठी, हिंदी या भाषांची लिपी एकच आहे थोडय़ाफार फरकाने. इंग्रजीत त्या मानाने गोंधळ जास्त. स्पेलिंगच्या बाबतीत असे अनेक गोंधळ आहेत, ज्याची उत्तरे इंग्रजी प्राध्यापकांकडूनही मिळत नाहीत. ग्रीक भाषेतले स्पेलिंग आणखीच गोंधळ वाढविणारे. त्यात चक्क अल्फा, बीटा, गामा, थिटा ही गणितातली मंडळी येतात. हिंदीत काल अन् उद्या दोन्हीसाठी 'कल' हा एकच शब्द आहे. बंगालीतही तेच. यामुळे मोठी झालेली, सुशिक्षित मंडळी इंग्रजी बोलताना चक्क चुकतात!

भाषेवर प्रभुत्व नसले तरी आपले म्हणणे दुस?याला पटवून देण्यासाठी, संवाद साधण्यासाठी, व्यक्तिमत्त्व विकासासाठी उत्तम अचूक बोलता लिहिता येणे प्रत्येकासाठी गरजेचे आहे. इथे आलंकारिक, साहित्यिक



भाषा अपेक्षित नसते. थोडक्यात साधी, सरळ, सोपी, सहज, सरस भाषा प्रत्येकाला लिहिता वाचता यायला हवीच. युरोप हा अनेक देशांचा समूह आहे. प्रत्येक देशाचे शासन, संस्कृती, भाषा, जीवन पद्धती सगळेच वेगळे, पण या सर्व देशांत व्हिसाची गरज नसल्याने (युरोपात एका देशातून दुस?या देशात जायला) इथली मुले मातृभाषेव्यतिरिक्त इतर एकूण पाच भाषा शिकतात शाळेत! म्हणजे मातृभाषा, इंग्रजी अन् इतर तीन भाषा. ही भाषा शिकवतानाच त्या अनुषंगाने इतिहास, भूगोल, संस्कृती हे शिकवले जाते. ते वेगळे विषय नसतात. सायन्स, गणित जरा उशिरा अन् तेही प्रात्यक्षिके, कृती, व्यवहार या माध्यमातून शिकवले जाते. हे सर्वांगीण विकासासाठी अधिक पोषक आहे. तिथे कुठेही मुलामध्ये परीक्षेचा ताण जाणवत नाही. अनेकदा तर परीक्षा कधी कशी घेतली हे मुलाना कळतदेखील नाही. हे भूल देऊन शस्त्रक्रिया करण्यासारखे! गृहपाठदेखील फारसा नसतोच.अभ्यास म्हणजे स्वतः स्वतःहून शिकणे हा प्रकार असतो. याचा अर्थ पुस्तक वाचून या. मग आपण चर्चा करू असे. शिकण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थी इन्वॉल्व्ह होणे, त्याचा सक्रिय सहभाग असणे गरजेचे आहे. आपल्याकडे हा वन वे ट्रफिक असतो. सायन्स, गणिताच्या संकल्पनादेखील मनोरंजक पद्धतीने सोप्या भाषेत, कृतीद्वारे समजावता येणे शक्य आहे. बिहार येथील खान सर किंवा आयआयटी कानपूरचे निवृत्त प्राध्यापक शर्मा ही बोलकी उदाहरणे. आपल्या राज्यातही काही निवडक शाळांत असे प्रयोग यशस्वीरीत्या राबवले जातात. ते सार्वजनिक व्हायरल व्हायला हवेत.

मातृभाषा, इंग्रजीबरोबर इतर कोणत्याही भाषा शिकणे केव्हाही चांगलेच. मात्र अमुकच भाषा अमुकच वेळी शिकली पाहिजे असा आग्रह नको. उलट हवे ते, हवे तेव्हा, हव्या त्या गतीने, पद्धतीने शिका, पण आनंदाने शिका असे लवचिक शैक्षणिक धोरण हवे. सध्याच्या गोंधळाला शासनाचा हट्टी दुराग्रहच कारणीभूत आहे. राष्ट्रीय म्हणविणारे शैक्षणिक धोरण अनेक राज्यांनी स्वीकारले नाही त्यामागे शासनाचा अहंभाव कारणीभूत आहे. सर्व पक्ष, राज्ये, तेथील मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, शिक्षण तज्ञ यांना विश्वासात घेऊन, एका टेबलावर विचारविनिमय करून ठरवले असते तर विरोधाचा प्रश्नच नव्हता. शिक्षणात सुधारणा व्हावी, आपल्या राज्यातील तरुण मुले जागतिक स्पर्धेसाठी सक्षम व्हावीत, सर्वांगीनी विकसित व्हावीत असे कुणाला वाटणार नाही? केवळ वेबसाईटवर सूचना मागवून चालणार नाही. ती पळवाट झाली. एकत्र बसून ठरवा, निर्णय घ्या अन् त्यावर सर्वांच्या तिथल्या तिथे स्वाक्षऱ्या घ्या हव्या तर ! याला लोकशाही प्रक्रिया म्हणतात. एरवी चांगले उत्तम अहवालदेखील फायलीत धूळ खात पडून राहतात.

सध्याच्या भाषेसंबंधित निर्णयात आणखी एक गफलत झाली आहे. शाळेचे शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. शाळा, कॉलेज हे शैक्षणिक वेळापत्रकाप्रमाणे चालतात. प्रवेश घेतला त्यावेळचे नियम, कायदे लागू असतात. मधूनच बदलले की, गोंधळ होतो. कोणता कायदा, कोणते नियम कोणत्या बॅचसाठी, कुठल्या शैक्षणिक वर्षासाठी, हा प्रश्न पडतो. त्यामुळे शाळा सुरू झाल्या तरी नियम बदलणे सुरू हे मुळात चुकीचे नव्हे, तर बेकायदेशीर आहे! दुसरे म्हणजे दोन भाषा की तीन भाषा यापेक्षाही गंभीर प्रश्न शालेय शिक्षणाबाबतीत आहे. सरकारी शाळांची दयनीय अवस्था, मुलींसाठी स्वच्छतागृह, नव्या डिजिटल तंत्रासाठी इंटरनेट, संगणक, वीज. मुख्य म्हणजे नियमित संख्येत सर्व विषयांचे उत्तम शिक्षक, त्यांची (विद्यार्थ्यांची) उपस्थिती, ग्रंथालय, अद्ययावत प्रयोगशाळा, मुलांच्या मानसिक विकासासाठी समुपदेशनाची सोय, खेळाची साधने, त्यासाठी मैदान..हे सारे शासनाने दिले आहे का? असले तर ते हवे तसे कार्यान्वित होण्याच्या स्थितीत आहे का? शालेय शिक्षकांना इतर सरकारी कामात गुंतवून विद्यार्थ्यांचे नुकसान करणे योग्य आहे का? याही गोष्टींचा गंभीर विचार करा. तिसऱ्या महायुद्धाच्या तोंडावर उभ्या असलेल्या जगाला माणुसकी हाच आद्य धर्म पाळणा-या सुजाण, प्रामाणिक, स्वच्छ चारित्र्याच्या नागरिकांची गरज आहे. असे नागरिक निर्माण करणारे शिक्षण मुलांना हवे आहे. ठरल्या वेळेत, ठरावीक प्रश्नांची ठरावीक उत्तरे लिहून योग्यतेपेक्षा जास्त गुणांची उधळण झालेले विद्यार्थी नको आहेत. प्रत्यक्ष क्षमतेऐवजी खोटी प्रमाणपत्रे मिरवणारी युवा पिढी नको आहे.

**विजय पांढरीपांडे**

# भारताने राखला एजबस्टनचा गड

भारतीय कसोटी क्रिकेटच्या दृष्टीने ६ जुलै हा सर्वात मोठा दिवस मानायला हरकत नसावी. कारण कोणत्याही स्टार फलंदाज किंवा गोलंदाजाशिवाय टीम इंडियाने एजबस्टनला इंग्लंड संघाला तब्बल ५८ वर्षांनी मातीत लोळवण्याचा भीमपराक्रम गाजवला आहे. पतौडी, वाडेकर, वेंकटराघवन, कपिल देव, अझरुद्दीन, धोनी, कोहली आणि बुमराह या दिग्गज कर्णधारांना एजबस्टनचा गड सर करता आला नव्हता पण हे शिवधनुष्य शुभमनने पेलले आणि ही कसोटी दिल का नव्हे तर गील का मामला आहे हे सिद्ध केले. पहिल्या कसोटीत दुधाने पोळल्याने आपला संघ दुसऱ्या कसोटीत ताक फुंकून पिणार हे नक्की होते. सोबतच फलंदाजीत लोअर ऑर्डर असो की क्षेत्ररक्षण, दोन्ही





जागी कायदे में रहोगे तो फायदेमे रहोगे हे जाणून होते. त्यासाठी संघबदल गरजेचा होता आणि तीन बदलांसह आपला संघ इंग्लंडशी दोन हात करायला सज्ज झाला होता. तरीही बुमराहची छत्रछाया नसल्याने भारतीय संघ पोरका झाला होता. भलेही आकाशदीपचा समावेश झाला तरीही प्रतिस्पर्ध्यांच्या २० विकेट काढण्यासाठी आकाश पाताळ एक करावे लागणार यात दुमत नव्हते.

त्यातही सपाट खेळपट्टी आणि बुमहाचा वरदहस्त नसल्याने भारतीय गोलंदाजी संघाची कमजोरी वाटत होती. मात्र इंग्लंडने नाणेफेक जिंकून पाटा पीचवर गील ला 'कम ऑन किल मी' केले. अर्थातच या संधीचा पुरेपूर फायदा भारतीय संघाने घेतला. जैस्वाल, गील ने तडाखेबंद फलंदाजी करत इंग्लंडच्या तोंडचे पाणी पळवले. तर वाहत्या गंगेत जडेजा, वॉशिंग्टन सुंदरने हात धुवून घेतले. मुख्य म्हणजे शभमनने दणकेबाज द्विशतकी खेळी करत मैफिल लुटली. तंत्र, ताकद, टायमिंग आणि तिक्ष्ण नजरेचा धनी असलेल्या शुभमनने इंग्लंडच्या भूमीवर प्रिन्स युगाचा प्रारंभ केला.

प्रिन्सच्या धडक बेधडक खेळीने गलितगात्र झालेल्या इंग्लंड संघाला सिराज आकाशदीप जोडीने जेरीस आणले. वास्तविकत: मो. सिराज मेहनत करणारा गोलंदाज मात्र त्याला हवे ते यश मिळत नव्हते. निर्मल बाबांच्या भाषेत सांगायचं झालं तर त्याची विकेटची किरपा जणुकाही एजबस्टनसाठी थांबली होती. तर आकाशदीप इंग्लंड साठी डिफरंट फ्लेवर आणि सरप्राईज पॅकेज होतं. मात्र फळ्यावर जवळपास सहाशे धावा बघताच दोघांच्याही अंगी दहा हत्तींचे बळ आले होते. आकाशदीपने डकेट पोप ला लागोपाठ दोन चेंडूत माघारी धाडतात सिराजच्या उत्साहाला उधाण आले आणि त्याने इंग्लंड संघाचे शिरकाण केले. सिराजने आकाशदीपचा कित्ता गिरवत जो रूट, बेन स्टोक्सला लागोपाठ दोन चेंडूत तंबूत पाठवले.

भलेही हॅरी ब्रुक, स्मिथने मोठी शतके केली परंतु तरीही भारताला १८० धावांची भक्कम आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात राहुल, गील, पंत आणि जडेजाने आश्वासक फलंदाजी करत इंग्लंडला सामन्यातून बेदखल केले. शुभमनने दुसऱ्या डावात दिडशतकी खेळी करत पुन्हा एकदा आपली दादागिरी दाखवली. खरेतर भारतीय संघ ५०० धावांच्या आघाडीवर आपला डाव घोषित करू शकला असता परंतु बॅझबॉलच्या विषाची परीक्षा घेणे योग्य नसते ठरले. त्यातही एक कसोटी गमावल्याने भारताला आणखी एक पराभव नको होता. तर सहाशेच्या वरचे आव्हान इंग्लंड साठी अशक्य कोटीतली बाब होती.

टीम इंडियाच नांव पैलतीरावर न्यायची जबाबदारी पुन्हा एकदा सिराज आकाशदीप जोडीवर होती. आणि दुसऱ्या डावात इंग्लंडचा खात्मा करायचा विडा उचलला तो आकाशदीपने. सपाट पीचवर लाईन आणि लेंथवर अचूक मारा करत त्याने इंग्लिश फलंदाजांना सळो की पळो करून सोडले.शुभमनच्या अद्वितीय कामगिरीचे जेवढे कौतुक करावे तितके ते कमी आहे. मात्र सिराज आकाशदीप द्वयीने सामन्यात रंगत आणली. दोघांनीही प्रत्येकी एका डावात ६/६ बळी टिपले. दोघांनीही फुल लेंथ, शॉर्ट ऑफ गुड लेंथ, शॉर्ट लेंथवर प्रत्येकी १/१ बळी घेतले तर गुड लेंथवर प्रत्येकी २/२ बळी मिळवले. पहिल्या डावात सिराजने सहा इंग्लिश फलंदाजांना सुपुर्द खाक केले तर दुसऱ्या डावात आकाशदीप ने सहा इंग्लिश फलंदाजांना ढगात पाठवले. मुख्य म्हणजे या दोघांनाही क्षेत्ररक्षकांनी उत्तम साथ देत मागील सामन्यातले प्रायश्चित्त घेतले. या दोन्ही लो प्रोफाइल गोलंदाजांनी आपल्या मनगटाच्या बळावर प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे हे दाखवून दिले.

भारतीय कसोटी संघाच्या कक्षा रूंदाणारा हा विजय आहे. सेना देशांमध्ये (साऊथ आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया) मालिका बरोबरीत आणणारा हा विजय आहे. शुभमनचा कर्णधार पदावरील पहिलाच विजय आहे. तर किंग कोहलीच्या राजेशाही नंतर प्रिन्स युगाच्या नांदीचा हा विजय आहे. १९७१ चा वाडेकरांच्या नेतृत्वाखालील विजय, २००१ साली ऑसी विरुद्ध कोलकात्याचा विजय आणि गॅबावर पुन्हा एकदा ऑसी वरील कसोटी विजय जेवढा मोठा, तेवढाच किंवा त्यापेक्षा काकणभर सरस हा विजय म्हणता येईल. 'टूटा है गाबा का घमण्ड' नंतर 'चकणाचूर हुआ एजबस्टन का गुरूर' असे नक्कीच म्हणता येईल. थोडक्यात काय तर गील च्या शुभ नेत्रुत्वात सिराज आकाशदीप हे दोन गोलंदाज म्हणजे 'दो पंछी दो तिनके देखो ले के चले है कहां, ये बनाएंगे इक आशियां' असे म्हणावेसे वाटते.

**डॉ.अनिल पावशेकर**
मो. ९८२२९३९२८७

# ऐतिहासिक विजय आणि विक्रमांची रेलचेल!

पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी इंग्लंडच्या दौऱ्यावर गेलेल्या युवा भारतीय संघाने बर्मिंगहॅमच्या एजबॅस्टन येथे खेळवल्या गेलेल्या दुसऱ्या सामन्यात इंग्लंडला ३३६ धावांच्या मोठ्या फरकाने पराभूत केले आणि मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. खरे तर चौथ्या दिवशी तीन गडी बाद ७७धावा केलेल्या इंग्लंडला विजयासाठी ६०८धावांचे आव्हान पेलवणारच नव्हते. परंतु पाचव्या दिवशी सकाळी पडलेला पाऊस इंग्लंडच्या मदतीला येतो की काय आणि भारताच्या विजयावर पाणी पडते की काय? असे चित्र निर्माण झाले होते. पण भारताच्या सुदैवाने पाऊस थांबला आणि भारताच्या विजयामुळे शेवट गोड झाला. या सामन्यात अनेक विक्रम नोंदवले गेले. पहिल्या डावात २६९ धावा फटकावून शुभमन गिल हा इंग्लंडमध्ये एका डावात सर्वाधिक धावा करणारा भारतीय खेळाडू ठरला. भारतीय संघाने पहिल्या डावात ५८७ आणि दुसऱ्या डावात ४२७ धावा करून एका सामन्यात १०१४ धावा केल्या. अशा तऱ्हेने कसोटी इतिहासात पहिल्यांदाच भारताने १००० धावांचा टप्पा ओलांडला. यापूर्वी २००३ मध्ये सिडनी कसोटीत भारताने ऑस्ट्रेलिया विरुद्ध ९१६धावा केल्या होत्या. बर्मिंगहॅम मध्ये १९६७ पासून गतकाळात ७सामने हरणाऱ्या आणि फक्त १ सामना अनिर्णित राखणाऱ्या भारतीय संघाने हा नववा सामना जिंकून बर्मिंगहॅमला हरण्याची परंपरा मोडीत काढली. या सामन्यात शुभमन गिलच्या अनेक वैयक्तिक विक्रमांसोबत काही सांघिक विक्रमही घडले. एकूणच हा सामना अनेक विक्रमांमुळे संस्मरणीय झाला.

**प्रदीप मोरे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# भोगवटा धारकांना पीएम आवास योजनेचा लाभ द्या

## जिल्हाधिकारी यांना निवेदन



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** भोगवटा धारकांना वर्ग दोनची जागा नियानुकुल करून आम्हाला प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देण्यात यावा या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना नांदगाव खंडेश्वर येथील भोगवटा धारक वर्ग दोन मधील नागरिकांनी दिले.

निवेदनानुसार, संबंधीत नागरिक अनेक वर्षापासून नांदगाव खंडेश्वर येथील रहिवासी असून राहत असलेली जागा ही भोगवटा वर्ग दोन मध्ये असल्याने त्यांना नगरपंचायत कडून गाव नमुना आठ अ चे रेकॉर्ड मिळत नाही. त्यामुळे शासनाच्या अनेक लाभाच्या योजने पासून नागरिक वंचित राहत आहेत. आर्थिक दृष्ट्या सक्षम नाही. त्यामुळे आम्ही राहत असलेल्या जागा नियमानुकुल करून आम्हाला प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांना करण्यात आली. निवेदन देतेवेळी संदीप अंभोरे, नलिनी इंगोले, जिजा राऊत, सविता सुहागपुरे, सारिका बाविस्थळे, मीना सोनोने, अर्चना मालवे, जया भिसे, वंदना कोहळे, मला कोंडवते, निर्मला काकडे, मंगला पवार, कांता चौरागडे, यांचे सह अनेक महिलांचा समावेश होता.

# परिहारपुरा येथील हातभट्टीवर छापा ४९ हजारांचा मुद्देमाल जप्त

## - शहर गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ ने फेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील परिहारपुरा, वडाळी परिसरात गावठी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या एका महिलेला रंगेहाथ पकडले. या कारवाईत जवळपास ४९ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली. आरोपी महिला (वय ३२, रा. परिहारपुरा, वडाळी) ही तिच्या राहत्या जागी चालू अवस्थेतील हातभट्टीच्या चुलीवर गावठी दारू तयार करताना आढळून आली. पोलिसांनी त्वरित धाड टाकून तिच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त केला. यामध्ये १२० लिटर मोहाचा सडवा, ५० लिटर तयार गावठी हातभट्टी दारू व गावठी दारू तयार करण्याचे साहित्य असा एकूण ४९ हजार ८५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणात आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनमध्ये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (क), (फ), (ड) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# आषाढी एकादशीच्या पर्वावर भाविकांना उसळ वाटप

**मोर्शी/प्रतिनिधीः-** आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर लाखो वारकरी भाविक भक्तगण माऊलीच्या दर्शनासाठी पंढरपूरला रवाना होऊन दर्शनासाठी रीघ लागली असतांना आज दि.६ जुलै रोजी एकादशीच्या निमित्ताने येथील माऊली मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि.शाखा मोर्शीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा नागरिकांना व भाविक भक्तांना उसळीचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाची सुरुवात बँकेचे व्यवस्थापकीय अध्यक्ष राजू अजमीरे यांच्या हस्ते विठ्ठल रुक्माईच्या फोटोचे पूजन दीप प्रज्वलन व महाआरती करून करण्यात आली. यावेळी भाविक भक्तांनी व मोर्शी शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनी उसळीचा मनसोक्त आनंद लुटला.

कार्यक्रमाला नानासाहेब भोजने,डॉ. सुमित राठी,मनोज गुल्हाने,सुधीर बेले, विठ्ठल उर्फ बंड भेलाऊ,रमेश आप्पा वाले,विजय विघे, शाखा प्रबंधक योगेश यादव, रोखपाल वैभव घरडे,प्रणव वाले,रसिका कोहळे,धनराज वर्मा, दामोदर वर्मा, शुभम इंगोले,रवींद्र गोहाड,नितीन वानखडे, चेतन बेहरे,विनोद अढाऊ,प्रणय जैस्वाल, आनंद राऊत,अजय पाटील,गजानन हिरुळकर, दिनेश मिश्रा, संजय गारपवार, श्रीकृष्ण हटवार यासह शाखेचे इतर कर्मचारी तसेच ग्राहक ठेवीदार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## पाहिजेत

**सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी, अंजनगाव सुर्जी**
**(जैन धार्मिक अल्पसंख्याक संस्था ) द्वारा संचालित**
**सीताबाई संगई हायस्कूल/ कनिष्ठ महाविद्यालय,**
**( १००% अनुदानित) अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती**

| पदांचे नांव | शैक्षणिक पात्रता | विषय | पदाची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| शिक्षण सेवक (६ वी ते ८ वी करिता ) | B.A./ B. Ed. T.E.T./C.T.E.T. आवश्यक | इंग्रजी | १ पद | पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या पदावर सदर नियुक्ती करण्यात येणार आहे. |

वरील पदाकरिता **दिनांक १९/०७/२०२५ शनिवार रोजी सकाळी १०.०० वाजता** स्वखर्चाने, स्वलिखित अर्ज तसेच मूळ कागदपत्रे, प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती व फोटोसह प्रत्यक्ष मुलाखतीस संस्थेच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

संस्था जैन धार्मिक अल्पसंख्याक असल्याने आरक्षण/बिंदू नामावली लागू नाही.

**अध्यक्ष,**
**सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी, अंजनगाव सुर्जी**

**सचिव,**
**शाळा समिती तथा मुख्याध्यापक/प्राचार्य**
**सीताबाई संगई हायस्कूल/क.म.वि.अंजनगाव**


**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१२४६/२०२५
आनंदराव व ईतर -वि- निरंक
पुढील ता.२०.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. आनंदराव महादेवराव मनवर, वय ५८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. संजय महादेवराव मनवर, वय ५५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. किशोर महादेवराव मनवर, वय ४६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. जिजाबाई महादेवराव मनवर, वय ८० वर्षे, व्यवसाय - गृहिणी
सर्व रा.नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **महादेव चंपतराव मनवर** हे दिनांक 02.07.2020 रोजी **नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आनंदराव महादेवराव मनवर व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आनंदराव महादेवराव मनवर व ईतर** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०३.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्रीमती एम.डी.कांबळे, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१०९७/२०२५
श्रीमती अनिता अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.११.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Anita Suresh Bagekar, Age 53 Yrs. Occu.: Household
R/o. Ward No.3, Haturna, Tq. Bhatkuli, Dist. Amravati.
2. Nikita Ankush Bagekar, Age 24 Yrs. Occu.: Household
3. Saransh Ankush Bagekar, Gardian : Nikita Ankush Bagekar
Age 45 Yrs. Occu.: Child
R/o. Rukhmini Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अंकुश सुरेशराव बगेकर** हे दिनांक 21.01.2025 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **अनिता + 02** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनिता + 02** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६७/२०२५ — ने.ता.२५/०७/२०२५

पिटीशनर :- विजय शंकरराव देशमुख व इतर
-- विरुध्द --
गैरअर्जदार :- निरंक

**APPLICATION IN THE MATTER OF ADOPTION OF THE CHILD DARPAN (FEMALE, HINDU) , DOB:25/10/2015) AS PER PROVISIONS OF CHAPTER II SECTION 5 OF HINDU ADOPTION AND MAINTENANCE ACT, 1956**

ज्याअर्थी वरील **अर्जदार क्र.१ विजय शंकरराव देशमुख व अर्जदार क्र.२ शारदा विजय देशमुख दोघे रा.पुर्णानगर, ता.भातकुली, जि.अमरावती** यांनी दर्पण, जन्मतारीख २५.१०.२०१५ अज्ञान मुलगी हिला दत्तक घेण्याकरिता जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जात अर्जदार क्र. ३ दर्पण हिची जन्मदाती आई ममता साहेबराव मु-हेकर उर्फ ममता राजेश बोडखे रा.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती हिने संमती दिली आहे. त्यामुळे सदर अर्जावर आदेश झाल्यावर श्री विजय शंकरराव देशमुख व शारदा विजय देशमुख यांना दर्पण हिचे आई-वडिल म्हणून घोषित करण्यात येईल.

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास/ अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकांस जाहीर नोटिस देण्यात येते की, त्यांनी दिनांक २५/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक ३०.०६.२०२५**

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४५१/२०२५ — ने.ता.२१.०८.२०२५

**अर्जदार -** १. श्री.पुरुषोत्तम गुलाबराव सोनवणे
वय ६१ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा.समर्थ कॉलनी, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार-निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारचे आई **नामे गिरजाबाई गुलाबराव सोनवणे** हे दि.**१३.०४.२०२५** रोजी **मोर्शी**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०७.०७.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.११६६/२०२५
निर्मलारानी व ईतर -वि- निरंक
पुढील ता.०६.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. निर्मलाराणी चंद्रमोहनसिंग वर्मा, वय ७७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. हरिश चंद्रमोहनसिंग वर्मा, वय ३७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व रा.म्हाडा कॉलनी, न्यू टाऊन बडनेरा, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **चंद्रमोहनसिंग भैयालालजी वर्मा** हे दिनांक 23.12.2024 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **निर्मलाराणी चंद्रमोहनसिंग वर्मा व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **निर्मलाराणी चंद्रमोहनसिंग वर्मा व ईतर** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २६.०६.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१२५४/२०२५
सुनिता व ईतर -वि- निरंक
पुढील ता.१८.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. सुनिता अरुण बागडे, वय ५५ वर्षे, व्यवसाय - निरंक
२. रोशन अरुण बागडे, वय ३५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. सागर अरुण बागडे, वय ३५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
सर्व रा.रोशनखेडा, पो.नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अरुण महादेव बागडे** हे दिनांक 15.06.2010 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **सुनिता अरुण बागडे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिता अरुण बागडे व ईतर** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**(C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१६०/२०२५ — ने.ता.०८.०८.२०२५

**रमेश --वि--निरंक**

**अर्जदार :**
१. **रमेश मारोती खवसे**
२. **संजय मारोती खवसे** — अ.क्र.१ व २ रा.उमरठा रा.नेर, जि.यवतमाळ
२. **रजनीताई देवीदास चौधरी** — रा. जगतपुर, ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती

// वि // निरंक

ज्याअर्थी, **मयत मारोती राघोजी खवसे यांचा मृत्यू दि.१४.०९.२०२३ रोजी जगतपुर, पो.सालोड, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती तसेच मयत तुळसाबाई मारोती खवसे यांचा मृत्यू दि.३०.०५.२०१२ रोजी उमरठा, ता.नेर, जि.यवतमाळ येथे झाला आहे. अर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०४ जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.ए.बी.कटट ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ११३१/२०२५**
**सुनिल व इतर वि निरंक**
**पुढील तारीख ०४.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
१. **सुनिल लक्ष्मणराव पडोळे,** वय ५२ वर्षे, धंदा - शेती
२. **सुधिर लक्ष्मण पडोळे,** वय ५० वर्षे, धंदा - शेती
रा.रोहणखेडा, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत लक्ष्मण पंजाबराव पडोळे व इंदूबाई लक्ष्मणराव पडोळे हे अनुक्रमे दि.०२/०२/२०१६ व दि.०३/१०/२०१९** रोजी **रोहनखेडा** येथे मयत झाले. **अर्जदार सुनिल लक्ष्मणराव पडोळे व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिल लक्ष्मणराव पडोळे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २३.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.११५६/२०२५
हरिहर व ईतर -वि- निरंक
पुढील ता.०८.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. हरिहर महादेवराव वडनेरकर, वय ... वर्षे, व्यवसाय - निरंक
२. शामकुमार महादेवराव वडनेरकर, वय ६१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोघेही रा.जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती
३. छाया नरेंद्र चिखलकर, वय ४९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.ब्राम्हणपुरा, ओल्ड टाऊन बडनेरा, अमदापूरा, ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **महादेवराव पंढरीनाथ वडनेरकर** आणि **कमलताई महादेवराव वडनेरकर** हे अनुकमे दिनांक 01.02.2019 व ०८.०५.२०१२ रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **हरिहर महादेवराव वडनेरकर व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हरिहर महादेवराव वडनेरकर व ईतर** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २५.०६.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
श्री.ए.बी.कट्टे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१२१६/२०२५
रंजना व ईतर -वि- निरंक
पुढील ता.११.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. रंजना विश्वनाथ भाकरे, वय ८१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.रमाबाई आंबेडकर शाळेजवळ, रुक्मिणी नगर, अमरावती
२. सविता संजय नक्साने, वय ५४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.जुने राम मंदिर प्लॉट नं.६१ अयोध्या नगर, नागपूर, ता.जि.नागपूर
३. कविता सुनिल एकुणकार, वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.चिंचवाडा रोड, केटीपीएस कॉलनी, कोराडी कॉलनी, नागपूर
४. श्याम विश्वनाथ भाकरे, वय ५० वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
रा.रमाबाई आंबेडकर शाळेजवळ, रुक्मिणी नगर, अमरावती
५. मानव विश्वनाथ भाकरे, वय ५० वर्षे, व्यवसाय - व्यवसाय
रा.रमाबाई आंबेडकर शाळेजवळ, रुक्मिणी नगर, अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विश्वनाथ नारायणराव भाकरे** हे दिनांक 14.04.2025 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **रंजना विश्वनाथ भाकरे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रंजना विश्वनाथ भाकरे व ईतर** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**(C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१६४/२०२५ — ने.ता.०८.०८.२०२५

**मंगेश --वि--निरंक**

| | |
|---|---|
| **१.रमेश मारोती खवसे** | रा.येणस, ता.नांदगाव खंडे.जि.अमरावती |
| **२.सुनिता धनराज कुबडे** | रा.अंजनगाव बारी, ता.जि. अमरावती |
| **३.वनिता दिलीप हटवार** | रा.व-हा,ता.तिवसा, जि.अमरावती |
| **४.उमा प्रदीप बालपांडे** | रा. शिरजगाव मोझरी,ता.तिवसा.जि.अमरावती |
| **५.ज्योस्तनाताई सचिनराव येळने** | रा. वार्ड नं.०७ देवळी, ता.देवळी, जि.वर्धा |
| **६.रमा प्रविणराव देशमुख** | रा. गुरुदेव नगर मोझरी,ता.तिवसा.जि.अमरावती |
| **७.रेशमा चक्रधर देशमुख** | रा.मोझरी,ता.तिवसा.जि.अमरावती |

// वि // निरंक

ज्याअर्थी, **मयत ज्ञानेश्वर जोगोजी लेंडे यांचा मृत्यू दि.१४.०३.२०१७ रोजी येणस, ,ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती तसेच मयत कौसल्या ज्ञानेश्वर लेंडे यांचा मृत्यू दि.२८.०९.२०२३ रोजी टोंगलाबाद, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला आहे. अर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०४ जुलै २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज -११३२/२०२५**
**श्री.कांता अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ३०.०७.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1) **Kanta Sureshrao Tayade**, Age 67 yrs., Occu.- Household
2) **Pankaj Sureshrao Tayade**, Age 44 yrs., Occu.- Agriculturiest
3) **Sachin Sureshrao Tayade**, Age 47 yrs., Occu.- Agriculturiest
All R/o. Rohankheda

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार - निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत सुरेश दत्तात्रय तायडे** हे **दि.०८.०८.२०१९** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार कांता अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती कांता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २१.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४४५/२०२५ — ने.ता.२१.०८.२०२५

**अर्जदार -**
१. श्री.सुरेश सुबराव बोंडे, वय ७४ वर्षे, धंदा - शेती
२. श्री.हिरालाल सुबराव बोंडे, वय ७० वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.राजुरवाडी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. आशा अशोकराव महल्ले, वय ६३ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अमरावती. ता.जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारचे वडील **नामे सुबराव कवडाजी बोंडे** हे दि.**१४.०७.१९९८** रोजी **राजुरवाडी**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०४.०७.२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
वि. श्रीमती एस.एस.बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज क्र.१२५८/२०२५
श्रीमती संगीता अधिक तीन -वि- निरंक
पुढील ता.११.०८.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sau.Sangita Rajendra Petale, Age 56 Yrs. Occu.: Service
R/o. Near Vallabh Kirana, Nalanda Colony, Sai Nagar, Amravati.
2. Vijay Uttamrao Oandore, Age 54 Yrs. Occu.: Pvt. Service
R/o. Juni Basti Baripura, Amdapur, Badnera, Tq. Dist. Amravati.
3. Vrundavana Ganpat Lad, Age 52 Yrs. Occu.: Housewife
R/o.Kanholibara Ward No.4, Kanholibara, Nagpur, Tq.Dist.Nagpur
4. Neeta Uttamrao Landore, Age 50 Yrs. Occu.: Service
R/o. 52 B, Infront of Prabhadevi Mangal Karyalaya, Ganu Wadi, Rukhmini Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.444606

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **उत्तमराव परशारामजी लांडोरे** हे दिनांक 15.04.2025 रोजी Amravati, Tq. Dist. Amravati येथे मयत झाले. अर्जदार **संगीता + 03** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संगीता + 03** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४.०७.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक ३०३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अकोट खरेदी-विक्री संघ ज्वारी खरेदीत भ्रष्टाचाराचा आरोप

## चौकशी करून गुन्हे दाखल करा; वंचित बहुजन आघाडी ची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ व श्री. संत नरसिंग महाराज फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी जळगाव नहाटे या सब एजंट म्हणून नेमण्यात आलेल्या संस्थानी ज्वारी खरेदीत भ्रष्टाचार केला असल्याची शक्यता असून त्याची चौकशी करण्यात यावी अशी आग्रही मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



अकोट तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ ,अकोट व श्री. संत नरसिंग महाराज फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी ,जळगाव नहाटे या संस्थांची हमीभावा अंतर्गत शासकिय ज्वारी खरेदी करण्यासाठी सब एजंट म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या नावाची नोंदणी करणे, दस्तऐवजांची सत्यता तपासणी करणे, गुणवत्ता पुर्ण धान्याची खरेदी करणे ही जबाबदारी सब एजंट यांची होती. परंतु सब एजंट यांना अकोट येथील काही संगणक चालक, सेतू चालक यांच्या साह्याने शेतीचे खोटे ७/१२ इत्यादी शासकीय दस्तऐवज तयार करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असल्याची शक्यता आहे. ज्या व्यक्तीने ज्वारीची पेरणी केलीच नाही त्यांच्या नावावर खुल्या बाजारात खाजगी व्यापाऱ्यांनी कमी दरात घेतलेली ज्वारी हमी भावांमध्ये विक्री केल्याचे दाखवून शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार केला आहे. अशा प्रकारच्या तक्रारी शेतकऱ्यांनी वंचित बहुजन आघाडीकडे केल्या होत्या. या तक्रारींची वंचित बहुजन आघाडीने दखल घेऊन सदर प्रकरणात सखोल चौकशी करून भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी, चौकशी मध्ये ज्वारी खरेदी ज्या सातबारा दस्ताऐवजांच्या आधारावर करण्यात आली त्या दस्तऐवजांची ऑनलाईन दस्तऐवजांसोब पडताळणी करावी. तसेच बाजार समिती मध्ये खरेदी करण्यात आलेली ज्वारी व्याऱ्यांनी कुठे विक्री, साठवणूक केली याची तपासणी करण्यात यावी. ज्या व्यक्तींच्या नावावर ज्वारी खरेदी करण्यात आली, त्यांनी पिकविमा कोणत्या पिकासाठी घेतला याची तपासणी करण्यात यावी इत्यादी मागण्यासह वंचित बहुजन आघाडी अकोला जिल्हाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन दोषी आढळणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात यावी. सोबतच जिल्ह्यात इतर तालुक्यामध्ये सुद्धा शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघामध्ये अशा प्रकारचा भ्रष्टाचार झाला असल्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ ज्वारी खरेदीची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या वर कारवाई करण्यात यावी, ही मागणी वंचित बहुजन आघाडी अकोला जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे, माजी जि. प.अध्यक्ष संगीता अढाऊ, निखिल गावंडे, गजानन गवई, मनोहर शेळके, गोरसिंग राठोड, प्रभाताई शिरसाट, वसंतराव नागे, पवन बुटे, किशोर जामनिक, नितीन सपकाळ, पराग गवई संजय बूध, प्रदीप शिरसाट, प्रदीप चौरे, सुयोग आठवले, चेतन कडू, शुद्धोधन इंगळे, गोपाल ढोरे, नितीन वाघ, स्वप्निल सरकटे, मोहन दाते यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भरतिया रुग्णालयाची अवस्था भयावह; आ. वसंत खंडेलवाल यांनी केली पाहणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या किसनीबाई भरतिया सामान्य रुग्णालयाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, गेल्या वीस वर्षांपासून येथील ऑपरेशन थिएटर बंद आहे. रुग्णालयातील एकूणच व्यवस्थेचा बोजवारा उडालेला असतानाही अद्याप कोणतीही ठोस सुधारणा झालेली नाही. या पार्श्वभूमीवर आमदार वसंत खंडेलवाल यांनी सोमवारी प्रत्यक्ष रुग्णालयात जाऊन पाहणी केली आणि मनपा प्रशासनाकडून संपूर्ण माहिती मागवली आहे.



कधी काळी नगरपालिकेचा गौरव असलेले हे रुग्णालय ११ डिसेंबर १९६२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या हस्ते उद्घाटित झाले होते. सुरुवातीला उत्कृष्ट सेवा देणारे भरतिया रुग्णालय कालांतराने दुर्लक्षित झाले. नगरपालिकेचे महानगर पालिकेत रूपांतर झाले, पण रुग्णसेवेच्या दर्जात सातत्याने घसरण झाली.

गेल्या दोन दशकांपासून ऑपरेशन थिएटर बंद, इमारतीची खस्ता हालत, परिसरात अस्वच्छता आणि थातूरमातूर कामकाज – अशा अडचणींमुळे शहरातील आणि जिल्ह्यातील रुग्णांना सरकारी वैद्यकीय महाविद्यालयावर अवलंबून राहावे लागत आहे. भरतिया रुग्णालय सुधारले तर जिल्हा रुग्णालयावरील भार निश्चितच कमी होऊ शकतो. पाहणीनंतर आ. खंडेलवाल यांनी रुग्णालयाच्या नव्या दृष्टीकोनातून पुनर्बांधणीसाठी पुढाकार घेण्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी याबाबत सविस्तर अहवाल मागवून मनपा प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. 'हे रुग्णालय पुन्हा कार्यक्षम करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील,' असे आमदार वसंत खंडेलवाल यांनी यावेळी स्पष्ट केले.

# कावड उत्सवाच्या नियोजनासाठी गुरूवारी नियोजनभवनात बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रावणातील कावड व पालखी उत्सवानिमित्त आवश्यक सुविधा, कायदे व सुव्यवस्था आदींबाबत नियोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या अध्यक्षतेत सर्व यंत्रणांची बैठक गुरूवारी (१० जुलै) दु. ४ वा. नियोजनभवनात होणार आहे.

कावड यात्रेच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था, तसेच इतर सोयीसुविधा, बंदोबस्त याबाबत बैठकीत चर्चा होईल. यंदा २५ जुलै रोजी श्रावणास प्रारंभ होत आहे. दि. २८ जुलै रोजी पहिला श्रावण सोमवार, दि. ४ ऑगस्ट रोजी दुसरा, दि. ११ ऑगस्टला तिसरा (श्री क्षेत्र धारगड यात्रा), तसेच दि. १८ ऑगस्ट रोजी चौथा श्रावण सोमवार (कावड व पालखी मिरवणूक) आहे.

जिल्ह्यात कावड यात्रेनिमित्त भक्त मोठ्या संख्येने मौजे गांधीग्राम येथे पूर्णा नदीच्या पात्राजवळ एकत्र येतात व मध्यरात्रीनंतर कावडधारी पूर्णा नदीचे जल कावडीत घेऊन अकोला येथील श्री राजराजेश्वर मंदिरात श्री महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक करतात. या यात्रेचा मार्ग -आपातापा नाका, रेल्वे ब्रीज, शिवाजी महाविद्यालय, अकोट स्टॅण्ड, मामा बेकरी, बियानी चौक, कापड बाजार, सराफा लाईन, गांधी चौक, कोतवाली चौक, लोखंडी पूल, काळा मारोती टर्न, जय हिंद चौक ते राजराजेश्वर मंदिरापर्यंत- असा असतो.

## जाहीर समन्स

### मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात

दावा क्र. ५८२/२०२४ जा. क्र. ११४९/२०२५
ने.ता. ०५/०८/२०२५ दिनांक : ०५/०७/२०२५

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला, शाखा- मुर्तिजापुर

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** मिलींद शितलराव भिगटे व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. ३) सुनील पुनारामजी मेश्राम
रा. त्रिमुर्ती गॅस सर्व्हिस, आठवडी बाजार, मुर्तिजापुर ता. गुर्तिजापुर जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. ३,३३,२६२/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. ०५ माहे ऑगष्ट २०२५ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहाण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. ०५ माहे जुलै, २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का
(ए. डब्ल्यू. इंगळे)
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०४४/२०२४ प्रोसेस नं.१००७५/२०२५
चौ.ता. २८/०७/२०२५ दिनांक : २७/०६/२०२५

**अर्जदार :** १. रमेश शामराव गावंडे २. गजानन शामराव गावंडे दोघेही रा. निंभोरा ता. जि. अकोला ३. माया उर्फ मंगला विनायक डोंगरे (मयत) ३ अ. निखील विनायकराव डोंगरे ३ ब. राधा विनायकराव डोंगरे दोघेही ३ अ व ३ ब रा. बाभुळगांव जहांगिर, ता. जि. अकोला ४. कमलाबाई विजय माळी रा. झाडेगांव, ता. शेगांव, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. शामराव गोविंदा गावंडे २ अन्नपूर्णा शामराव गावंडे
**पत्ता :-** रा. दोघेही रा. निंभोरा ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत १. शामराव गोविंदा गावंडे यांचे दि. ०१/०३/१९९५ रोजी निंभोरा ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत २ अन्नपूर्णा शामराव गावंडे यांचे दि. २०/०९/२००९ रोजी निंभोरा ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबय वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २८/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १२२६/२०२५ प्रोसेस नं.१०५२६/२०२५
चौ.ता. ०५/०८/२०२५ दिनांक : ०५/०७/२०२५

**अर्जदार :** १. निर्मला रामदास मालगे २. निलेश रामदास मालगे ३. सुहास रामदास मालगे ४. पंकज रामदास मालगे सर्व रा. श्रीशिव निवास, बैलजोडी पोळा चौक, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास नथ्थुजी मालगे
**पत्ता :-** रा.श्रीशिव निवास, बैलजोडी पोळा चौक, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास नथ्थुजी मालगे यांचे दि. २३/०४/२०१५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबय वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०५/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २२३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर समन्स

### मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात

दावा क्र. २६२/२०२४ जा. क्र. १०४७/२०२५
ने.ता. १९/०७/२०२५ दिनांक : १७/०६/२०२४

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला, शाखा- मुर्तिजापुर

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** भारती महेश कुमार टिक्याणी व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. ३) गुकेश जगन्नाथ काळे रा. जितापूर (नाकट) पो. सिरसो ता. मुर्तिजापुर जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,२९,६७० /- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. १९ माहे जुलै, २०२५ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. १७ गाहे जुन, २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का
(ए. डब्ल्यू. इंगळे)
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

## जाहीर समन्स

### मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात

दावा क्र. ५८१/२०२४ जा. क्र. १०४८/२०२५
ने.ता. २५/०७/२०२५ दिनांक : १७/०६/२०२४

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला, शाखा- मुर्तिजापुर

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** शेख युसुफ शेख अब्दुल व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. १) शेख युसुफ शेख अब्दुल क्र. २) सौ. मिनाबाई दौलतराव सरनाईक क्र. ३) सुखदेव रामप्रसाद कैथवास सर्व रा. धामणगांव फैल, रेल्वे कॉलनी, स्टेशन एरिया, मुर्तिजापुर ता मुर्तिजापुर जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. २,१९,१९५ / वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवूनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर सगन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. २५ माहे जुलै, २०२५ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी. आज दि. १७ माहे जुन, २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का
(ए. डब्ल्यू. इंगळे)
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११६२/२०२५ प्रोसेस नं.१०४१२/२०२५
चौ.ता. ०७/०८/२०२५ दिनांक : ०४/०७/२०२५

**अर्जदार :** १. शैलेंद्र सिमाराम रामटेके २. विरेन्द्र सिताराम रामटेके ३. वंदना पद्माकर वासनिक रा. गोकुळ अपार्टमेंट, गोकुळ कॉलनी, धम्म कुटीजवळ, कृषि नगर रोड, अकोला ता. जि. अकोला ४. वर्षा प्रदिप ढोके ५. विकास सिताराम रामटेके क. १, २, ४ व ५ रा. सिद्धार्थ नगर, जुना तार फेल, अकोला. ता. जि. अकोला ६. वनिता प्रमोद मेश्राम रा. आसेगाव पूर्णा, ता. चांदूर, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सिताराम आत्माराम रामटेके २. रत्नमाला सिताराम रामटेके
**पत्ता :-** रा. दोघेही जुना तार फेल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सिताराम आत्माराम रामटेके यांचे दि. २८/१२/२०१० रोजी जुना तारफैल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत रत्नमाला सिताराम रामटेके यांचे दि. २१/०५/२०२२ रोजी जुना तारफैल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १००५/२०२५ प्रोसेस नं.९३२३/२०२५
चौ.ता. ०२/०८/२०२५ दिनांक : २०/०६/२०२५

**अर्जदार :** अभिजीत सुनिल वानखडे, रा. कळंबेश्वर, पो. निंबी मालोकार, ता. अकोला जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** सुनिल यशवंत वानखडे, रा. निंबी मालोकार, ता. जि. अकोला
**मयताचा पत्ता :-** मयत : निर्मला सुनिल वानखडे
**पत्ता :-** रा. कळंबेश्वर, पो. निंबी मालोकार, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत निर्मला सुनिल वानखडे यांचे दि. २४/०३/२०२५ रोजी कळंबेश्वर ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबय वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १११३/२०२५ प्रोसेस नं.१०५१९/२०२५
चौ.ता. १३/०८/२०२५ दिनांक : ०५/०७/२०२५

**अर्जदार :** १. कमल श्रीराम कोरडे २. राजू श्रीराम कोरडे दोघेही रा. साने गुरूजी नगरच्या मागे, यादनावालक नगर, खडकी बु. पो. गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. नितीन श्रीराम कोरडे रा. झेड. पी. कॉलनी, खडकी, अकोला, ता. जि. अकोला ४. संजय श्रीराम कोरडे रा. खडकी बु. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीराम राजारामजी कोरडे
**पत्ता :-** रा. साने गुरूजी नगर, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीराम राजारामजी कोरडे यांचे दि. २१/०८/२०२२ रोजी साने गुरूजी नगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १३/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रक रची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११७३/२०२५ प्रोसेस नं.१०५१४/२०२५
चौ.ता. १९/०८/२०२५ दिनांक : ०५/०७/२०२५

**अर्जदार :** १. सुनिता रविंद्र चाराकोलू २. शुभम रविंद्र चाराकोलू दोघेही रा. टिळक पार्क जवळ, गड्डाम प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रविंद्र महेशबाबू चारकालू
**पत्ता :-** रा. टिळक पार्क जवळ, गड्डाम प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रविंद्र महेशबाबू चारकोलू यांचे दि. २७/०९/१९९६ रोजी अशोक हॉस्पिटल, बस स्टॅंड जवळ, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकरची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ११२३/२०२५ प्रोसेस नं.१०४०६/२०२५
चौ.ता. ०२/०८/२०२५ दिनांक : ०४/०७/२०२५

**अर्जदार :** श्रीमती इंदुबाई बालमोहन वर्धावेकर, रा. सप्तशृंगी मंदिरासमोर, हरिहर पेठ, वाशिम रोड, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** श्रीमती विमल विठ्ठल अहिर, रा. गणेश किराणाच्या मागे, जयरामसिंग प्लॉट, वाशिम रोड, जुने शहर अकोला, ता.जि. अकोला
**मयताचा पत्ता :-** मयत : पुरूषोत्तम बाबनसा अहिर
**पत्ता :-** रा. गणेश किराणाच्या मागे, जयरामसिंग प्लॉट, वाशिम रोड, जुने शहर अकोला, ता.जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पुरूषोत्तम बाबनसा अहिर यांचे दि. ०२/१२/२००४ रोजी जुने शहर अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबय वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १९९/२०२५ प्रोसेस नं.२२०८/२०२५
चौ.ता. ०७/०८/२०२५ दिनांक : ०१/०७/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती सुनंदा तुरेराव मुकुंद, वय ६५ वर्ष, . रा. येरली, बुलढाणा २. रघुनाथ भाउराव चराटे (मयत), ए) श्रीमती. ज्योती रघुनाथ चराटे, वय ५४ वर्ष, रा. राम नगर, शिवणी, अकोला बी) माधुरी सागर खडसे, वय - ३२ वर्ष रा. गोरेगाव, ता. जि. अकोला सी) मयुरी सतीष राउत, वय ३० वर्ष, रा. हसनापूर, ता. बाळापूर, जि. अकोला ३. वसंतराव भाउराव चऱ्हाटे, वय ५८ वर्ष, रा. राम नगर, शिवणी, अकोला ४. अनिल भाउराव चऱ्हाटे, वय - ५१ वर्ष, रा. केळीवेळी, ता. अकोट, जि. अकोला ५. सौ. मिरा अशोक खुपसे, वय ४६ वर्ष, रा. पार्वती नगर, बाळापूर रोड, कॅन्वलजवळ, अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार : कोणीही नाही**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वर नमूद पत्यावरील कायम रहिवासी आहे. अर्जदार नं १, ५ या मुली तर अर्जदार क. २, ३, ४ हे मयत भाउराव मानसराम चऱ्हाटे व कलावतीबाई भाउराव चऱ्हाटे यांची मुले असून भाउराव मानसराम चऱ्हाटे व कलावंतीबाई भाउराव च-हाटे यांचा मृत्यू दि. २१/१२/२०११ आणि दि. ११/०३/२०१२ रोजी केळीवेळी, ता. अकोट, जि. अकोला येथे झाला आहे. मयताची आई व वडील हे बरेच दिवसांपूर्वी मयत पावलेले आहेत. अर्जदार यांना मयत भाउराव मानसराम चऱ्हाटे व कलावतीबाई भाउराव च-हाटे यांना सक्षम प्राधिकारी म्हणजे ग्रामपंचायत केळीवेळी, ता. अकोट, जि. अकोला येथून मृत्यू प्रमाणपत्र दि. १८/०२/२०२५ आणि दि. २८/०८/२०१७ रोजी मिळविले आहे. मयत भाउराव मानसराम च-हाटे व कलावतीबाई भाउराव च-हाटे यांना अर्जदारांव्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्ररण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोट

Karmayogi Appasaheb Pratishthan
**Saraswati Arts College, Dahihanda, Tq.& Dist. Akola**
Affiliated to S.G.B. Amravati University, Amravati.

**W A N T E D**
**(WALK IN INTERVIEW)**

Applications are Invited for appointments of candidates for teaching in the college on Contributory (CHB) basis under.
**Vacancies for Grant-in-aid Course / Programmes**
(As per Regulation No. 2/2020, and its para-11]G.R. Dated 17/10/2022)

| Sr.No. | Subject | Total No. of Contributory Post |
|---|---|---|
| 1. | English | 02 |
| 2. | Marathi | 01 |

**Eligbility :-** Academic qualification shall be as per U.G.C. Regulation. 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकीर्ण-2018/(185/18)/ विशि-3, dt. 14-11-2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said GR. Interested and qualified candidates should appear for interview **on dated 14/07/2025 at 11.00 A.M.** in the Principal Office at their own cost along with application on plain paper with Two Photo Copies of Educational Qualifications Caste Certificate if any, Two Passport Size Photograph and Adhar Card.

**President Secretary Principal**
Saraswati Arts College, Dahihanda, Tq.Dist.Akola

Shri Sant Gajanan Maharaj Education Society's
**Shri Sant Gajanan Maharaj Arts College, Borgaon Manju**
Affiliated to S.G.B. Amravati University, Amravati.

**W A N T E D**
**(WALK IN INTERVIEW)**

Applications are Invited for appointments of candidates for teaching in the college on Contributory (CHB) basis under.
**Vacancies for Grant-in-aid Course / Programmes**
(As per Regulation No. 2/2020, and its para-11]G.R. Dated 17/10/2022)

| Sr.No. | Subject | Total No. of Contributory Post |
|---|---|---|
| 1. | Political Science | 02 |

**Eligbility :-** Academic qualification shall be as per U.G.C. Regulation. 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकीर्ण-2018/(185/18)/ विशि-3, dt. 14-11-2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said GR. Interested and qualified candidates should appear for interview **on dated 14/07/2025 at 11.00 A.M.** in the Principal Office at their own cost along with application on plain paper with Two Photo Copies of Educational Qualifications Caste Certificate if any, Two Passport Size Photograph and Adhar Card.

**President Secretary Principal**
Shri Sant Gajanan Maharaj Arts College, Borgaon Manju

## लोखंडी पूल वणा नदीवर स्थानांतरीत करण्यास

# अतुल वांदिले यांच्या मागणीवर गडकरी यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**हिंगणघाट/जनमाध्यम**

येथील राष्ट्रीय महामार्गावरील उपजिल्हा रुग्णालया जवळील लोखंडी पूल येथील वणा नदीवर स्थानांतरीत करण्यात यावा या मागणीचे निवेदन ७ जुलै रोजी ना.नितीन गडकरी यांना अतुल वांदिले यांनी प्रत्यक्ष भेटीत दिले. यावेळी ना. नितीन गडकरी यांनी तातडीने राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून याबाबत त्वरित या पुलाबाबत अहवाल पाठविण्याचे आदेश दिले व पूल उत्तम स्थितीत असल्यास तो वणा नदीवर स्थानातरीत करण्यात यावे असे स्पष्ट निर्देश राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांना दिले. त्याचप्रमाणे नांदगाव येथील उड्डाण पुलावर दोन वेळा पडलेल्या भगदाडा बाबत माहिती घेऊन



अधिकाऱ्यांना या पुलावरील या खड्डया बाबत कायमस्वरूपी तोडगा काढून दुरुस्त करावा व संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश दिले.

येथील राष्ट्रीय महामार्गावरील उपजिल्हा रुग्णालया जवळील लोखंडी पूल वणा नदीवर स्थानातरीत केल्यास वणा नदीवरील गाडगेबाबा समाधी व ५१ फूट उंचीच्या विठ्ठलाच्या दर्शनाला जाणे भाविकांना सोयीचे होणार आहे. जर या ठिकाणी शक्य नसल्यास राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड जवळ हा पूल स्थानातरीत केल्यास हायवेवर मोठ्या प्रमाणावर होणारे अपघात टळू शकतात.त्यामुळे हा पूल वणा नदीवर किंवा छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड परिसरात उभारण्यात यावा अशी आमची मागणी वजा विनंती अतुल वांदिले यांनी ना. गडकरी यांना भेटून केली.यावेळी ना गडकरी यांच्यासोबत अर्धा तास झालेल्या चर्चेत शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष व मनसेचे राज्यचिटणीस हेमंत गडकरी उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्गवर प्राधिकरण यांनी अंदाजे तीन वर्षापूर्वी या उपजिल्हा रुग्णालयात होणारी गर्दी पाहून पायी जाणाऱ्या व्यक्तीसाठी हा पूल तयार करण्यात आला होता. परंतु आता या चौकात व कलोडे चौकात राष्ट्रीय महामार्ग कडून उड्डाणं पुलाचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे भविष्यात या पुलाचा कोणताही ऊपयोग नसल्याने हा पूल या ठिकाणावरुन उचलून वणा नदीवरील गाडगेबाबा समाधीकडे जाणाऱ्या मार्गावर उभारल्यास नदीला पाणी असते त्यामुळे असंख्य भाविकांना या परिसरातील ५१ फूट श्री विठ्ठलाच्या व संत गाडगेबाबा यांच्या समाधीजवळ जाण्यास भाविकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे हा तयार पूल जर या उपरोक्त जागेवर उभारल्यास असंख्य भाविकांची व नदीपल्याड अनेक गावातील जनतेची सोय होऊ शकते. ठिकाणी शक्य नसल्यास शहरातील अन्य कोणत्याही वर्दळीच्या जागेवर स्थानातरीत केल्यास जनतेची सोय होऊ शकते अशी राकाचे अतुल वांदिले यांनी केली. या मागणीची त्वरित दखल नितीन गडकरी यांनी घेतली.यावेळी मनसेचे राज्य चिटणीस हेमंत गडकरी,राकाचे जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, दशरथ ठाकरे उपस्थित होते.

## शहरातील दोन विद्यार्थिनीचे सीएच्या परीक्षेत सुयश

**हिंगणघाट/जनमाध्यम**





माझी मुलगी माझा अभिमान या अंतर्गत आता शिक्षण क्षेत्रात विद्यार्थिनी वर्ग आगेकूच होऊन यश मिळवीत आहे.या कडीमध्ये हिंगणघाट येथील अनुश्री जयप्रकाश सारडा व आचल विनय मोहता या दोन्ही विद्यार्थिनींनी रविवारी घोषित झालेल्या चार्टर्ड अकाउंट सीए च्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून शहराचे मान उंचावले आहे.यात अनुश्री सारडा या विद्यार्थिनीने पहिल्या ग्रुपमध्ये १८३ तर दुसऱ्या ग्रुप मध्ये १८१ असे अंक मिळविले आहे. तर आचल मोहता हिने ग्रुप एक मध्ये १८१ तर ग्रुप दोन मध्ये १५८ असे अंक मिळविले आहे. पहिल्याच टर्ममध्ये या दोघी विद्यार्थिनीनी सीए सारखी अवघड परीक्षा अथक अभ्यासाने उत्तीर्ण केली आहे. अनुश्री सारडा ही येथील उद्योजक जयप्रकाश सारडा यांची मुलगी आहे तर अनुश्रीची मोठी बहीण नागपूरला एमबीबीएस उत्तीर्ण झाल्यानंतर एमडी करीत आहे. आचल ही दाल उद्योजक विनय कुमार मोहता यांची मुलगी आहे व मोहता कुटुंबीयांमध्ये सीए होणारी ती तिसरी सदस्य आहे. या दोन विद्यार्थिनीच्या सुयश बद्दल शहरात सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## शेतकऱ्याला मारण्याची धमकी

**हिंगणघाट**-शेतातील सोयाबीन पिकातून बैलगाडी नेऊन पिकाचे नुकसान करण्यात आले. यावरच न थांबत वाद करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. ही घटना हिंगणघाट पोलीस स्टेशनच्या क्षेत्रात येणाऱ्या सावंगी (देरडा) येथे घडली. याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. प्रवीण चंपत चंदनखेडे रा. मांडगाव हे त्यांच्या शेतात काम करीत होते. दरम्यान विलास हरिभाऊ ठवरी व कुणाल हरिभाऊ ठवरी दोन्ही रा. सावंगी (देरडा) यांनी बैलगाडी चंदनखेडे यांच्या शेतातील सोयाबीन पिकातून नेली. माझ्याकडे चारचाकी वाहन आहे, त्याने तुला उडवून देत ठार करण्यात येईल, अशी धमकीच प्रवीणला दिल्याचे तक्रारीत नमुद असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## दिशा होलानी सीए परीक्षेत उत्तीर्ण

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील पोद्दार बगीचा परिसरातील सिविल इंजिनियर नरेश होलानी यांची कन्या दिशा होलानी यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत ३०० पैकी १७२ गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाली, कठोर परिश्रम, समर्पण आणि दृढनिश्चयाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) द्वारे आयोजित सीए अंतिम परीक्षा उत्तीर्ण करणे ही स्वतःच एक मोठी उपलब्धी आहे, आणि दिशा ने आपल्या मेहनतीने आणि समर्पणाने हे शक्य करून दाखवले. या परीक्षेच्या तयारीसाठी तिने रात्रंदिवस एक केले आणि आपल्या अभ्यासावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले.



दिशा चा भाऊ इंजिनियर करत असून दोन चुलत भाऊ डॉक्टर झाले आहे. स्थानिक नागरिक आणि दिशाचे शिक्षक यांनी तिच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. दिशा ने आपल्या यशाचे श्रेय आपली आई वडील, शिक्षक आणि मित्रांना दिले, ज्यांनी प्रत्येक टप्प्यावर तिला साथ दिली. दिशाच्या या यशाबद्दल शहरातील यारो फाउंडेशन व स्वाभिमानी युवा व्यापारी मित्र मंडळाचे संस्थापक अजय मशांनी, सुमित मुनोत, रवी गनवाणी, राहुल राठी, अंशविन जैन, कुनाल राठी, सुमित कोठारी, अंकुर जैन, अभिजीत सबाने, दीपक दुधाने, अंकित सिंघानिया, सुरज बलवानी, यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांनी अनुभवली वारकरी दिंडीसोबत वृक्षदिंडी

**कारंजा (घा)/जनमाध्यम**

स्थानिक मॉडेल इंग्लिश स्कूल द्वारा आषाढी एकादशी निमित्ताने शहरामध्ये दिंडी काढण्यात आली. सर्वप्रथम शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना काळे यांनी पालखीचे पूजन करून, महाराष्ट्रातील संत परंपरा व वारकरी संप्रदाय याबद्दल माहिती दिली. त्यानंतर शाळेपासून ग्रामीण रुग्णालय ते गोळीबार




चौकातून पून्हा शाळेच्या आवारात दिंडी आणण्यात आली. वारकरी दिंडी सोबतच वृक्ष दिंडी सुद्धा काढण्यात आली. त्यात वर्ग ८ च्या विद्यार्थ्यांनी झाडे लावा झाडे जगवा यावर पथनाट्य सादर केले.महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणजे पंढरपूरचा विठ्ठल, हे सर्व मराठी माणसाच्या मनातील श्रद्धास्थान. आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरची वारी ही अनादी काळापासून सुरू असलेली महाराष्ट्राची परंपरा, त्यात ह्या वारीची अनुभूती शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना मिळावी व बालमनावर अगदी लहानपणापासूनच सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक वारसाची जपणूक करण्याचे सुसंस्कार व्हावे म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना काळे यांच्या मार्गदर्शनात टाळच्या नादामय स्वरामध्ये वारकरी वेशभूषा परिधान करून अत्यंत आकर्षक अशा स्वरूपात मॉडेल इंग्लिश शाळेच्या विद्यार्थ्यांनी पंढरपूरच्या वारीचे प्रदर्शन केले.पांडुरंगाच्या जयघोषाने संपूर्ण आसमंत गुंजला व सगळे वातावरण भक्तीमय, पंढरीमय झाले होते. विठ्ठलाच्या दिंडी सोबतच वृक्षदिंडी काढण्यात आली. या अनुषंगाने पर्यावरण पूरक जनजागृती करण्याच्या हेतूने झाडे लावा, झाडे जगवा असा नारा लावण्यात आला. विद्यार्थ्यांसोबतच सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## तालुका विधी सेवा समितीच्या वतीने मध्यस्थी विशेष मोहीम

**हिंगणघाट/जनमाध्यम**

न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निकाल न्यायप्रक्रिये वरील ताण कमी करणे व पक्षकारांना परस्पर समजुतीने न्याय मिळवून देण्यासाठी हिंगणघाट तालुका येथे १ जुलै २०२५ पासून ९० दिवस मेडिएशन फॉर नेशन म्हणजे राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मोहीम महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशाप्रमाणे माननीय अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

या मोहिमेचा न्यायालयामध्ये ज्या पक्षकारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत, त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन लाभ घ्यावा. असे आवाहन जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समिती हिंगणघाट चे अध्यक्ष श्रीमती वर्षा पारगावकर यांनी केले आहे. सदरची मध्यस्थी विशेष मोहीम दररोज पक्षकारांच्या सोयीनुसार

होणार असून त्यामध्ये ऑनलाईन, ऑफलाइन तसेच हायब्रीड पद्धतीचा वापर केल्या जाईल. पक्षकारांनी ठरविल्यास ते काही मिनिटात त्यांच्या प्रकरणाचा निपटारा या योजनेअंतर्गत घेऊ शकतात. अशी माहिती न्यायमूर्ती पारगावकर यांनी दिली आहे.

## बस बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

**हिंगणघाट/जनमाध्यम**

तालुक्यातील कानगाव, गाडेगाव या ग्रामीण रस्त्यावर गेल्या तीस वर्षांपासून एसटी महामंडळाच्या बसचे बारमाही शेड्युल होते. मात्र एसटी महामंडळाने गेल्या सहा महिन्यांपासून ही बससेवा बंद केल्याने शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वीच शाळा, महाविद्यालय सुरू झाले आहे. गाडेगाव येथील अनेक शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी कानगाव तसेच वर्धा येथे शिक्षण घेतात. परंतु गेल्या सहा महिण्यांपासून येथील बससेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांना कानगाव ते गाडेगाव असे पाच किमी अंतर पायदळ पार करावे लागते. त्यासाठी जवळपास एक ते दीड तासाचा वेळ लागत असून पावसाळ्यात विद्यार्थ्यांचे हाल होत आहे. चानकी, गाडेगाव या दोन गावांमिळून ही बस असून पाचवी ते बारावीपर्यंत प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. इतर प्रवाशांनादेखील प्राथमिक आरोग्य केंद्र, बँक, पोष्ट ऑफिस, बाजारपेठ आदी कामांकरिता कानगाव येथे जाणे-येणे करावे लागते. बस नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास बराचवेळ लागतो. विद्यार्थी वेळेत शाळेत पोहचत नसल्याने शैक्षणिक नुकसान होत आहे.

# प्रा.डॉ.प्रवीण वानखेडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

## परिवर्तनधारा साहित्य कला मंचाचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**

परिवर्तनधारा साहित्य कला मंचच्या वतीने जिल्ह्यात सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे प्रा. डॉ. प्रवीण वानखेडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ खुल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. सलग दुसऱ्या वर्षी आयोजित होणाऱ्या या स्पर्धेचा विषय 'भारत राष्ट्राची निर्मिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा असून ही स्पर्धा १० ऑगस्ट रोजी सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा ग्रंथालय, वर्धा येथे पार पडणार आहे.या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सकाळी ९.३० वाजता प्राचार्य वसंतराव मुरारकर यांच्या अध्यक्षते संपन्न होणार असून उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते रणजीत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मंचावर डॉ. अनिता प्रवीण वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर लगेच स्पर्धा सुरू होईल.स्पर्धेचा समारोपीय कार्यक्रम सायंकाळी ६.०० वाजता असून यावेळी पुरस्कार वितरण आणि व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडणार आहे. स्पर्धेचे प्रथम आणि द्वितीय पुरस्कार रोख १००००/ आणि ७०००/ डॉ. अनिता प्रवीण वानखेडे यांचे कडून दिल्या जाणार असून तृतीय पुरस्कार रोख ५०००/ नितीन कांबळे यांचे कडून तर प्रथम, द्वितीय, तृतीय प्रोत्साहनपर पुरस्कार प्रत्येकी ३०००/ रुपये प्रमोद पाटील, राहुल हलुले, योगिता तागडे यांचे कडून दिल्या जाणार आहे. सर्व पुरस्कार विजेत्या स्पर्धकांचा सन्मानचिन्ह आणि



प्रमाणपत्र देऊन सन्मान केल्या जाईल. याचवेळी व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न होईल. व्याख्यानाच्या कार्यक्रमात प्रकाश दार्शनिक, राष्ट्रीय बौद्धिक प्रमुख, समता सैनिक दल, नागपूर हे 'भारत राष्ट्र निर्मिती संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका आणि आपली जबाबदारी' या विषयावर मांडणी करतील.

या स्पर्धेचे प्रवेश शुल्क दोनशे रुपये असून प्रत्येक स्पर्धकाला विषय मांडण्यासाठी आठ मिनिटांचा अवधी दिला जाईल. स्पर्धकांचे व्हिडिओ पाहून स्पर्धेतील अंतिम ३५ स्पर्धक निवडल्या जातील. स्पर्धेत प्रवेश घेण्याची अंतिम तारीख ३० जुलै आहे. इच्छुक स्पर्धकांनी प्रा. प्रशांत जिंदे (७३८५३९२०२१) प्रा. महेंद्र वानखेडे (९९२२७८४२३४) दीपक कांबळे (९६५७०६१२८४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मंचाचे अध्यक्ष प्रा. राजेश डंभारे यांनी केले आहे.

स्पर्धेचे आयोजन यशस्वी करण्यासाठी परिवर्तनधारा साहित्य कला मंचाचे जीवनप्रकाश निमसडकर, चरण गायकवाड, सुभाष चंदनखेडे, डॉ. हरीश पेटकर, प्रकाश कांबळे, मुकुंद नाखले, सुनील ढाले, सचिन ताकसांडे, प्रशांत जारोंडे, अरुण भोंगाडे, प्रियांशू पाटील, जगदीश ढुमणे, विक्रम म्हैस्के, शुभम उईके, यशवंत म्हात्रे, कैलास भगत इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहे.

## संक्षिप्त

### पंकज वाघोडे सावंगीमेघेचे ठाणेदार



**वर्धा**- शहरातील सावंगी (मेघे) पोलीस स्टेशन येथे नवनियुक्त ठाणेदार पदी पंकज वाघोडे यांची बदली करण्यात आली आहे. ते यापूर्वी पोलीस अधिक्षक कार्यालय येथे कार्यरत होते. ते अतिशय कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात.

### शासकीय कार्यालयासमोरून दुचाकी चोरी

**आर्वी**-येथील भूमिअभिलेख कार्यालयाच्या गेटजवळ ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना ३ जुलै रोजी घडली. याप्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. रोशन वसंतराव राऊतरा. जामखुटा, ह. मु. आर्वी यांनी त्यांची एमएच ३२ एजी ११६८ क्रमांकाची दुचाकी भूमि अभिलेख कार्यालयाच्या गेटजवळ उभी ठेवली. परतल्यानंतर त्यांना दुचाकी दिसली नाही. शोध घेऊनही दुचाकी मिळाली नाही. अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची तक्रार आर्वी पोलिसांत करण्यात आली. त्यावरून आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### दारू विक्री करणाऱ्या पाच गुन्हेगारांना केले हद्दपार

**आंजी (मोठी)**- खरांगणा पोलीस स्टेशनअंतर्गत येणाऱ्या काचनूर या गावात दारूविक्री करणाऱ्या पाच गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले. दिनेश विठ्ठलराव वऱ्हाडे, अनिल विठ्ठलराव वऱ्हाडे, शुभम संतोष वऱ्हाडे, सुरेंद्र गुलाब डाहे, सुनील विठ्ठल वऱ्हाडे सर्व राहणार काचनूर ता. आर्वी अशी हद्दपार करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांना दोन वर्षांच्या कालावधीकरिता वर्धा जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. आरोपीविरुद्ध खरांगणा पोलीस ठाण्याअंतर्गत प्रस्ताव पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत पाठविण्यात आला होता. त्यावर हा निर्णय देण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन व उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल चव्हाण यांच्या मार्गदर्शनात खरांगणा पोलीस निरीक्षक चंद्रकांत पाटील, अविनाश नवराते, अमर करणे यांनी केली आहे.

### डॉ. रवींद्र तुरणकर आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग कॉंग्रेस परिषदेत सहभागी

**वर्धा**- स्थानिक सेवाग्राम येथील आदर्श नगर येथील डॉ रवींद्र



तुरणकर हे आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग परिषदचे इंडोनेशिया येथे सहभागी झाले आहेत. ते आयएलए कौन्सिल फॉर एशिया (इंडिया) वर निवडून आले. डॉ. रवींद्र तुरणकर, द लेप्रसी मिशन ट्रस्ट इंडियाच्या स्टॅनली ब्राउन रिसर्च लॅबोरेटरीचे वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, ५ ते १० जुलै दरम्यान इंडोनेशियातील बाली येथील देनपसार येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग कॉंग्रेस २०२५ मध्ये सहभागी होत आहेत. त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना आंतरराष्ट्रीय कुष्ठरोग संघटनेचे (आयएलए) आशिया (भारत) कौन्सिल सदस्य म्हणून निवडण्यात आले आहे. १९ वर्षांहून अधिक अनुभव असलेले, डॉ. तुरणकर आण्विक जीवशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र आणि मायकोबॅक्टेरिया, विशेषतः मायकोबॅक्टेरियम लेप्रेच्या इम्यूनोलॉजीमध्ये विशेषज्ञ आहेत. त्यांनी ४० हून अधिक संशोधन प्रकाशने लिहिली आहेत, अनेक संशोधन प्रकल्पांचे नेतृत्व केले आहे, आणि आंतरराष्ट्रीय ठिकाणी ६० हून अधिक परिषद कार्यवाही सादर केल्या आहेत. याव्यतिरिक्त, ते फ्रंटियर्स इन ट्रॉपिकल डिसीजचे संपादक म्हणून काम करतात. त्यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वर्धा नदी काठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा

### विसर्ग नदी पात्रात सोडण्यात येणार

**वर्धा/ जनमाध्यम**

उर्ध्व वर्धा प्रकल्पच्या पाणलोट क्षेत्रामये पाऊस सुरु असल्यामुळे धरणाच्या जलाशय पातळीत हळूवार पणे पातळीत वाढ होत आहे. त्यामुळे अपेक्षित पर्जन्यमानाचा विचार करता व तसेच धरणात येणा-या येव्यानुसार व मंजूर धरण प्रचलन सुचीनुसार विसर्ग वर्धा नदी पात्रात सोडण्यात येईल त्यामुळे वर्धा नदी काठावरच्या गावातील ग्रामस्थांनी व मासेमारी करणा-यांनी नदी पात्रात जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्र मध्ये पाऊस सुरु असल्यामुळे धरणाच्या जलाशय पातळीत हळुवार पणे याद्ध होत आहे. या व्यतिरिक्त वर्धा नदी खालील भागातील नदी-नाले इत्यादीचा विसर्ग नदीचे पात्रामधे राहणार असल्यामुळे नदीचे पाण्याच्या पातळीमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे करीता ७ जुलै २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता जलाशय पातळी ३३८.१३ मी. असून साठ्याची टक्केवारी ४२.६८ टक्के इतकी आह.

मात्र ३१ जुलै २०२५ पर्यंत ७४.३९ टक्के जलसाठा निर्माण करायचा असून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात व धरणासमोरील क्षेत्रात होणा-या अपेक्षित पर्जन्यमानाचा विचार करता व तसेच धरणात येणा-या येव्या नुसार व मंजुर धरण प्रचलन सुचीनुसार विसर्ग वर्धा नदी पात्रात सोडण्यात येईल, असे सहाय्य अभियंता -१ उर्ध्व वर्धा धरण उपविभाग क्र. १ मोर्शी यांनी कळविले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २२३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## ७१ वी आमदार चषक विदर्भ राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# पुरुष गटात नागपूर तर महिला गटात बुलढाणा अजिंक्य

**अमरावती/का.प्र.**

पुरुष गटात नागपूरच्या संघाने भंडारा संघावर एकेरी मात करीत तर महिला गटात बुलढाणा संघाने वाशिम संघाचा सुध्दा एकेरी पराभव करीत ७१ व्या आमदार चषक विदर्भ राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद प्राप्त केले.







गेल्या दोन दिवसांपासून अमरावतीच्या विभागीय क्रीडा संकुलावर अमरावती जिल्हा कबड्डी (संघ) असोसिएशनच्या यजमान पदाखाली सुरु असलेल्या ७१ व्या विदर्भ राज्य अजिंक्यपद वरिष्ठ पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा आमदार चषक स्पर्धेचा आज समारोप करण्यात आला. स्पर्धेच्या बक्षीस वितरण राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, प्रसिध्द उद्योजक रविराज देशमुख, पवन जाजोदिया, माजी महापौर विलास इंगोले, ॲड. विवेक बारलिंगे, विदर्भ कबड्डी असोसिएशनचे सचिव प्रदिपसिंह ठाकूर, सहसचिव अजय शिंगाडे, ग्रेबोर्डाचे अध्यक्ष सतिष इखार, अमरावती जिल्हा कबड्डी संघटनेचे अध्यक्ष विवेक गुल्हाने, सचिव नितीन सराफ, पंकज लुंगीकर यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी मंचावर उपस्थित होते.

यावेळी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी कबड्डी हा आपल्या मातीतला खेळ असून खेळांडूनी संघ भावनेतून चांगल्या खेळाचे प्रदर्शन करावे, खेळामध्ये सरकार मोठ्या संधी उपलब्ध करून देत आहे. त्याचा सुध्दा खेळाडूंनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. संचालन संदिप इंगोले आभार सचिव नितीन सराफ यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी अतुल इंगोले, योगेश भोसले, राजेश गाडे, मिलींद पाटील, मिलींद बांबल, धनराज यादव, शरद गढीकर, गणेश वरुडकर, अतुल देशमुख, संतीष ठाकूर, निलेश सराफ, राजेंद्र तुळे, सचिन मेहरे यांच्यासह कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

पुरुष गटात झालेल्या अंतिम सामन्यात नागपूरने भंडारा संघावर ४१-१८ अशी एकेरी मात केली. भंडारा संघार्ते सुरज शेंडे,मनिष कुंभरे व देवानंद धुर्वे यांनी उत्कृष्ठ चढाई करून तसेच पकड करून मध्यांतरापर्यंत खींड लढविली परंतू मध्यांतरापर्यंत सुध्दा २९-१० अशी १९ गुणांची आघाडी घेत नागपूर संघ आघाडीवरच होता. नागपूरच्या मनिष राऊत, लोकेश पाल व अक्षय राऊत यांनी उत्कृष्ठ चढाई करून पुन्हा संघाला गुण मिळवून दिले. नागपूर संघाने भंडाल्र्यावर ४१-२८ अशी एकेरी मात करून पुरुष गटातील या स्पर्धेचे अजिंक्यपद प्राप्त करून दिले.

महिला गटात बुलढाणा संघाने वाशिम संघाचा २८ - १८ असा पराभव केला. विजयी बुलढाणा संघाकडून अक्षता धारणकर, विद्या व सुनंदा यांनी यशस्वी चढाई करीत संघाला विजय मिळवून दिला. या स्पर्धेत पुरुष गटातून बेस्ट रेडर म्हणून मनिष राऊत(नागपूर), बेस्ट कॅचर म्हणून सुरज शेंडे (भंडारा) तर उत्कृष्ठ खेळाडू म्हणून संकेत शेंडे (वर्धा) यांना गौरविण्यात आले.

महिला गटातून उत्कृष्ठ पकडचा बहुमान सुनंदा पवार (वाशिम), उत्कृष्ठ चढाईचा बहुमान कोमल जाधव (वाशिम) व उत्कृष्ठ खेळाडूचा बहुमान अक्षता धारणकर (बुलढाणा) हिने पटकाविला.पाहुण्यांच्या हस्ते विजयी संघाला ट्रॉफी व रोख बक्षिसे देण्यात आली. तर उत्कृष्ठ खेळाडूला स्व. कृष्णराव बारलिंगे, स्व.हिराबाई तुळशीरामजी गुल्हाने व स्व. संजय वाकोडे स्मृती प्रित्यर्थ बक्षिसे देवून गौरविण्यात आले. या स्पर्धेत पुरुष गटात वर्धा तर महिला गटात यवतमाळच्या संघाने तृतीय स्थान प्राप्त केले.

## संक्षिप्त

### विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ च्या पूनर्परीक्षा १६ जुलैला

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी - २०२५ बी.ए. सेमि.-४ (सी.बी.सी.एस.), एम.ए. भाग-२ सेमि-४ गृह अर्थशास्त्र (सी.जी.एस.), एम.एस्सी. (अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स) सेमि-४ (सी.बी.सी.एस. नवीन), बी.कॉम. सेमि-१ (एन.ई.पी.) एम.एस्सी. (अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स) सेमि-२ (एन.ई.पी.) (टू इयर्स-फोर सेमिस्टर मास्टर डिग्री प्रोग्राम-एन.ई.पी.व्ही.२३ विथ एक्झिट अॅन्ड एन्ट्री ऑप्शन) आणि गृहविज्ञान (फॅशन डिझायनिंग सेमि-५ या विषयांच्या पुनर्परीक्षा विद्यापीठाच्या प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार दि. १६ जुलै, २०२५ रोजी पूर्वीच्याच केंद्रांवर घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे.यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.



### प्रभा आवारे राष्ट्रसंत विचारधारा परीक्षा उत्तीर्ण

**अमरावती-** वडाळी परिसरातील माजी नगरसेविका प्रभा आवारे यांनी नुकताच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांच्या या यशाबद्दल प्रभात टॉकीज येथे सितारे जमी पर या चित्रपटात विशेष शो प्रसंगी डॉ. गविंद कासट मित्र मंडळी व अहिल्या महिला परिषदेच्या डॉ. शोभा गायकवाड व अहिल्या महिला परिषद अध्यक्षा नीता टेकाळे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी प्रामुख्याने जीवन गोरे, सुदर्शन गांग, लक्ष्मण तडस, जानवी सदार, दिलीप सदार, डॉ. राजू डांगे, संजय खोंडे, अनिल वानखडे, डॉ. रंजना बनारसे, दीपक दारव्हेकर इत्यादी मंडळी मित्र मंडळी मोठ्या संख्येने हजर होते.



### सांजाग्राम येथे वृक्षारोपण कार्यक्रम

**अमरावती-** धनश्री सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने सांजाग्राम येथे वृक्षारोपण, गरजू वस्तूची भेट हा अभिनव उपक्रम राबविला या उपक्रमात धनश्री प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष मंजू ठाकरे, सचिव आरती बोंदरकर, अंबाई संस्थेच्या संचालिका माधुरीताई चव्हाण, धनश्री ग्रुपच्या सदस्य सारिका बढे, दिपाली महाजन, कविता कचवे, दिपाली पागृत आणि आश्रमातील छोटी मुल, मुली उपस्थित होते.महिला सक्षमीकरण आणि पुनर्वसनासाठी महाराष्ट्रातून एकत्र झालेल्या समर्पण ही सामाजिक संस्था मागील अनेक वर्षापासून सांजाग्राम गुरुकुंज मोझरी येथे एकात्मिक विकास प्रकल्प राबवित आहे.समाजातील उपेक्षित पुरुष,महिला व लहान मुली मुलांकरता समर्पण प्रतिष्ठान काम करते आहे.

## डॉ. रणवीरसिंग राहल यांचा आयुक्त अरविंद चावरिया यांच्याद्वारे सत्कार

**अमरावती/का.प्र.**

८ ते १३ जुलै २०२५ , बिश्केक, किर्गिस्तान येथे होणाऱ्या २० वर्षाआतील आशिया कुस्ती चॅम्पियनशिप २०२५ करिता डॉ. रणवीर सिंग राहल यांची भारतीय कुस्ती संघ तथा अध्यक्ष संजय सिंह यांच्या वतीने निवड करण्यात आली आहे. दिल्ली येथून ज्युनिअर भारतीय कुस्ती संघ बिश्केक, किर्गिस्तान करिता संपूर्ण भारतातून निवड केलेले १० कुस्ती खेळाडू व प्रशिक्षक मोहनलाल यादव महेंद्रसिंग गुजर व एक डॉक्टर सोबत रवाना होतील.



डॉ.रणवीर सिंग राहल सतत आठ वर्षापासून अनेक वेळा भारतीय कुस्ती संघाचे प्रशिक्षक म्हणून मलेशिया, ओमान जॉर्डन, इस्तंबूल तुर्की, उझबेकिस्तान, इराण, चायनीज ताईपाई, रशिया, झग्रेब, बल्गेरिया, या देशात यशस्वीपणे भारताचे प्रशिक्षक म्हणून नेतृत्व केले व त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारताला जागतिक व आशियाई आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत अनेक पदके प्राप्त झाले आहे.सध्या डॉ. रणवीरसिंग राहल हे अमरावती शहर पोलीस आयुक्तालय येथे मा.श्री अरविंद चावरिया यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे.डॉ. रणवीर सिंग राहल यांच्या खेळाडू जीवनात ते पाच वेळा विदर्भ केसरी व विदर्भ वीर, महाराष्ट्र महापौर केसरी व अनेक वेळा केसरी बहुमान पाटकविले आहे व विदर्भातून सर्वात जास्त महाराष्ट्र राज्य स्वर्ण पदक प्राप्त केले आहे व वरिष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. पोलीस उप आयुक्त गणेश शिंदे, घुगे, सह्य. पो. आयुक्त शिवाजी बचाटे व रा.पो. निरीक्षक गुळसुंदरे, महाराष्ट्र कुस्तीगीर संघ अध्यक्ष श्री रामदासजी तडस व सचिव श्री योगेशजी दोडके, डॉ. संजय तिरथकर,भारतीय कुस्ती संघाचे पदाधिकारी व कार्यालयीन स्टाफ यांनी अभिनंदन केले व पुढील भविष्याच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिले.

## 'ज्ञानदीप'मध्ये पदाधिकाऱ्यांचा सत्कार



**अचलपूर-** शहरातील जीवनपुरा स्थित कृष्णाई बहुउद्देशीय संस्थाद्वारा संचालित ज्ञानदीप पब्लिक स्कूलचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड, जितेंद्र रोडे, सुरेश अटलानी, देविदास इंगळे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र राईकवार यांनी शाळेसाठी जागा देणाऱ्या बालाजी देवस्थानचे आभार मानून पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला तसेच मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन पल्लवी गिरनाळे यांनी केले. कार्यक्रमासाठी सचिव डॉ. अशोक निंबूरकर यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे पदाधिकारी अनिल पिंपळे, धर्मराज पवार उपस्थित होते. खुशी बिजेवार, हिना परवीन, सावरकर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक तसेच गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दारव्हा-मुर्तिजापूर ब्रॉडगेजसाठी 'सर्वेक्षणात' सहाभागी व्हा

### अक्षय पांडेंचे जनतेला आवाहन

**यवतमाळ-** महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने 'विकसित महाराष्ट्राची' रूपरेषा ठरवण्यासाठी नागरिक सर्वेक्षण आयोजित केले आहे. व्हाट्सअप च्या माध्यमातून हे सर्वेक्षण होत आहे. या सर्वेक्षणात यवतमाळ जिल्ह्यातील संकल्पना आणि समस्यांबाबत नागरिकांना आपले मत नोंदवण्याची संधी आहे. या संधीचा लाभ घेऊन पश्चिम विदर्भातील मागासवर्गीय भागाला देशाची आर्थिक राजधानी मुंबईशी जोडण्यासाठी ब्रिटिशकालीन शकुंतला रेल्वेमार्गाचे दारव्हा (यवतमाळ) - मुर्तिजापूर - अचलपूर या मार्गाचे ब्रॉडगेज परिवर्तन तसेच इतरही विकासाचे मुद्दे आणि समस्या या सर्वेक्षणात नोंदवण्याचे आवाहन शकुंतला रेल्वे विकास समितीचे समन्वयक अक्षय पांडे यांनी केले आहे.

सर्वेक्षणात सहभागी होण्याची लिंक नियोजन विभागाच्या plan [dot] maharashtra [dot]gov [dot]in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. १७ जुलै पर्यंत सर्वेक्षणाचा कालावधी आहे.प्रश्न क्रमांक ७ च्या उत्तरामध्ये आपले विचार आपल्याला मांडता येतील. पश्चिम विदर्भाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेला शकुंतला रेल्वे ब्रॉडगेज प्रकल्प दारव्हा (यवतमाळ)-मूर्तिजापूर दशकानुदशकं प्रलंबित आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पात ५०३ आर्थिक सहभागाची घोषणा राज्य शासनाने केली होती. १२० वर्षांचा इतिहास असलेल्या शकुंतला रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर विदर्भातील आर्थिक प्रगतीला चालना देऊ शकते. २०१७ मध्ये फडणवीस आणि सुरेश प्रभू यांनी जाहीर केलेल्या 'कॅपिटल इन्व्हेस्टमेंट प्रोग्राम' अंतर्गत राज्य सरकारने ५०३ तयारी दर्शवली होती. मात्र प्रकल्प तूर्तास मंजूर झालेला नाही.

## जनार्दन पेठेतील नागरिकांनी घेतले विठुरायाचे दर्शन

**अमरावती/का.प्र.**

वीर वामनराव जोशी प्राथमिक विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त शाळे सभोवतालच्या जनार्दन पेठ या परिसरातून काढलेल्या दिंडीने परिसरातील लोकांना त्यांच्या दारी जाऊन साक्षात विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घडवून दिले.



### वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेचा उपक्रम

इयत्ता तिसऱ्या वर्गातील भाग्य राऊत या विद्यार्थ्याने साक्षात विठुरायाची वेशभूषा साकारली तर आरोही अविनाश डहाके हिने रुक्मिणी मातेची वेशभूषा साकारली होती.शाळेतील बहुतांश विद्यार्थी व विद्यार्थिनी वारकऱ्यांच्या वेशभूषेत शाळेत आले होते.शालेय परिसरातून टाळ मृदंग च्या गजरात दिंडी निघाल्यानंतर परिसरातील लोकांनी दिंडीवर पुष्पवर्षाव केला.

दिंडीचे आयोजनात शाळेच्या मोनिका पाटील, ज्योती मडावी, सुजित खोजरे, आसावरी सोवळे, सचिन वंदे, मनीषा श्रीराव, वेदांत तिखिले, विलास देठे, अमोल पाचपोर, दिपाली गंगारे, मोहिनी राऊत, पार्वती इंगोले, नागोसे, जिजा खडसे, तेजस्विनी गजबे, विना मरसकोल्हे, सोनू नितेश थोरात, इत्यादी सर्व शिक्षकांचे व पालकांचे सहकार्य लाभले.जनार्दन पेठेतील रहिवासी असलेल्या गिरीश लड्ढा यांनी दिंडी घरासमोर आल्याबरोबर विठ्ठल रुक्मिणीचे पूजन करून दिंडीमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व वारकरी विद्यार्थ्यांना यावेळी खाऊ वाटप केला. परिसरातील नागरिकांनी, तसेच शाळेच्या पालकांनी शाळेने घेतलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे मनापासून कौतुक व अभिनंदन केले.

## आषाढी एकादशीच्या निमित्ताने यश खोडके यांच्या हस्ते उसळ वाटप

**अमरावती-** आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर वारकरी सांप्रदायात आषाढ महापर्वाला विशेष महत्व असल्याने शासकीय तंत्रनिकेतन, गाडगे नगर समीप आषाढी एकादशी उत्सव समिती, गाडगे नगर, अमरावतीच्या वतीने भावीक भक्तांसाठी उसळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अमरावती च्या वतीने उसळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी यश खोडके यांनी विठुरायाच्या प्रतिमेस पूजन -वंदन - माल्यार्पण करीत सर्व भावीक भक्तांच्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी भगवान विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना केली. तदनंतर यश खोडके यांच्या हस्ते विठ्ठलाची आरती करण्यात आली. भाविक भक्तांना आषाढी एकादशीच्या निमित्ताने उसळ वाटप करण्यात आले.

यावेळी आषाढी एकादशी उत्सव समिती, गाडगे नगर तसेच संकेत महल्ले मित्र मंडळाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्तृत्वाच्या कस्तुरी सुगंधाला मिळाली फळ-फुलांची सुगंधीत साथ

# तपोवनमध्ये वृक्ष दिंडीद्वारे वृक्षारोपण; तपोवनचा ७७ वा वर्धापण दिनाचे औचित्य

**अमरावती/का.प्र.**

समाजाने नाकारलेली कुष्ठ बांधव, अनाथ, विधवा, परित्यक्ता आणि उपेक्षितांना हक्काचे घर मिळावे, त्यांना स्वत:चे सक्षमीकरण करता यावे, समाजामध्ये स्वत:चे अस्तीत्व साकारता यावे याकरीता पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांनी विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन ची स्थापना केली. या सेवाकार्यामध्ये दाजीसाहेबांनी स्वत:चे संपूर्ण आयुष्य समर्पित केले.




ज्यांना दाजीसाहेबांच्या विचारांचा, कर्तृत्वाचा सुगंधीत स्पर्श झाला ते व्यक्तीमत्व आणि त्यांचे हात आज सुगंधाने दरवळत आहेत. ते व्यक्तीमत्व म्हणजे, तपोवन संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई. दाजी साहेबांचा कार्य कर्तृत्वाचा वसा जोपासत हिरवळीने नटलेल्या तपोवन संस्थेत विद्यार्थ्यांनी वृक्षदिंडीच्या माध्यमातून विविध फळ-फुल झाडांचे वृक्षारोपण करीत कर्तृत्वाच्या कस्तुरी सुगंधामध्ये भर टाकली.

विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन द्वारा संचालीत महामना मालवीय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वृक्ष दिंडी चे आयोजन करीत तपोवन परिसरामध्ये तब्बल शंभरच्या वर फळ-फुलांच्या झाडांचे वृक्षारोपण केले. संस्थेच्या ७७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत संस्थे तर्फे संचालित महामना मालवीय विद्यालया चे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शेकडो विद्यार्थ्यांनी तपोवन चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांचे नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली संस्थेच्या परिसरात वृक्षदिंडीचे आयोजन करीत सामाजिक वनीकरण विभागातर्फे अनेक फळ,फुल झाडांची रोपट्यांचे वृक्षारोपण केले.

यामध्ये जांभूळ, आंबा, पेरू, चिंच, आवळा फळ झाडांसह विविध सुगंधीत १०० झाडांचे रोपण शांती कुंज सहीत संपुर्ण तपोवन परिसरात रोपण केले. वर्धापन दिनी अमरावतीचे माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, समाजसेवक सुदर्शन गांग, डॉ. गोविंद कासट यांच्या उत्तुंग व्यक्तीमत्वाची साथ व उपस्थिती लाभली होती. सोबतच नियामक समिती चे सदस्य विवेक अ. मराठे, अश्विन आळशी, भिमराव ठवरे उपस्थित होते.

मुख्याध्यापिका रेखा सदांशिवे, शिक्षक वीरेंद्र देशमुख, प्रशांत उज्जैनकर, शिक्षका माधुरी शास्त्री, वैशाली मोकाशी, शिपाई श्याम गोदामे, सचिव सहदेव गोळे, उपसचिव ऋषिकेश देशपांडे उप अधीक्षक योगेश करडे अंतर्गत व्यवस्थापक निवृत्ती वेलकर भाष्कर शेटये, उत्तमराव पांढरे, संतोष गुधाने महाराज, विजय इंगळे भीमराव उसरे, देविदास सपकाळे गणेश टेकाम पियुष गर्ग सागर कनोते संघर्ष नरमडे विठ्ठल तपासे रितेश रोडगे शाम शेटे यांचे वृक्षारोपणाकरीता मोलाचे सहकार्य लाभले. विविध जातीची लाखो वृक्ष असलेल्या तपोवनमध्ये आता फळ-फुल झाडांच्या वृक्षारोपणावर भर देण्यात आला आहे.

# सरोज टॉकीजसह बसमध्ये बॉम्ब ठेवल्याचा पोलिसांना फोन

-शहरात उडाली खळबळ
-पोलिसांचा मोठा फौजफाटा पोहोचला घटनास्थळावर
-संपूर्ण परिसराची तपासणी






**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सरोज टॉकीज व वसंत चौक परिसरात एका बस मध्ये बॉम्ब असल्याच्या अफवेने आज सोमवारीं ७ जुलैच्या सायंकाळी मोठी खळबळ उडाली. यानंतर पोलिसांचा मोठा फौजफाटा घटनास्थळावर पोहोचला. सरोज टॉकीज आणि वसंत चौकासह संपूर्ण परिसरात तपासणी करण्यात आली. परिसरातील दुकाने आणि तिथे उभी असलेल्या वाहनांची बॉम्बशोधक आणि डॉग स्कॉड मार्फत तपासणी करण्यात आली. संपूर्ण परिसर पोलिसांनी पिंजून काढला, पण त्यांच्या हाती काहीही लागले नाही. एका मागून एक आलेल्या दोन फोन कॉल मुळे संपूर्ण शहरात पोलिस यंत्रणा अलर्ट झाली होती.

माहितीनुसार सोमवारी सायंकाळी पोलिस कंट्रोल रूमवर एका अज्ञात इसमाने कॉल करून सरोज टॉकीज परिसरात बॉम्ब ठेवण्यात आल्याची माहिती दिली होती. या कॉलनंतर थोड्याच वेळात त्या इसमाने दुसरा कॉल करून वसंत चौक परिसरात एका बस मध्ये ☞(पान २ वर)

# अघोरी पूजेमध्ये पोलिसांची धाड

**-आरोपीने स्वतःवर वार करून घडवला थरार -दोन महिलांची सुटका, चौघे पोलिसांच्या ताब्यात**




**यवतमाळ/प्रतिनिधीः-** वंजारी फाईल परिसरात अघोरी पूजेमुळे खळबळ उडाली असून पोलिसांनी केलेल्या कारवाईदरम्यान आरोपीने स्वतःच्या गळ्यावर वार करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना रविवारी उघडकीस आली.

याबाबत पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव, पो.स्टे. यवतमाळ शहर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती की वंजारी फाईल येथे राहणारे महादेव परसराम पालवे (वय ४४) यांनी त्यांच्या राहत्या घरी दोन महिला व एका अल्पवयीन मुलीसह अघोरी पूजा सुरू केली आहे. या माहितीवरून पोलीस स्टाफ व पंचांसह पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

घरी पोहोचल्यावर घराच्या सोप्यावर दोन महिला व दोन मुली बसलेल्या दिसून आले. विचारपूस केली असता, त्यापैकी महिलांची नावे भारती महादेव पालवे (पत्नी) व मुलगी तसेच नीतू रामप्रसाद जयस्वाल व तिची मुलगी (वय १६ वर्ष) अशी असल्याचे समोर आले.

दरम्यान, पोलिसांनी जयस्वाल कुटुंबीयांची विचारपूस सुरू असतानाच आरोपी महादेव पालवे याने अचानक घराच्या आत जाऊन अनुकुचीदार चाकूने स्वतःच्या गळ्यावर वार केला. त्यामुळे पोलिसांनी तत्काळ त्याला ताब्यात घेऊन उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविले.

तपासादरम्यान आरोपीने मुलीवर अन्याय करीत अघोरी चटके ☞(पान २ वर)

# एमडी ड्रग्ज प्रकरणात आणखी एक जेरबंद

-नागपुरीगेट पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरीगेट पोलिसांनी एमडी ड्रग्ज प्रकरणात आणखी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. हा आरोपी अब्दुल फहीम अब्दुल रफिक (रा. कमेला ग्राउंड, अमरावती) असल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून मिळाली आहे. याआधी पोलिसांनी इमरान खान उर्फ मुम्मू सलीम खान (रा. पाटीपुरा) याच्याकडून ७५.७९० ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केली होती.

शहरातील अमली पदार्थांचे जाळे उध्वस्त करण्यासाठी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार नागपुरीगेट पोलिसांनी या प्रकरणाचा माग काढत ही धडक कारवाई केली. नागपुरीगेट पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार यांना गोपनीय माहिती मिळाल्यानंतर इमरान खान याला अटक करण्यात आली. अटकेनंतर पोलिसांनी त्याच्याकडे एमडी ड्रग्जबाबत चौकशी केली असता, अब्दुल फहीम अब्दुल रफिक याच्याकडून ड्रग्ज खरेदी करत असल्याची कबुली दिली. या माहितीच्या आधारे रविवारी (दि.६) रात्री उशिरा पोलिसांनी अब्दुल ☞(पान २ वर)

# माजी मंत्री जगदीश गुप्ता यांचा समर्थकांसह शिंदे गटात प्रवेश

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले स्वागत



**अमरावती/मुंबईः-** माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांनी आपल्या १५० समर्थकांसह आज सोमवार ७ जुलैच्या सायंकाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबई येथील शिवसेना भवनात शिंदे गटात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जगदीश गुप्ता व समर्थकांचे केसरी दुपट्टा घालून आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जगदीश गुप्ता गेल्या चार दशकापासून राजकारणामध्ये सक्रिय आहे. शहरासह जिल्ह्यात त्यांनी भारतीय जनता पार्टीला मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. पक्षाचे ते निष्ठावंत पदाधिकारी होते. पक्ष हितासाठी त्यांनी वेळोवेळी कार्य केले. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन ते रणसंग्रामात उतरले होते. पण भाजपाकडून त्यांना तिकीट देण्यात आली नाही आणि त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविली. पार्टीसोबत बंडखोरी केल्यामुळे त्यांना निष्कासित करण्यात आले होते. भाजप त्यांना पुन्हा बोलवेल,अशी अपेक्षा होती पण तसे नाही झाले. यामुळे त्यांनी हिंदुत्वाच्यासाठी कार्य करणा-या शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. उपमुख्यमंत्री ☞(पान २ वर)

# भानखेडामध्ये घरफोडी करणारा जेरबंद

## -३.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत भानखेडा खुर्द मध्ये एका बंद घराला निशाणा बनवत तेथून २ लाख कॅश सह सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ६२ हजाराचा मुद्देमाल चोरण्यात आला होता. या प्रकरणात बडनेरा डीबी स्कॉडच्या पथकाने तपास करून आरोपी विशाल विजय सिंगर (वय २३,रा. भानखेडा खु.) याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून २ लाख कॅश सह सोन्याची चेन २० ग्रॅम किंमत ६० हजार, अंगठी १० ग्रॅम किं.३० हजार, नऊ ग्रॅमची अंगठी २७ हजार, पाच ग्रॅमची अंगठी १५ हजार, सोन्याची ☞(पान २ वर)

# एसटीची दुचाकीला जबर धडक, पत्नी ठार

**-पतीसह एकजण जखमी -पिंपळविहीर नजीकची घटना -लिफ्ट घेणे पडले महागात**



**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** नागपूरहून अमरावतीकडे येणाऱ्या भरधाव एसटी बसने दुचाकीला धडक दिल्याने एक महिला ठार तर अन्य दोघे जखमी झाल्याची घटना सोमवारी (दि.७ जुलै) दुपारी दीड वाजताच्या दरम्यान पिंपळविहीर गावाजवळ घडली.विजया राजेश पवार (वय २८ रा. शेंदोळा) असे ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. राजेश कमलबाबू पवार (वय ४१, रा. शेंदोळा, जि. अमरावती) व शेख मुख्तार मोहम्मद शमीम (रा. ललतपूर, जि. वैशाली, बिहार) हे दोघे जखमी आहेत. त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची सविस्तर माहिती अशी की,राजेश पवार व त्यांची पत्नी विजया हे दोघेही शेंदोळा फाट्यावरून अमरावती कडे येत असतांना त्यांनी दुचाकी क्रमांक एम.एच.२७ पी.क्यू ०२०३ या दुचाकी चालकाला थांबवून अमरावती पर्यंत लिफ्ट मागितली. दुचाकी चालक शेख मुख्तार ☞(पान २ वर)

# कोर्ट परिसरातून बंदीचे पलायन

## -पोलिसांनी घेतले ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक जिल्हा व सत्र न्यायालय परिसरात पेशीसाठी आलेल्या एका बंदीने तेथून पलायन केल्याची घटना आज सोमवारीं ७ जुलैच्या दुपारी समोर आली. या प्रकरणात पोलिसांनी तपास करून थोड्याच वेळात आरोपी विजय संजय सूर्यवंशी (वय २२ रा. विलास नगर )याला कोर्ट परिसरातूनच ताब्यात घेतले.

माहितीनुसार आरोपी विजय संजय सूर्यवंशी याला सोमवारी दुपारी न्यायालयात पोलीस कर्मचारी पेशीसाठी घेऊन आले होते. यावेळी पोलीस कर्मचा-यांच्या हातावर तुरी देत तो तेथून पळून गेला. त्यानंतर पोलिसांनी त्याचा सर्वत्र शोध घेऊन त्याला थोड्याच वेळात न्यायालय परिसरातून ताब्यात घेतले आणि त्याचे विरुद्ध गाडगे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. आरोपी विजय सूर्यवंशी याला गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत एका दरोडाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात ☞(पान २ वर)

# आ.प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नामुळे बंद फिनले मील पुन्हा सुरू होणार

**-केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी दिले बैठकीत संकेत**

## -एका महिन्यात कामगाराचे थकीत वेतन खात्यात होणार जमा



**अचलपूर/प्रतिनिधीः-** बंद फिनले मील आ.प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नामुळे पुन्हा सुरू होणार असून केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी बैठकीत तसे संकेत दिले आहेत. एका महिन्यात कामगाराचे थकीत वेतन खात्यात होणार जमा होणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

निवडणुक आली की निवडणुकीपूर्वी कामगारांना बंद फिनले मिल पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन अनेक नेते मंडळींनी यापूर्वी दिले. पण याला अपवाद म्हणून अचलपूर मतदार संघाचे भारतीय जनता पक्षाचे आमदार प्रवीण तायडे यांनी आपल्या पहिल्याच प्रयत्नात दिल्ली येथे संपन्न झालेल्या बैठकीत केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कोरोना काळापासून बंद असलेल्या एनटीसी च्या २३ मील ला नवसंजीवनी मिळणार ? अशी आशेची किरण आता कामगारांमध्ये निर्माण झालेली आहे. या बैठकीमध्ये आमदार प्रवीण तायडे यांच्यासोबत केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी राज्यातील एनटीसी ची बंद सात मील संदर्भात व कामगारांच्या विविध समस्या संदर्भात दीड तास चर्चा केली. या बैठकीमध्ये केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी येत्या एका महिन्यात कामगाराचे थकीत वेतन खात्यात जमा होणार असल्याचे आश्वासन दिले. सोबतच राज्यातील एनटीसी चा कोरोना काळापासून बंद असलेल्या सात मिल संदर्भात केंद्र व राज्य शासन संयुक्तपणे त्या मिलची संपूर्ण स्थिती , उत्पादन, यंत्रांची माहिती घेऊन नफ्यात असलेल्या मिलला पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वगळता इतर राज्यात एनटीसी च्या मील संदर्भातही एकूण देशातील २३ मील संदर्भात त्या त्या राज्यातील राज्य शासन व केंद्र शासन संयुक्तपणे आता निर्णय घेणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी या बैठकीमध्ये केले. यामुळे कामगार वर्गात आता आशेचा किरण आमदार प्रवीण तायडे यांच्या अथक प्रयत्नामुळे निर्माण झालेला आहे .

अचलपूर शहरातील केंद्र शासनाची एनटीसी ची फिनले मिल कोरोना काळापासून बंद आहे .यामुळे आतापर्यंत १५ च्या वर कामगारांनी आपली जीवन यात्रा संपवलेली आहे. या संदर्भात अचलपूर मतदार संघ विधानसभा निवडणुकीत☞(पान २ वर)

# दर्यापूर तालुक्यात ७४ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदांची आरक्षण सोडत जाहीर



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतीचे २०२५ ते २०३० सालासाठीचे सरपंच पदाचे नव्याने सुधारित आरक्षण सोमवारीं (दि.७) दुपारी दर्यापूर-अमरावती मार्गावरील नविन तहसिल कार्यालयात काढण्यात आले. नियंत्रण अधिकारी एसडीओ राजेश्वर हांडे,प्राधिकृत अधिकारी तथा तहसिलदार डॉ.रविंद्रकुमार कानडजे,नायब तहसिलदार प्रविण जमधाडे, महसूल सहाय्यक मंगेश टापरे, प्रफुल्ल बोरखडे यांच्या उपस्थितीत सोडत काढण्यात आली. तसेच लहान मुलीच्या हस्ते चिठ्ठ्या काढून सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

दरम्यान सर्वसाधारण सरपंच पदासाठी सर्वसाधारण ३३, नागरिकांचा मागास प्रवर्ग २०, अनुसूचित जातीसाठी १७,अनुसूचित☞(पान २ वर)

# अचलपूर तालुक्यात सरपंच पदासाठी आरक्षण यादी जाहीर

## - विविध गटांसाठी समावेशक आरक्षण



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील ग्रामपंचायतींसाठी होणाऱ्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरपंच पदासाठी आरक्षणाची यादी दि. ७ जुलै २०२५ रोजी जाहीर करण्यात आली. यामध्ये अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), नागरीकांचा मागासवर्ग (OBC) आणि सर्वसाधारण गटांतील महिला व पुरुष यांच्यासाठी विविध ग्रामपंचायतींची सरपंच पदे राखीव ठेवण्यात आली आहेत.

आरक्षण यादीनुसार, एकूण अनेक ग्रामपंचायतींसाठी खालीलप्रमाणे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे:

अनुसूचित जातीसाठी (SC): साधारण व महिला असे मिळून १४ ग्रामपंचायती राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ८ सामान्य (पुरुष/सर्व), तर ६ महिला आरक्षण असलेले सरपंच पदे आहेत.

**अनुसूचित जमातीसाठी (ST):** एकूण १० ग्रामपंचायती आरक्षित करण्यात आल्या आहेत. यामध्ये ५ सामान्य, तर ५ महिला उमेदवारांसाठी राखीव आहेत.

इतर मागासवर्गीय (OBC): या प्रवर्गात एकूण २० महिला सरपंच पदांसह एकूण २०+ ग्रामपंचायती आरक्षित करण्यात आल्या आहेत. महिलांसाठी विशेषतः १९ जागा राखीव असून, उर्वरित गटात पुरुषांनाही संधी उपलब्ध आहे.

**सर्वसाधारण प्रवर्गः** सर्वसाधारण☞(पान २ वर)

# संशयास्पद मृत्यूः घातपात असल्याचा नातेवाइकांचा आरोप

**-पोलीस तपास सुरू, शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा**

**अमरावती/प्रतिनिधीः-** कारंजा लाड तालुक्यातील धामणी येथील मूळ रहिवासी व सध्या अमरावतीच्या दत्तवाडीत राहणारे संतोष चंपतराव कराडे (वय ४७) यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. नातेवाइकांनी हा मृत्यू नैसर्गिक नसून घातपात असल्याचे सांगत त्यांच्या पत्नीनेच संतोष यांना ठार केल्याचा थेट आरोप केला आहे. या प्रकरणी खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, मृतदेहाच्या शवविच्छेदन अहवालानंतरच पुढील तपासाची दिशा स्पष्ट होणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

५ जुलै रोजी सायंकाळी संतोष कराडे यांचा ☞(पान २ वर)

